मूल्य ३० रु./पृष्ठे १०४ । एप्रिल २०१९ । वर्ष १२ वे/अंक ४

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

## अनुक्रमणिका


- देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी नापास — संपादकीय — ६
- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जाहीरनामा प्रकाशन समारंभ, मुंबई
  - १) शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देणार — दिलीप वळसे पाटील — १२
  - २) तिहेरी तलाक रद्द करणार — नवाब मलिक — १८
- काँग्रेस-राष्ट्रवादीची संयुक्त प्रचारसभा, कऱ्हाड
  - १) ५६ इंचाची छाती काय कामाची? — शरद पवार — २०
  - २) सरकार उलथवून टाका — जयंत पाटील — २६
  - ३) उदयनराजेंचा मीही चाहता — रामराजे निंबाळकर — २७
  - ४) सरकारने लोकांना गाळात घातले — उदयनराजे भोसले — २८
  - ५) उदयनराजे देशात एक नंबरने निवडून येणार — शशिकांत शिंदे — ३२
  - ६) सरकारला शेतकऱ्यांचा तळतळाट लागेल — राजू शेट्टी — ३३
- मोदींकडून पंतप्रधानपदाच्या मर्यादेचे उल्लंघन (पत्रकार परिषद) — डी.पी. त्रिपाठी — ३५
- संयुक्त पुरोगामी महाआघाडी पत्रकार परिषद,मुंबई
  - १) भाजप-संघाकडून धर्मनिरपेक्ष मतांच्या विभाजनासाठी प्रयत्न — अशोक चव्हाण — ४०
  - २) लोकशाही टिकवून सरकार उलथविण्यासाठी एकत्र — जयंत पाटील — ४५
  - ३) भाजप-सेनेचे राजकारण फक्त फोडाफोडीचे — अजित पवार — ४७
  - ४) कमळाचे पीक समूळ नष्ट करा — राजू शेट्टी — ४९
  - ५) कर्जमाफी देताना सरकारचा हात थरथरला — जयंत पाटील — ५०
  - ६) मनुवादी सरकारला हद्दपार करायचं — जोगेंद्र कवाडे — ५१
  - ७) सेना-भाजपकडून लोकांची प्रचंड दिशाभूल — रवी राणा — ५२
  - ८) सरकारने जनतेचे केले वाटोळे — हितेंद्र ठाकूर — ५२
- भाजमधून वयोवृद्धांना बाहेरचा रस्ता — अवलोकितेश्वर — ५६
- सत्तेत राहण्यासाठी धडपड — आकाश — ६४
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभ,मुंबई
  - १) कार्यकर्त्यांनी राजकारणापेक्षा समाजकारणाकडे अधिक लक्ष द्यावे — शरद पवार — ७२
  - २) डॉ. रघुराम राजन यांची भूमिका अर्थशास्त्रापुरती सिमीत नाही — अनिल काकोडकर — ७५
  - ३) विज्ञानाच्या मदतीने जग बदलू शकतो — बिल ऑस्टीन — ७६
  - ४) अपंगांसाठीच्या धोरणाची राज्य सरकारने अंमलबजावणी त्वरित करावी — सुप्रिया सुळे — ७७
  - ५) बदललेले आर्थिक चित्र समाजात नैराश्य निर्माण करणारे — डॉ. रघुराम राजन — ८२
- एकविसाव्या शतकातील चौदावे लुई? — नवनाथ दास — ८४
- चव्हाटा (हलके-फुलके राजकीय किस्से) — घंटाकर्ण — ९०
- मुत्सद्देगिरीत शक्तीपेक्षा युक्ती ही अधिक महत्त्वाची! — गहिनीनाथ — ९७
- शेवटचे पान (बॉलपेनचा शोध) — हेमन्त टकले — १०२



**संचालक**
हेमन्त टकले

**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील

**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६

**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर

**सजावट व मांडणी**
दिलीप रोडे

**छायाचित्रे**
प्रशांत चव्हाण

**वर्गणीचे दर-**
वार्षिक रु. ५००/-

**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी 'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.' च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

**संपादक-**
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# भाजप सेनेच्या लबाड्या जनतेपर्यंत पोहोचवा

लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून यावेळी आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे अधिकृत घड्याळ या चिन्हावरती 19 जणांना उमेदवारी दिलेली आहे. तीन जागा समविचारी पक्षांसाठी सोडल्या आहेत. मागील म्हणजे 2014 च्या लोकसभा निवडणुकीत आपले चार आणि काँग्रेसचे दोन असे सहा खासदार महाराष्ट्रात निवडून आले होते. त्यावेळी मोदी लाट होती व सोशल मिडीयावरुन झालेल्या प्रचंड खोट्या प्रचाराला जनता फसून बळी पडली होती. सुदैवाने यावेळी मोदी लाट नाही आणि जनताही आता शहाणी व बऱ्यापैकी सावध झालेली असल्याने मोदी व भाजपच्या खोट्या प्रचाराला बळी पडण्याची शक्यता नाही. भाजप एकट्याच्या ताकदीवर सत्तेत येऊ शकत नसल्यामुळे आणि त्याची पुरेपूर जाणीव भाजपच्या नेत्यांना असल्यामुळे त्यांनी 41 पक्षांबरोबर युती करुन खिचडी पकविण्याचा कार्यक्रम चालविलेला आहे. मागील पाच वर्षात भाजपच्या नेत्यांनी शिवसेनेला ज्या गलिच्छ व अश्लील भाषेत जो उपमा व शिव्याशापांचा नजराणा बहाल केला आहे तो आठवला व पाहिल्यानंतर सेना-भाजप युती कशी होऊ शकते? असा अनेकांना प्रश्न पडला तर नवल वाटायला नको. पण वेगवेगळे लढलो तर दोघांचेही नुकसान होईल आणि हातची सत्ता जाईल या भितीपोटी भाजपचे नेते नाक घासत मातोश्रीच्या दारी गेले. लोटांगण, दंडवत सारे काही घातले. झालं गेलं गंगेला मिळालं चा भंडारा उधळला गेला. दोघांनीही लोकांना मूर्ख बनविलं. वाहत्या गंगेत यथेच्छ लोटा बुडवून घेतला. सत्तेचा मलिदा दोन बोक्यांनी वाटून हाणला. रुसवे, फुगवे बरीच नाटकं झाली. मुंबईच्या महापौरांचा बंगला स्मारकासाठी पदरात पाडून घेतला. मोक्याची जागा हाणली. मुंबई महापालिका तर पार धुवून काढली. हजारो कोटी रुपयांचा महापालिकेत भ्रष्टाचार झाला. कुणाच्या घरात हे पैसे गेले हे मुंबईकरांना वेगळे सांगायची गरज नाही. मराठी माणसाच्या नावाखाली स्वतःच्या तुमड्या भरण्याचा धंदा राजरोसपणे कोण करतंय हे जनता रोज उघड्या डोळ्यांनी पाहते आहे. सरकारचाही या भ्रष्टाचाराला पाठिंबा आहे. तुम्ही मुंबई महापालिका कितीही लुटा. फक्त लोकसभा व विधानसभेला आमच्याशी युती करा. आम्ही म्हणतो ते मान्य करा. नाहीतर मग तुमच्या फाईली मी खोलणार अशी दमदाटी मुख्यमंत्र्यांनी सातत्याने चालू ठेवली. त्यांच्या या तुणतुण्याचा आवाज हस्तकांकरवी मातोश्रीपर्यंत बरोबर पोहोचला आणि उद्धवजी सुतासारखे सरळ झाले. नुसते सरळ झाले नाही तर वाकून वाकून मुजरा करत ज्याने 'पटक देंगे' आणि 'कमरेत लाथ घालू' अशा प्रकारची भाषा वापरली होती त्या अमित शहांचा अर्ज भरायला गांधीनगरमध्ये गेले. किती ही लाचारी. ती भ्रष्टाचारामुळे आली आहे. हात स्वच्छ असते तर अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला असता. पण त्यासाठी असली टायगर हवा. आता टायगरची शेळीच काय ससा झाला आहे असे सारेच जण म्हणतात.

या पार्श्वभूमीवर फुले, शाहू, आंबेडकरांचा सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे विचार मान्य असणाऱ्या व ते प्रत्यक्ष कृतीत उतरावेत यासाठी अहोरात्र धडपडणाऱ्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप, राजू शेट्टी यांचा राष्ट्रीय स्वाभिमानी पक्ष, रिपब्लिकन पक्ष या सर्वांनी एकत्र येऊन एकजुटीने जातीयवादी व धर्मांध असलेल्या आणि लोकशाही, राज्यघटना बदलण्याचा प्रयत्न करुन मनुवाद आणणाऱ्या भाजप-सेनेला सत्तेवरुन खाली खेचण्यासाठी महाआघाडी केली आहे. देशातले वातावरण पूर्णपणाने बदलले आहे हे राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड या तीन राज्यात भाजपचा जो दारुण पराभव झाला त्यावरुन सर्वांच्या लक्षात आले आहे. हवा आता फिरली आहे. ती मोदींविरोधी आहे. मोदी किती खोटारडे, लबाड, स्वार्थी आणि अहंकारी व खुनशी आहेत हे जनतेच्या लक्षात आले आहे. एककल्ली व हुकुमशाही पद्धतीने म्हणजे हिटलरला आदर्श मानून काम करणाऱ्या मोदींनी पाच वर्षांत देशाचे इतके वाटोळे केले आहे की आता प्रत्येकजण अहो मोदी, कुठे नेऊन ठेवला देश आमचा? आणि अहो फडणवीस, कुठे नेऊन टेवला महाराष्ट्र आमचा? असा प्रश्न जाहीरपणे विचारतो आहे. ग्रामीण भागातला शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवक-युवती यांचे जीवन सरकारने उध्वस्त केले आहे. त्यामुळे लोकांमध्ये प्रचंड नाराजी असून हे सरकार आता कोणत्याही परिस्थितीत बदलायचे असा निर्धार मतदारांनीच केला आहे. मंत्र्यांसह सर्व भ्रष्ट लोकांना क्लिन चीट देऊन पाठिशी घालण्याचे काम दस्तुरखुद्द मुख्यमंत्रीच जेव्हा करतात तेव्हा भाजपचे खायचे आणि दाखवायचे दात कसे वेगवेगळे आहेत याचे मनोज्ञ दर्शन घडते. खोटं बोल पण रेटून बोल हा मोदी, फडणवीस व शहा या त्रिकूटाचा आता जीवनाचा महामंत्र बनला आहे. या मंत्राद्वारे जनतेची दिशाभूल त्यांनी आजही जोरजोराने व जोमाने चालविली आहे. आपल्या काँग्रेस-राष्ट्रवादी-शेकाप व समविचारी पक्षांच्या कार्यकर्त्यांनी हा भाजप-सेनेचा बुरखा लोकांना सत्य सांगून व जागे करुन टराटरा फाडला पाहिजे. निवडणुकीच्या निमित्ताने आपण प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहचून आपला विकासाचा अजेंडा, जाहीरनामा, मागील काळात केलेली आणि भविष्यातील कामे जनतेपर्यंत समर्थपणे पोहोचविली पाहिजेत. मा. शरद पवार साहेबांनी देशासाठी व शेतकऱ्यांसाठी जे प्रचंड काम केले आहे ते लोकांपर्यंत पोहचवा. लोक तुमच्या पाठीशी निश्चित राहतील असा मला विश्वास आहे.

## सुरुवातीचे



# देशात दुसरी हरितक्रांती शरद पवार साहेबांमुळेच

महात्मा गांधी, विनोबाजींच्या विचारांनी व वास्तव्याने पुनीत झालेल्या भूमीत म्हणजे वर्धा येथे भाजपने महाराष्ट्रातील आपल्या लोकसभा निवडणुकीतील प्रचाराचा शुभारंभ केला. या सभेसाठी दस्तुरखुद्द पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी उपस्थित होते. या सभेतील त्यांचे जे भाषण सर्वत्र प्रसिद्ध झाले आहे त्यावरुन त्यांचा तोल सुटत चालला आहे आणि पायाखालची वाळू घसरु लागली आहे हेच सिद्ध होते. खोटं बोल आणि रेटून बोल या अंगभूत गुणाचे दर्शनही त्यांनी घडविले. “शरद पवार हे शेतकरी विरोधी आहेत आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकडे त्यांनी कधी लक्ष दिले नाही.'' असली मुक्ताफळे मोदींनी उधळली. वास्तविक संपूर्ण देशात आणि जगभर पवार साहेबांचा भारतातील दुसऱ्या हरितक्रांतीचे प्रणेते म्हणून गुणगौरव होतो आहे. इतकेच नव्हे तर या कृषिक्षेत्रातील कार्याबद्दल मोदींच्याच नेतृत्त्वाखालील सरकारने ‘पद्मविभूषण’ सारखा सर्वोच्च मानाचा किताब देऊन पवार साहेबांना गौरविले आहे. तसेच जागतिक अन्न संघटनेचे (एफएओ) सरचिटणीस ग्रासिआ दासिल्व्हा यांनी रोम येथून पत्र व पुष्पगुच्छ पाठवून पवार साहेबांचे स्वागत केले आहे. कशाबद्दल तर भारत अन्नधान्यात स्वयंपूर्ण केला. जगातील 25 देशांना धान्य निर्यात करुन त्यांची अन्नाची भूक भागविली. 2004 पर्यंत देशातील अन्नधान्याचे उत्पादन कुंठित झाले होते. जवळपास 15 वर्षे धान्याचे उत्पादन 210 ते 215 दशलक्ष टनाच्या पुढे जात नव्हते. त्यामुळे 2004 साली डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्त्वाखालील युपीए सरकार सत्तेवर आल्याबरोबर गहू आयात करण्याची पाळी पवार साहेबांवर आली होती. दोन दिवस त्यांनी फाईलवर सही केली नाही. परदेशातल्या शेतकऱ्यांना पैसे देण्यापेक्षा आपल्या देशातील शेतकऱ्यांना आधारभूत किंमती वाढवून दिल्या तर ते अन्नधान्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतील असा विश्वास मनाशी बाळगून अन्नधान्यात स्वयंपूर्ण होण्याचा त्यांनी निर्धार केला. 540 रु. असणारी गव्हाची व 560 रु. असणारा तांदुळाची आधारभूत हमी किंमत दहा वर्षात वाढवित वाढवित त्यांनी 1500 ते 1600 रुपयांवर नेली म्हणजे तिपटीने वाढविली. त्यामुळे शेतकऱ्यांनीही दहा वर्षात अन्नधान्याचे उत्पादन 50 दशलक्ष टनाने वाढवून 2014 पर्यंत 265 दशलक्ष टनांपर्यंत उत्पादन नेले. 1965 साली आपण पहिली हरितक्रांती यशस्वी केली होती. पण ती संपूर्ण देशभर होऊ शकली नव्हती. पवार साहेबांनी पूर्वांचलातील राज्ये (अरुणाचल, मिझोराम, नागालॅन्ड, आसाम, बिहार, छत्तीसगड, मणिपूर) येथे लक्ष केंद्रित करुन मोठ्या प्रमाणात तांदुळ उत्पादनाचा कार्यक्रम राबविला. त्यामुळे शंभर दशलक्ष टनाचा उत्पादनाचा विक्रम पहिल्यांदा पूर्ण झाला. परिणामी फिलीपाईन्समधील इंटरनॅशनल राईस रिसर्च इन्स्टिट्युटने लेखी पत्र पाठवून पवार साहेबांचे अभिनंदन केले. एवढ्यावर साहेब थांबले नाहीत. गहू, तांदूळाबरोबरच ज्वारी, बाजरी, कापूस, भुईमूग, सोयाबीन, तूर, मूग, मटकी, उडीद, ऊस, रागी, बार्ली, मका यांसारख्या 25 शेतीमालाचे भाव त्यांनी दुपट-तिपटीने वाढवून दिले. 4 कोटी 30 लाख शेतकऱ्यांना सातबारा एका फटक्यात कोरा करुन 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली. विदर्भातील आत्महत्याग्रस्त भागाचा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्यासमवेत दौरा करुन या विभागाला 3500 कोटींचे पॅकेज दिले. एआयबीपी योजना आणून महाराष्ट्राला सिंचनाचा कार्यक्रम वेगाने पुढे नेण्यासाठी दरवर्षी हजारो कोटी रु. दिले. शेतीतली भांडवली गुंतवणूक वाढावी म्हणून ‘आरकेवाय’ सारखी योजना सुरु केली. नॅशनल हॉर्टिकल्चरल मिशन, बांबू मिशन, मेगा पाणलोट प्रकल्प, प्रक्रिया उद्योगासाठी प्रोत्साहन म्हणून 50 कोटींचे अनुदान अशा कितीतरी योजना राबविल्या. मोदी सरकारने पैसे नाहीत म्हणून यातल्या काही योजना बंद केल्या आणि शेतकरी वाऱ्यावर सोडून दिला. ज्यांनी शेतकऱ्यांचे वाटोळे केले आणि नोटाबंदीसारख्या चुकीच्या योजना आणून शेतकऱ्यांच्या अन्नात माती कालवली त्या मोदींनी तरी शरद पवारांबाबत काही बोलू नये. त्यांचे कणभरही काम नाही आणि कर्तृत्व नाही.

**प्रबंध संपादकीय**



# देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी नापास

खोटी आश्वासने जनतेला देऊन तिला फसविण्याचा मागील निवडणुकीत नरेंद्र मोदी यांनी जो नामी धंदा केला तो अत्यंत यशस्वी होऊन दिल्लीच्या तख्तापर्यंत त्यांना घेऊन गेला. जनतेला प्रचंड मूर्ख बनवून व 'अच्छे दिनाची गाजरं' दाखवून मा. मोदी पंतप्रधान झाले. आता देश झपाट्याने बदलेल. विकास पळायला लागेल. शेतीमालाला चांगले भाव मिळतील. शेतकऱ्याला सोन्याचे दिवस येतील. बेरोजगारी संपुष्टात येईल. सगळे रिकामे हात कामाला लागतील. देशातला भ्रष्टाचार पूर्णपणे संपून जाईल. माणसांची कामे झटपट होतील. नोकरशाही सुतासारखी सरळ होईल. अपूर्ण राहिलेले व अर्धवट रेंगाळलेले सिंचनाचे प्रकल्प धडाधडा पूर्ण होतील. आपल्या दारात व शेतात पाणी खेळेल. डोईवरचा हंडा उतरेल. दारात नळाचे पाणी येईल, निदान प्यायला तरी शुद्ध पाणी मिळेल. सगळा भारत स्वच्छ होईल. प्रत्येक रस्त्यावर दर 5 कि.मी. वर सार्वजनिक शौचालये उभी राहतील. कुणीही उघड्यावर संडासला जाणार नाही. आपला कांदा, साखर, टोमॅटो, दूध पावडर यासारखा माल जगाची बाजारपेठ पाहिल. पाकिस्तानने आपला एक जवान मारला तर आम्ही त्यांचे दहा मारू. आसपासच्या शत्रू राष्ट्रांवर जरब बसवू. संरक्षण साहित्याची निर्मिती करण्यात देश स्वयंपूर्ण होईल. काश्मीरचा प्रश्न मिटेल. दहशतवाद्यांची भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होणार नाही. देशातला नक्षलवाद संपुष्टात येईल. अयोध्येत राममंदीराची उभारणी होऊन काश्मीरसाठीचे 370 वे कलम रद्द होईल. सर्वसामान्य माणसाचे जीवन सुखी संपन्न होऊन महागाई कमी होईल. गॅसचा सिलेंडर स्वस्त होईल. अशी एक ना अनेक स्वप्न जनतेने मोठ्या आशेने पाहिली. याला कारणीभूत ठरला मोदींचा 2014 मधला खोटा आक्रमक प्रचार व सोशल मिडीयाचा प्रचंड वापर करुन जनतेला पाडलेली भुरळ. त्यावेळी सगळा देश मोदी गजरात दंग होता. टीव्हीवरच्या जाहिरातींमुळे शेतात खुरपणाऱ्या मजुर बाईलाही मोदी हाच आपला त्राता आणि तारणहार आहे असंच वाटत होते. काँग्रेसला 60 वर्षे सत्ता दिली. मला फक्त 60 दिवस सत्ता द्या. सगळा देश बदलून टाकतो असे मोदी आवर्जून ठामपणे सांगायचे. प्रत्यक्षात मागील पाच वर्षात काय घडलं ते आपण सर्वांनी पाहिले आहे. त्यांच्या पुढच्या बाता व खोट्या आश्वासनांची चादर अंगावर घेण्यापूर्वी मागील जरतारी झालर लावलेल्या व खोट्या मखमली वस्त्रात गुंडाळलेल्या घोषणांच्या व आश्वासनांच्या चिंध्या चिंध्या कशा झाल्या आहेत ते आधी पाहू या.

## आश्वासनांची गारपीट

'मित्रो...' अशी जोरदार आरोळी ठोकून मोदींची 'मन की बात' सुरु झाली की, प्रत्येकजण कानाला रेडिओ लावून बसायचा. आश्वासनांची प्रचंड गारपीट व्हायची. प्रत्येकाला वाटायचं आता माझं ऊखळ पांढरं होणार. जनधन खातं बँकेत उघडायला सांगितलंय. परदेशात ठेवलेला सगळा काळा पैसा मोदी परत आणणार आणि आपल्या प्रत्येकाच्या खात्यात किमान 15 लाख रु. भरणार. देशातला सगळा काळा पैसा संपुष्टात येणार. उद्योगपती, भांडवलदार, काळाबाजारवाले, करबुडवे, श्रीमंत आणि धनदांडगे यांचे पितळ उघडे पडून चांगली जिरणार. घरांच्या किंमती प्रचंड कमी होतील सगळ्यांना घरं मिळणार. कुणीही बेघर राहणार नाही. झोपडपट्ट्या तुटणार. त्या जागी उंच टोलेजंग इमारती उभ्या राहणार. आपण त्यात राहायला जाणार. चोवीस तास पाणी आणि वीज मिळणार. शेतकऱ्याच्या दृष्टीने तर पाणी आणि वीज जीव की प्राण. या दोन गोष्टी त्याला नियमित, वेळेवर, पुरेशा प्रमाणात व रास्त दराने मिळाल्या की त्याला पिकवायची हुरहुरी येते. पेटून कामाला लागतो. दिवसरात्र मेहनत करतो. दर्जेदार मालाचे भरपूर विक्रमी उत्पादन करतो. मग रास्त दर मिळण्याची, दोन पैसे चांगले अधिक मिळण्याची आणि मालाला देश-परदेशातली बाजारपेठ दाखविण्याची अपेक्षा करतो. त्यात मोदी सरकारने स्वामिनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करुन उत्पादन खर्च अधिक त्यावर 50 टक्के नफा असा भाव देण्याची हमी दिलेली असल्यामुळे व 2022 पर्यंत शेतकऱ्याचे उत्पन्न दुपटीने वाढविण्याची घोषणा केलेली असल्यामुळे तो प्रचंड खुशीत होता. विक्रमी उत्पादन घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होता. पण मोदींच्या मनात वेगळंच होतं. देशातला शेतकरी मारुन, त्याला उध्वस्त करुन शहरी ग्राहकवर्ग जगवायचा होता. त्याला स्वस्त किंमतीत, मातीमोल दराने माल पुरवून खूष ठेवायचे होते. कारण मतदार म्हणून त्यांची संख्या मोठी व जास्त होती. हा शहरी पांढरपेशा वर्गातला मतदार व त्याचे हितसंबंध आपण जपले तर पुन्हा सत्तेवर येण्याची संधी आहे. यासाठी त्यांच्या हितसंबंधांना व इच्छांना प्राधान्य देऊन शेतकऱ्यांच्या स्वप्नाला, कष्टाला, आशेला, मेहनतीला मोदींनी मूठमाती देऊन शेतकऱ्यांचे कंबरडे पूर्णपणाने मोडले. त्यांच्या संसाराची धूळधाण केली. परिणामी हजारो शेतकऱ्यांच्या

## संपादकीय



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

आत्महत्या वाढल्या. शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या मोदी व भाजप सरकारच्या काळात झाल्या. पण सरकार इतकं निर्दय काळजाचं, नाही त्याने संपूर्ण कर्जमाफी दिली ना शेतकऱ्याचा सातबारा कोरा केला. उलट त्याला ऑनलाईनच्या रांगेत उन्हातान्हात उभं करुन खिशातले दोनशे-पाचशे रुपये अर्ज भरण्यासाठी घालवायला लावले आणि हातात धतुरा दिला. दीड लाखाची कर्जमाफी. प्रत्येक शेतकऱ्याला देऊन 40 हजार कोटी रु. राज्याच्या तिजोरीतून वाटणार होते. प्रत्यक्षात 13 हजार कोटीही वाटले नाहीत. उत्तर प्रदेशात सत्तेवर येताच पहिल्या आठवड्यात सरसकट एक लाखाची कर्जमाफी दिली. पण महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याला कर्जमाफी देताना मोदी आणि फडणवीसांचा हात थरथरला. त्यांच्या हाताला कंप भरला आणि शेतकरी कर्जमाफीविना तसाच दुःखी, कष्टी राहिला. एवढ्यावरच सरकार थांबलं नाही. शेतकऱ्याला जणू काही आयुष्यातूनच उठवायचं असा निर्धार करुन मोदींनी 8 नोव्हेंबर 2016 ची रात्र दाखविली आणि 500-1000 च्या नोटा एका रात्रीत चलनातून रद्द करुन 'अंधेर नगरी चौपट राजा' याचे दर्शन घडविले.

## नोटबंदीने प्रचंड नुकसान

पाचशे आणि एक हजाराची नोट अचानक एका रात्रीत बंद करताना पंतप्रधान मोदी यांनी काळा पैसा संपुष्टात येईल. दहशतवादी कारवाया करणारे अतिरेकी आणि नक्षलवादी यांची साधनसामुग्रीची रसद बंद होईल व सगळे चलन बाजारात वापरात येऊन आर्थिक मंदी कमी होईल असा दावा केला होता. प्रत्यक्षात या नोटबंदीचा काय परिणाम झाला हे आपण सर्वांनी पाहिले व अनुभवले आहे. रिझर्व्ह बँकेने या नोटा परत येण्यासंबंधी जी आकडेवारी उशीरा का होईना पण जाहीर केली त्यातून मोदी जनतेशी किती खोटे बोलत होते याचे सर्वांना दर्शन घडले आहे. नोटबंदीने संबंध भारताची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली. किमान 2 ते 2.5 टक्क्यांनी विकासदर घटला. कोट्यावधी लोकांचे रोजगार गेले. बेरोजगारांची संख्या प्रचंड वाढली. लघु व मध्यम उद्योग यांचे कंबरडे मोडले. ते पूर्णपणे बंद झाले वा त्या स्थितीत गेले. मोठ्या उद्योगांनी उत्पादन घटविले. कामगार कपात केली. शिफ्ट कमी केल्या. बिल्डर तर पूर्ण झोपले. त्यांनी बांधकामे बंद केली, अर्धवट सोडून दिली. लोकांना घरे मिळाली नाहीत. पैसे अडकून पडले. कित्येक बिल्डर्सनी दिवाळखोरी जाहीर केली. काही जेलमध्ये गेले. सामाजिक अशांतता व अस्वस्थता निर्माण झाली. शेकडो लोक नोटा बदलण्याच्या रांगेत उभे राहून मरणाला सामोरे गेले. कित्येकांनी पोलिसांचा लाठीमार सोसला. काहींची मंगलकार्ये, लग्न पुढे ढकलावी लागली किंवा मोडावी लागली. हिरे व्यापारी 50 हजाराला महाग झाले. नीरव मोदी, मेहुल चोकसी यांसारखे हिऱ्यांचे व्यापारी बँकांना हजारो कोटींचा चुना लावून परदेशात पळून गेले. बँका डबघाईला आल्या. त्यांची विश्वासार्हता धोक्यात आली. ठेवीदारांच्या मनात भितीचे काहूर उठले.

शेतकऱ्यांची अवस्था तर अत्यंत वाईट झाली. शेतीमाल अगोदरच मुळात नाशवंत. बाजारात कोणी ग्राहकच फिरकेना. कारण त्याच्या खिशात माल खरेदीसाठी पैसाच नव्हता. कुठल्याच मालाला मागणी नसल्याने सगळे बाजार ओस पडले होते. फळे, फुले, भाजीपाला या मालाचे करायचे काय असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आ वासून उभा होता. शेतातून हा माल तोडावा तर तोडायला मजूर नाही. कामाला मजूर आले तर त्याला मजुरी द्यायला शेतकऱ्याकडे पैसे नाहीत. यूपी, बिहार व बाहेरच्या राज्यातले मजूर जे द्राक्ष व इतर बागायतीत काम करत होते ते अगोदरच निघून गेले. द्राक्षाच्या घडाला कागद लावायला मजूर मिळेना. टोमॅटोचा भाव 10 ते 20 पैसे किलोवर आला. तोडणीचा खर्चही परवडेना. कापूस वेचणी होईना. अनेकांनी माल तोडून बांधावर, रस्त्यावर, खताच्या



खड्ड्यात फेकून दिला. दूध उत्पादकांनी दूध रस्त्यावर ओतले. काहींनी जनावरांना हा शेतीमाल खायला घातला. शेतकऱ्याने माल बाजारात नेला तर वाहतुकीचा खर्च, हमाली, तोलाई, वाराई भागेना. आडते दलालांना वरुन पैसे द्यावे लागले. म्हणजे मायनस भाव निघाला. माल देऊन शेतकऱ्याला वरती भुर्दंड भरावा लागला. देशातला शेतकरी दोनदा संपावर गेला. हे स्वातंत्र्यानंतर प्रथमच घडले. कर्जबाजारी झालेल्या व हे नुकसान सोसू न शकणाऱ्या कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मोदींच्या या नादानं, अतिरेकी व हुकूमशाही पद्धतीने कारभार करण्याच्या तंत्राने देशाचे जे प्रचंड नुकसान झाले त्यामुळे देश दहा वर्षे मागे गेला. आजपर्यंत कुठलाही

पंतप्रधान अशा बेजबाबदार, मनमानी व बेपर्वाईने काम करणारा निघाला नव्हता. मोदींना फक्त मी काही तरी जगावेगळं करुन दाखवितो. मी अतिशहाणा आहे हीच अहंकारी टीमकी वाजवायची व मिरवायची होती. त्या नादात त्यांनी कसलाही विचार न करता आंधळेपणाने व हिटरलशाही मार्गाने आपल्या सहकाऱ्यांनाही अंधारात ठेवून जे निर्णय घेतले त्यामुळे जगात भारताची बेअब्रू तर झालीच पण आर्थिक डोलाराही कोसळला. तेव्हापासून अर्थव्यवस्थेचे गाडे जे मंदीच्या खोल गर्तेत रुतले आहे ते अजून हालायला तयार नाही. इतका नादान, भंपक व वेडा पंतप्रधान देशाने कधी पाहिला नव्हता.

## कामगिरी निराशाजनक

पंतप्रधानांची पाच वर्षांची कामगिरी अत्यंत निराशाजनक आहे. जीएसटीसह अनेक विषयांना भाजपने आणि गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी विरोध केला. मात्र केंद्रात सत्तेवर येताच काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीने म्हणजे युपीअे सरकारने ज्या अनेक योजना हाती घेऊन धडाडीने निर्णय केले होते तेच मोदींनी फक्त नावे बदलून पुढे चालू ठेवले. युपीअे सरकारने केलेल्या कामांची फक्त उद्‌घाटने मोदींनी केली आणि जणू काही आपणच सर्व काही काम केले आहे असा खोटा डांगोरा पिटला. गेल्या 70 वर्षांत देशात काहीच विकास झाला नाही असा धादांत खोटारडा प्रचार गोबेल्सनिती वापरुन भाजप व मोदींनी चालविला आहे. परंतु जनता काही इतकी मूर्ख नाही. ज्या देशात टाचणी बनत नव्हती तिथे उपग्रह, रॉकेट आणि अणुबाँब बनविण्यापर्यंत भारताने जी मजल मारली व पवार साहेबांनी अन्नधान्याचे देशात विक्रमी उत्पादन (265 दशलक्ष टन) करुन अन्नधान्यात देश स्वयंपूर्ण केला हे सत्य कुणालाच नाकारता येणार नाही. पंडीत नेहरुंपासून डॉ. मनमोहन सिंग यांच्यापर्यंत अनेक पंतप्रधानांनी देशाच्या उन्नतीसाठी व जगात भारताचा नावलौकिक, वाढविण्यासाठी जे दैदिप्यमान 'न भूतो न भविष्यती' अशा प्रकारचे काम करुन ठेवले आहे त्याच्याशी मोदी यांच्या कामाची तुलना होऊ शकत नाही. मोदींची मागील पाच वर्षातली कारकिर्द म्हणजे 'मूठभर घुगऱ्या रातभर मचमच' अशीच आहे. 56 इंच छातीचा नुसता डांगोरा पिटून विकास होत नसतो. त्यासाठी बुद्धी, अभ्यास, अनुभव दृष्टी, तळमळ व सेवाभाव असावा लागतो. तो प्रामाणिकपणे कृतीत उतरावा लागतो. मोदी अहंकाराने इतके भारलेले व डबडबलेले आहेत की ते त्यांच्या मंत्रीमंडळातील मंत्र्यांशी सुद्धा नीट बोलत नाहीत की त्यांच्याकडे ढुंकून पाहातही नाहीत. (त्याबाबत राजनाथ सिंग, सुषमा स्वराज, नितीन गडकरी खासगीत अधिक माहिती देऊ शकतील.) महाराष्ट्राचा तर मोदींनी व केंद्रातल्या भाजपा सरकारने प्रचंड द्वेष केला. महाराष्ट्राच्या प्रकल्पांना केंद्रातून भरघोस निधी देणे तर सोडाच उलट महाराष्ट्रातले उद्योगधंदे गुजरातमध्ये पळवून नेले. बीपीटीचा कारभार जवळपास बंद पाडून सगळा धंदा गुजरातच्या बंदरांमध्ये हलविला. अशा वेळी महाराष्ट्रातल्या जनतेची मते मिळावीत अशी अपेक्षा भाजपावाले कशी करु शकतात? शिवसेनेने तर पूर्ण लाचारी पत्करलेली आहे. महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या हिताला स्वतःच्या क्षुल्लक स्वार्थासाठी शिवसेनेने जो काळीमा फासला त्याबद्दल जनता शिवसेनेलाही माफ करणार नाही.




## पाया पडण्याचे नाटक

मोदी प्रचंड नाटकी आहेत, ढोंगी आहेत, दांभिक आहेत, स्वार्थी व खोटारडे आहेत आणि राजकारणात यशस्वी होण्यासाठी लागणारे लबाडी वृत्तीचे सर्व गुण त्यांच्यात अंगभूत व ठासून भरलेले आहेत. त्यामुळे ते कोणालाही सहजपणे फसवू शकतात. पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर संसदेत जाताना मोदींनी संसदेच्या पायऱ्यांवर डोकं ठेवून नमस्कार केला. लोकांना वाटले किती नम्र आणि संसदेला पूज्य मानून तिचा मान राखणारा पंतप्रधान देशाला मिळाला आहे. प्रत्यक्षात काय घडले ते आपण सर्वांनी डोळे भरुन पाहिले आहे. ज्या संसदेच्या पायऱ्यांवर मोदींनी डोके ठेवले त्याच संसदेला त्यांनी काडीचेही महत्व नाही अशा प्रकारची हीन दर्जाची व कस्पटासमान वागणूक दिली. माझ्यापेक्षा संसद व सभागृह मोठे नाही असा वृथा अभिमान बाळगून त्यांनी संसदेचा जेवढा म्हणून अपमान करता येईल तेवढा करण्याचा प्रयत्न केला. संसदेत त्यांचे कार्यालय आहे. तिथे ते जायचे. पण सभागृहात फारसे जायचे नाहीत. सभागृहात गेले तरी कामकाजात सहसा सहभागी व्हायचे नाहीत. मंत्र्यांच्या उत्तरात हस्तक्षेप करुन उत्तरे द्यायचे नाहीत. स्वतःचा संबंध असलेल्या खात्यांचीही उत्तरे त्यांनी राज्यमंत्री व हाताशी चमचे म्हणून वकिली करण्यासाठी ठेवलेल्या अरुण जेटली, स्मृती इराणी, रवीशंकर प्रसाद, निर्मला सितारामन यांना उत्तरे द्यायला

लावली. पण स्वत: कधीही उत्तरे दिली नाहीत. जगभर दौरे केले. अनेक राष्ट्राध्यक्ष व पंतप्रधानांना मिठ्या मारल्या, आलिंगने दिली, मोठमोठ्या भेटवस्तू व देणग्या दिल्या. त्यांच्याशी अनेक प्रकारचे करार केले. पण त्यासंबंधी संसदेच्या सभागृहात कधीही निवेदन केले नाही. संसदेला माहिती दिली नाही. इतकेच काय पण कधी पत्रकार परिषदही घेतली नाही. पत्रकारांना परदेश दौऱ्यात बरोबर नेले नाही. संबंधित खात्यांच्या मंत्र्यांनाही उदा. मनोहर पर्रीकर, सुषमा स्वराज वगैरे ते दौऱ्यात बरोबर घेऊन जात नसत. सगळीकडे एकटे जाऊन मीपणाचा टेंभा त्यांनी मिरविला. कधीही कोणावर विश्वास नसल्यामुळे सगळ्या अधिकारांचे केंद्रीकरण करुन सचिवांकडून ते थेट फाईली स्वत:कडे मागून घ्यायचे. मंत्र्यांना मोदींनी कधीही काडी इतकीही किंमत दिली नाही. उलट वेळोवेळी त्यांचे अपमानच केले. देश सहमतीने, सर्वांना बरोबर घेऊन, सहकाऱ्यांशी सुसंवाद करुन व त्यांची मते जाणून घेत निर्णय करायचा असतो. पण मोदींना हे कधीच मान्य झाले नाही. 'हम करे सो कायदा' या वृत्तीप्रमाणे ते एकला चलोरेच्या भूमिकेत वागत राहिले. मनात येईल ते निर्णय करीत राहिले. आपल्या सहकाऱ्यांनाही त्यांनी कधी विश्वासात घेतले नाही. एखाद्या मंत्र्याने निर्णय घेण्यापूर्वी काही विचारणा केली तर ते मोदींना सहन होत नसे. नोटाबंदीचा निर्णय घेताना त्यांनी अर्थमंत्री अरुण जेटली यांना देखील विचारात घेतले नाही.

नोटबंदीची घोषणा करण्यासाठी दूरदर्शनवर जात असताना मंत्रीमंडळातल्या एका कर्तबगार व विकासाचा ध्यास असलेल्या एका मंत्र्याने त्यांना सहजच विचारले, " मोदी साहेब, तुम्ही एवढा मोठा निर्णय करायला निघाले आहात याचा सामान्य जनतेवर काय परिणाम होईल याचा काही विचार केला आहे का?" मोदींनी प्रश्नाचे उत्तर तर दिलेच नाही. पण रागाने डोळे वटारून त्या मंत्र्याकडे पाहिले आणि एक शब्दही न बोलता तोंड वाकडे करुन निघून गेले. नोटबंदी आणि रिझर्व्ह बँकेची स्वायत्तता धोक्यात आणण्यावरुन त्यांचे रघुराम राजन आणि उर्जित पटेल या दोन रिझर्व्ह बँक गव्हर्नरशी जे प्रचंड मतभेद झाले व त्यातून दोन्ही गव्हर्नरला राजीनामा द्यायला लागला हे चित्र आपण पाहिले आहे. रिझर्व्ह बँक देखील बटिक बनवायला आणि तिची स्वायत्तता मोडून काढायला त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. सर्वोच्च न्यायालयालादेखील वाकवून आपल्या ताटाखालचे मांजर बनविण्याचा मोदींनी प्रयत्न केला. याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायमूर्तींनी पत्रकार परिषद घेऊन आवाज उठविला. स्वातंत्र्यानंतर पाहिल्यांदा सर्वोच्च न्यायालयातल्या न्यायमूर्तींनी



सरकारच्या म्हणजे मोदींच्या न्यायालयाच्या कामकाजातल्या हस्तक्षेपाबद्दल आवाज उठविला आणि न्यायसंस्था धोक्यात आल्याचे जनतेच्या लक्षात आणून दिले. सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमणुकीची कॉलेजियम नावाची जी यंत्रणा होती तीच मोदींनी मोडीत काढली. आपण व सरकार सांगेल त्याच पद्धतीने न्यायाधीशांनी निकाल म्हणजे न्याय दिला पाहिजे अशी आग्रही भूमिका मांडून ती ज्यांना मान्य आहे त्यांनाच नेमणुका द्यायच्या, खटल्याचे कामकाज सोपवायचे, सोयीच्या जागी ठेवायचे अन्यथा लांब बदलून टाकायचे किंवा त्यांच्याकडे खटलेच सोपवायचे नाहीत अशा प्रकारचे मनमानी धोरण न्याय यंत्रणेतही राबविण्याचा मोदींनी प्रयत्न केला. काही प्रमाणात तो यशस्वीही झाला पण त्यामुळे न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य व विश्वासार्हता धुळीला मिळाली. हे केवढं मोठं पाप मोदींनी केले आहे हे आत्ता लगेच आपल्या लक्षांत येणार नाही. पण त्याचे दूरगामी परिणाम न्याय संस्थेवर व तिच्या स्वायत्ततेवर होणार आहेत याची आपण जाणीव ठेवली पाहिजे.

## गांधी,नेहरु द्वेषाने पछाडले

मोदी सत्तेवर आल्यापासून सातत्याने स्वत:ची तुलना पंडीत नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी व एकंदरीत नेहरु-गांधी घराण्याशी करीत आले आहेत. ही तुलना केली व त्यांचा द्वेष केला की आपण मोठे होऊ या भ्रमात ते सुरुवातीपासूनच आहेत. सत्तेभोवती खुशमस्करे व भाट गोळा होतात हा नियम आहे. तसे मोदींचे भाटही मग गांधी-नेहरुंना शिव्या देऊन त्यांच्यावर टीकेचा भडीमार करीत राहतात. लोकशाहीत प्रत्येकाला बोलण्याचा आणि आपले मत मांडण्याचा जरुर अधिकार आहे. तो स्वातंत्र्याचा एक भाग आहे पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही. निर्भयता म्हणजे निर्लज्जपणा नाही आणि बेडरता म्हणजे निलाजरेपणा नाही. या विशिष्ट मर्यादांनाही सामाजिक सभ्यतेच्या मर्यादा आहेत. त्या आपल्याला टाळता येणार नाहीत पण मोदी आणि त्यांचा कंपू हे सगळे संकेत धाब्यावर

# शरद पवार
# शेतकऱ्यांचे मसिहा व प्रेषित
## नरेंद्र मोदी यांचे २०११ मधील पवारासंबंधीचे उद्‌गार

सत्ताप्राप्तीसाठी पंतप्रधान मोदी किती धादांत खोटे बोलून किती खालच्या पातळीला जाऊ शकतात हे 'पवार शेतकरी विरोधी' या विधानावरुन आपल्या लक्षात आले असेल. वर्ध्याच्या सभेत हे भाषण करण्यापूर्वी त्यांनी आपला 'आतला आवाज' नीट ऐकायला हवा होता. 2011 साली मा. मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री असताना राष्ट्रवादी मासिकाच्या डिसेंबरच्या अंकासाठी मला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत मोदी म्हणाले,

"... आम्ही गुजरात हे राज्य शेतीच्या क्षेत्रात देशात पहिल्या क्रमांकावर नेऊन ठेवले आहे. यासाठी आम्हाला सर्वतोपरी मदत केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांनी केली. पक्षाच्या आणि राज्याच्या सीमा ओलांडून व मन अत्यंत विशाल करुन दूरदृष्टी ठेवून त्यांनी आम्हाला अनेक योजनांचा फायदा मिळवून दिला... कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यामध्ये पवार साहेबांनी जे जाणीवपूर्वक बदल केंद्राच्या पातळीवरुन घडवून आणले आणि राज्यांना आपापल्या बाजार कायद्यांमध्ये बदल करण्यास जे भाग पाडले त्याचा खूप मोठा फायदा आज आमच्या गुजरात राज्याला होतो आहे. नवीन इन्फ्रास्ट्रक्चर व तंत्रज्ञान नेटवर्क उभे राहण्याच्या दृष्टीने मोठा हातभार लागला आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदतही केंद्राकडून मिळाली आहे."



**पवारांचे प्रत्येक पाऊल शेती व शेतकऱ्यांच्या विकासाच्या दिशेनेच**

**नरेंद्र मोदी**, मुख्यमंत्री,गुजरात

एवढंच बोलून मोदी थांबले नाहीत. शरद पवार हे शेतकऱ्यांचे 'मसिहा' व प्रेषित आहेत अशा शब्दांत पवार साहेबांचा गौरव करुन ते म्हणाले,

"शेतीमालाच्या किमान आधारभूत किंमतीमध्ये वाढ करुन देण्यासाठी कृषीमंत्री या नात्याने केंद्रीय मंत्रीमंडळात शरद पवार यांनी जो संघर्ष केला त्याची मला पूर्ण कल्पना आहे. त्यांचा सातत्याचा आग्रह व दबाव यामुळेच या किमतींमध्ये लक्षणीय वाढ होऊ शकली आहे हे सत्य नाकारता येत नाही. त्यामुळे ते शेतकऱ्यांचे मसिहा वा प्रेषित ठरतात."

पवारांबद्दल मोदी आणखीन काय म्हणाले ते त्यांच्याच शब्दात म्हणजे हिंदी भाषेत तुमच्या समोर ठेवतो. मोदी म्हणाले,

"पवार साहब विकास के प्रति प्रतिबद्ध है । वर्तमान में राजनितीक क्षेत्र में जो छुआछुत का माहौल प्रवेश हुआ है उससे वो पुरी तरह परे है । वो सबको स्वीकार करते है ये बहुत बडी बात है । कृषी, किसान और गाव के विकास के प्रति उनका लगाव है । उनका हर कदम उस ही दिशा में दिखाई देता है ।

बसवून गांधी-नेहरु कुटुंबाची पदोपदी निंदानालस्ती करण्यातच स्वतःला धन्य व श्रेष्ठ मानत आहे. कधीतरी एखाद्याने मोदी-शहा जोडगोळीचे आणि त्यांच्या भाटांचे पापाचे घडे मोजले तर त्यांना पळता भुई थोडी होईल. मोदी-शहा सत्तेवर आहेत म्हणून लोक दबावाखाली आहेत. सत्ता कधीच कुणाला अमरपट्टा देत नाही. जेव्हा ही जोडगोळी सत्तेवरुन खाली उतरेल तेव्हा त्यांचे काय हाल होतील याचे उत्तर काळच देईल. पण या जोडगोळीने एक चिरंतन सत्य कायम लक्षात ठेवले पाहिजे. ते जेवढा नेहरु-गांधी घराण्याचा दुस्वास करतील तेवढी काँग्रेस पुन्हा अधिक जिवंत होईल, वाढत जाईल. कॉग्रेसमुक्त भारत हे मोदींचे स्वप्न कधीच प्रत्यक्षात उतरु शकणार नाही. कारण या दोन्ही घराण्यांनी देशासाठी केलेला त्याग, घेतलेले कष्ट हे मोदी-शहा आणि भाजप नेत्यांपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहेत. खरं थोडं स्पष्ट शब्दांत सांगू का! नेहरु, गांधींवर बोलण्याची या दोघांचीही योग्यता व पात्रता नाही. पण त्यांना हे स्पष्टपणे सांगणार कोण? दुसऱ्यावर टीका करुन मोठे होता येत नाही. कामाने व त्यागाने जी माणसे मोठी होतात ती चिरंतन राहतात. समाजाला त्यांचे विचार दीपस्तंभासारखे मार्गदर्शक असतात. मोदी-शहांचे मार्गदर्शन देशाने घेण्याची वेळ अजून आलेली नाही आणि जनतेनेही आपली सद्सद्विवेकबुद्धी अजून इतकी गहाण टाकलेली नाही. तेव्हा मोदी-शहांचे ढोल ज्यांना बडवायचेत त्यांनी जरुर बडवावेत. सूज्ञ विचारी जनता त्यांचे नामोनिशाण मतपेटीद्वारे मिटविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही एवढे मात्र निश्चित!

## पुलवामा, बालाघाट व सॅटेलाईट

केंद्रातल्या मोदी सरकारला जनतेचे प्रश्न सोडविण्यात व आश्वासने पूर्ण करण्यात शंभर टक्के अपयश आल्यामुळे जनतेत प्रचंड नाराजी आहे. जनता भाजप व एनडीएच्या विरोधात आहे. त्यामुळे तिथून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी पाकिस्तानशी युद्ध



करण्याचे नाटक मोदी सरकार करेलच ही जनतेच्या मनात पक्की खात्री होती. ती संधी पुलवामा हल्ल्याच्या निमित्ताने मिळाली. त्यातून बालाकोटवर हल्ला केल्याचे व उपग्रह पाडण्याची यंत्रणा यशस्वीपणे उभी केल्याचे श्रेय मोदी लाटू पाहात आहेत. पण बालाकोटच्या हल्ल्यासंबंधी विरोधकांनी प्रश्न उपस्थित केल्यावर त्यांची उत्तरे न देता दुसराच कांगावा चालविला आहे. राफेल विमानांच्या खरेदीत 36 हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला. त्यातून चौकीदार चोर आहे असा प्रचार जगभर झाला. 550 कोटींचे विमान 1600 कोटींना का घेतले याचे उत्तर संसदेच्या सभागृहात व बाहेरही देण्याचे धाडस अजूनही मोदींना झाले नाही. उलट या व्यवहाराची कागदपत्रे चोरीला गेली असे सरकारतर्फे निर्लज्जपणे सर्वोच्च न्यायालयात सांगण्यात आले. ज्या पंतप्रधान मोदींनी हा राफेल करार स्वतःच्या अधिकारात केला व स्वतःच्या घरी ती फाईल ठेवली होती. ती कागदपत्रे पंतप्रधानांच्या घरातून कशी चोरीला जातात? जे मोदी महत्त्वाची कागदपत्रे सांभाळू शकत नाहीत ते देशाचे व जनतेचे काय संरक्षण करणार? आणि मग हा चौकीदार खरंच सक्षम, प्रामाणिक आणि दक्ष आहे का? असा प्रश्न कुणी विचारला तर त्याचे उत्तर मोदींकडे आहे का? पुलवामात 49 भारतीय जवान शहीद झाले. काय मोदींनी केले? हा प्रश्न जनतेने विचारला तर त्यात जनतेचे काय चुकले? अहंकाराच्या हवेने भरलेला फुगा कितीही उंच गेला तरी एक ना एक दिवस तो फुटतोच. मोदींचा फुगा या लोकसभा निवडणुकीत फुटणार आहे. जनता शांत आहे याचा अर्थ ती मूर्ख, बावळट, अडाणी, अज्ञानी आहे असा कृपा करुन कुणी लावू नका. ही वादळापूर्वीची शांतता आहे एवढी खूणगाठ मनाशी नक्की बाळगा. धैर्याने व निर्भयपणे मतदानाला जाऊन जनता हुकूमशहाची मस्ती व सत्तेचा नादानपणा मोडून काढल्याशिवाय राहणार नाही. अनेक भल्याभल्यांना जनतेने त्यांची जागा योग्य वेळी दाखविली आहे. त्या नेत्यांच्या तुलनेत मोदी तुम्ही खूपच चिल्लर आहात. त्यामुळे जनता तुम्हालाही सत्तेवरुन खाली खेचण्यास मागेपुढे पाहणार नाही एवढी खूणगाठ मनाशी नक्की बाळगा. मोदी साहेब, आजपर्यंतच्या सर्व पंतप्रधानांशी तुलना करता तुमची जास्त कामगिरी विध्वंसक स्वरुपाची, लोकशाही व सार्वभौमत्वाला धक्का पोहोचविणारी, व्यक्तिस्वातंत्र्यावर हल्ला करणारी, राज्यघटना बासनात गुंडाळणारी, कायदेशीर संस्थांची बसलेली घडी उध्वस्त करुन संस्थांची मोडतोड व दुरावस्था करणारी आणि खुनशीपणाने अत्यंत खालच्या पातळीचे राजकारण करणारी अशा प्रकारची झाली आहे. जनतेला अपेक्षित असा कारभार तुम्ही मागील पाच वर्षात करु शकला नाहीत. खूप मोठ्या अपेक्षेने व विश्वासाने एक नवा पर्याय म्हणून जनतेने तुमच्या हाती प्रचंड बहुमत देऊन सत्ता सोपविली होती. परंतु जनतेच्या इच्छा व अपेक्षांना तुम्ही हरताळ फासला. तुम्ही ढोंगी व दांभिक निघालात. पंतप्रधान म्हणून तुम्ही नापास झाला आहात अशी मोहोर जनतेने मनोमन तुमच्यावर उमटविली आहे. त्याचे दर्शन निवडणुक निकालानंतर तुम्हालाही होईल.



# शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देणार

# महिलांना संसदेमध्ये ३३% आरक्षण

# मुलींना पदव्युत्तरपर्यंतचे शिक्षण मोफत

# तिहेरी तलाक कायदा सुधारणार




**राष्ट्रवादी काँग्रेसने जाहीरनामा तयार करण्यासाठी महाराष्ट्राचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व विधानसभेचे माजी अध्यक्ष आदरणीय आमदार दिलीप वळसे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. एकंदरीत 23 सदस्य या समितीमध्ये होते आणि समितीने चार बैठका घेऊन हा जाहीरनामा तयार करण्यात आला. या जाहीरनाम्याचे प्रकाशन २५ मार्च रोजी मुंबईत दिलीप वळसे पाटील, नवाब मलिक, हेमंत टकले, शिवाजीराव गर्जे, डॉ. सुधीर भोंगळे, डॉ. समीर दलवाई, विश्वास ठाकूर, संजय तटकरे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी दिलीप वळसे पाटील यांनी केलेले हे निवेदन.**

# राष्ट्रवादीच्या जाहीरनाम्यातील ठळक बाबी

सर्व पत्रकार मित्रांचं मनापासून स्वागत. आभार. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या लोकसभा निवडणुकीच्यासाठीच्या जाहीरनाम्याची भूमिका मांडण्याच्या दृष्टिकोनातून आज या पत्र परिषदेचं आयोजन करण्यात आलेलं आहे. आपल्या सगळ्यांच्या साक्षीनं जाहीरनामा मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये याठिकाणी प्रसिद्ध झालेला आहे. हा राष्ट्रीय जाहीरनामा असल्यामुळं आज याच वेळेला दिल्लीमध्ये पक्षाचे ज्येष्ठ नेते डी. पी. त्रिपाठी यांच्यादेखील प्रमुख उपस्थितीमध्ये दिल्लीच्या कार्यालयामध्ये जाहीरनाम्याचं प्रकाशन झालेलं आहे. मी जाहीरनाम्याची प्रत आपल्याला उपलब्ध करून दिलेली आहे.

विशेष करून आपण जर जाहीरनाम्याचं कव्हर आणि कंटेन्ट पाहिले, तर मेनली राष्ट्रीय मुद्दे कव्हर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आमची जी टॅगलाईन आहे, 'आओ मिल के देश बनाये', याचा अर्थ इनक्लुझिव्ह डेव्हलपमेंट असा आहे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला इनक्लुझिव्ह डेव्हलपमेंट अपेक्षित आहे. दुसरी एक भूमिका आम्ही मांडलेली आहे, की 'हमारा, आपका, हम सब का भारत', याचा अर्थ या देशामधल्या सर्व जाती, धर्म, भाषा, प्रांत एकत्र होणं आवश्यक आहे. त्यांना सगळ्यांना घेऊन सगळ्यांचा भारत ही संकल्पना आम्ही डोळ्यासमोर ठेवलेली होती.

या जाहीरनाम्यामध्ये शेतकरी, युवा, महिला या वर्गावर विशेष फोकस आम्ही केलेला आहे. आणि आघाडी सरकारच्या काळामध्ये जे काही कार्य झालं, त्याच्या संदर्भामध्ये देखील समावेश करण्यात आलेला आहे. मी सुरूवातीला काही मुद्दे आपल्यासमोर ठेऊ इच्छितो, की मागील लोकसभा निवडणुकीमध्ये एनडीएने आपल्या जाहीरनाम्यामध्ये केलेल्या दाव्यानुसार, भ्रष्टाचार समूळ नष्ट होण्याच्या ऐवजी भांडवलशहांशी केलेल्या गळामैत्रीचं नवं रूप या देशानं पाहिलेलं आहे. भ्रष्टाचारानं बरबटलेल्या राफेल खरेदी व्यवहाराने अवघ्या देशाच्या विवेकबुद्धिला हादरे बसलेले आहेत.

आज देशामध्ये गेल्या पाच वर्षामध्ये घटनात्मक स्वायत्त संस्थांची तोडफोड करण्याचं काम सुरू आहे आणि एनडीए सरकारच्या मिस मॅनेजमेंटमुळं आज आपल्या देशावर काही संकटं उद्‌भवलेली आहेत. त्याच्यामध्ये शेती




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

आणि शेतकऱ्यांची अतिशय हलाखीची परिस्थिती आहे. अर्थव्यवस्थेचा वेग मंदावलेला आहे. बेरोजगारीमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. देशावरील कर्जामध्ये दुपटीने वाढ झालेली आहे. किंमती वाढल्यात. महागाई वाढलेली आहे आणि भरकटलेल्या परराष्ट्र धोरणामुळं राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झालेला आहे.

एनडीए सरकारच्या काळामध्ये नोटाबंदीचा जो निर्णय घेतला गेला, त्यामुळं या देशाची मोठी दुर्दशा झालेली आहे आणि बेरोजगारीनं गेल्या 45 वर्षांमधला निचांक गाठलेला आहे. कृषि उत्पन्नाच्या स्थिर आणि विद्यमान किंमतीमध्ये लक्षणीय घट झाली असून, त्याने गेल्या 14 वर्षांतला निचांक गाठला आहे. परिणामी 40 कोटी तरूण बेरोजगारीच्या खाईमध्ये लोटले गेलेले आहेत. प्रचंड नाउमेद झालेला आहे. जात, संप्रदाय आणि धर्माच्या आधारे समाजात दुही माजवून त्याचा उपयोग स्वत:च्या लाभासाठी तसेच निवडणुकीच्या यशासाठी करून घेण्याच्या एका राजकीय गटाच्या प्रवृत्तीमुळं भारतीय लोकशाही सध्या एका गहऱ्या संकटामधून जात आहे. विरोधाभासाची गोष्ट म्हणजे, राष्ट्रवादाचा वापर लोकांच्यामध्ये फूट पाडण्याच्यासाठी केला जातोय आणि अगदी आपलं मत उघडपणानं व्यक्त करणं हेदेखील धोकदायक ठरू लागलेलं आहे. सरकारच्या निर्णयांना आणि धोरणांना प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही असल्याचा ठप्पा मारला जातोय, त्यांच्यावर विश्वासघाताचा आरोप ठेवला जातोय. विद्यमान सरकार स्वत:वर झालेली कुठलीही टीका सहन करायला तयार नाही आणि कुणाचं काही ऐकून घ्यायला तयार नाही.




आज जी आवश्यकता आहे, ती आवश्यकता भारतीय घटनेचा आत्मा नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींना पराभूत करण्याची गरज आहे. एनडीएच्या सरकारनं देशाचा विश्वासघात केला आहे आणि संघटनात्मक संस्थांचा, संघटनांचा गैरवापर केलेला आहे. हे सरकार सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरले आहे. म्हणूनच एनसीपी आणि सर्वच विरोधी पक्षांनी देशाला वाचवण्याचा निर्धार केलेला आहे. आम्हाला माहिती आहे, की आमच्या पक्षाची शक्ती मर्यादित आहे. पण तरीसुद्धा देशासमोर असलेले खडतर आणि जटील प्रश्न सोडवण्याची क्षमता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे, याचं मुख्य कारण पक्षाला लाभलेलं माननीय शरदराव पवार साहेबांचं अनुभवी नेतृत्व. त्याच्यामुळं या महागठबंधनच्या माध्यमातून, महाआघाडीच्या माध्यमातून या देशामध्ये हा आमचा कार्यक्रम राबवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

सध्याच्या सरकारच्या काळात सर्वोच्च न्यायालय, रिझर्व्ह बँक, निवडणूक आयोग, सीबीआय, सीव्हीसी यांसारख्या महत्त्वाच्या आणि माननीय संस्थांच्या कारभारामध्ये बऱ्याचवेळेला हस्तक्षेप केला जात आहे. त्यामुळं कमालीची अस्वस्थता आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांनादेखील पत्रकार परिषद घेऊन आपल्या व्यथा त्याठिकाणी मांडाव्या लागल्या. आरबीआयच्या स्वायत्ततेला धोका निर्माण होतो की काय म्हणून आरबीआयच्या दोन गव्हर्नरनी आपले राजीनामे त्याठिकाणी दिले. म्हणून आम्ही या जाहीरनाम्याच्या माध्यमातून एक आश्वासित करू इच्छितो, की संस्थांच्या स्थैर्याला योग्य महत्त्व दिलं जाईल. कारण, कित्येक दशकांच्या प्रयत्नांमधून भारताने अशा संस्था उभारल्या आहेत. संस्थांची स्वायत्तता, अखंडता आणि त्यांची विश्वासार्हता जपण्याला सर्वाधिक प्राधान्य दिले जाईल आणि भारतीय वैविध्यतेचे संरक्षण केले जाईल.


आर्थिक विकासाच्या क्षेत्रामध्ये निश्चलीकरणामुळे मोठी गती मंदावली आहे व या निर्णयाचा जीडीपीवर मोठा लक्षणीय परिणाम झालेला आहे. निश्चलीकरणामुळं 1 कोटी 80 लाख लोकांच्या नोकऱ्या गेलेल्या आहेत. आम्ही या विषयावर श्वेतपत्रिका प्रसिद्ध करू. वस्तू व सेवा कराची सदोष अंमलबजावणीसुद्धा आर्थिक विकास खुंटण्यास कारणीभूत ठरली आहे. आम्ही वित्तीय तूट जीडीपीच्या तीन टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचं लक्ष्य साध्य करू. दोन आकडी विकासदर गाठण्यासाठी अर्थव्यवस्थेमध्ये नवा उत्साह आणि आणि नवी उमेद आणण्यासाठी आम्ही आक्रमक अजेंडा बनवण्यासाठी

# जाहीरनाम्यातील ठळक मुद्दे

- घटनात्मक संस्थांची स्वायत्तता, अखंडता आणि विश्वासार्हता जपण्याला सर्वाधिक प्राधान्य
- एनडीए सरकारच्या नोटाबंदीच्या निर्णयावर श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली जाईल
- वित्तीय तूट जीडीपीच्या तीन टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचं लक्ष्य साध्य करू
- दोन आकडी विकासदर गाठण्याच्या दृष्टिने आक्रमक अजेंडा बनविण्यासाठी आश्वस्त आहोत
- संकटात असलेल्या हातमाग, यंत्रमाग उद्योगांकडे विशेष लक्ष पुरविले जाईल
- कृषि क्षेत्रात उत्पादकता, उत्पन्न आणि बाजारपेठेची उपलब्धता वाढवण्याकडं पूर्ण लक्ष देणार
- देशातल्या सर्वच शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊ
- खासगी गुंतवणूक, आर्थिक विकासदर, रोजगारनिर्मिती, कररचनासंदर्भात देशाला सक्षम बनवू
- कौशल्य विकासाचे कार्यक्रम घेऊन त्याला चालना देऊ
- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगावर भर देण्याचं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं ठरवलेलं आहे
- महिलांना संसदेमध्ये 33 टक्के आरक्षण देण्याच्यासाठी कटिबद्ध
- अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गियांच्या विकासासाठी राष्ट्रवादी बांधील
- सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळावी याच्यासाठी प्रयत्न केले जातील
- मुलींना शिशुवर्गापासून ते पदव्युत्तरपर्यंतचं शिक्षण मोफत पुरवण्याची भूमिका
- जागतिक दर्जाचं क्रीडा विद्यापीठ स्थापन केले जाईल
- आरोग्याच्या हक्काची हमी देणारा कायदा आम्ही अंमलात आणू
- अल्पसंख्याकांचे हित जपण्यासाठी सच्चर आयोगाच्या सूचनांचं पालन करण्यास बांधील
- तिहेरी तलाक, पर्सनल लॉ संदर्भात सुवर्णमध्य गाठण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस प्रयत्न करेल
- ज्येष्ठ नागरिक आणि वृद्धाश्रमातील वृद्धांसाठी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देणार
- परवडणारी घरं, पायाभूत सुविधा आणि नागरी सुविधा बळकट करण्याला प्राधान्य दिले जाईल
- संघटित आणि असंघटित कामगार वर्गाला सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्यास कटिबद्ध
- कररचना अधिक तर्कसुसंगत आणि सुटसुटीत करण्याच्या संदर्भातली पक्षाची भूमिका राहील.








आम्ही भर देऊ. सरकारी हॉस्पिटलचं आधुनिकीकरण केले जाईल. आरोग्याच्या हक्काची हमी देणारा कायदा आम्ही अंमलात आणू, ज्यायोगे देशातल्या सर्वसामान्य जनतेला अधिक चांगल्या आरोग्य सुविधा पुरवल्या जातील. आम्ही आयुर्वेद, युनानी आणि होमिओपॅथी या शाखांचा वैज्ञानिक ज्ञान शाखा व्यवसाय म्हणून पुरस्कार करू व त्याला आम्ही प्रोत्साहन देऊ.

अल्पसंख्याक समाजावर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. धर्माच्या नावाखाली केला जाणारा द्वेषपूर्ण गुन्ह्यांमध्ये मुख्यत: दलित, मुसलमान आणि ख्रिस्ती नागरिकांना लक्ष केले जात आहे. या घटनांमध्ये 2014पासून प्रचंड वाढ झाली आहे. अशा घटना टाळण्यासाठी फारसे प्रयत्नही झालेले नाहीत. सातत्यानं वाढणारी धार्मिक तेढ रोखण्यासाठी काही केले गेले नाही. इतकेच नाही तर सरकारी यंत्रणांचा पूर्ण पाठिंबाच या सगळ्या गोष्टींना आहे की काय अशा प्रकारची शंका निर्माण होते. अल्पसंख्याकांचे हित जपण्यासाठी आम्ही बांधील आहोत. यूपीए सरकारने सच्चर आयोग नेमला होता. त्यांच्या सूचनांचं पालन करण्यास आम्ही बांधील आहोत. अल्पसंख्याक समाजतल्या प्रत्येक मुलीला शिक्षण मिळावे यासाठी अनुक्रमे दहावी, बारावी आणि पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या मुलीच्या कुटुंबीयांना विशेष लाभ त्याठिकाणी दिले जातील.







तिहेरी तलाक, पर्सनल लॉ संदर्भात सुवर्णमध्य गाठण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस प्रयत्न करेल. यासाठी धार्मिक गुरू, सुधारणावादी मंडळी आणि समाजाच्या इतर घटकांसह समाजातील विविध वैचारिक गटांमध्ये संवाद घडवून आणला जाणार आहे. अल्पसंख्याक तरूणांना शिक्षण, क्रीडा, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारासाठी योग्य माध्यमे उपलब्ध करून देण्यावर विशेष लक्ष दिले जाईल. याच प्रकारच्या सुविधा महिलांनादेखील दिल्या जातील. सुयोग्य व स्वायत्त संस्थांना सहकार्य केले जाईल.

ज्येष्ठ नागरिकांसाठी एक विशेष कार्यक्रम हाती घेतला जाईल. ज्येष्ठ नागरिकांची मंडळं आणि वृद्धाश्रमातील वृद्धांसाठी वर्षातून एकदा मोफत वैद्यकीय शिबिर आणि औषधांचा पुरवठा केला जाईल. नोंदणीकृत ज्येष्ठ नागरिक संस्थांना आरोग्यासाठी आवश्यक अशी साधनं आणि उपकरणं घेण्यासाठी रूपये 25 हजार देण्यात येतील. नागरी विकासामध्ये शाश्वतता, सर्वसमावेशकता, तंत्रज्ञानाचा वापर आणि सुयोग्य शासन या सर्व गोष्टींचा त्याठिकाणी आग्रह धरण्यात येईल आणि शहरांचा विकास करण्यात येईल. परवडणारी घरं, पायाभूत सुविधा आणि नागरी सुविधा बळकट करणे याला प्राधान्य दिले जाईल.

या देशातला कामगार हा एक महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी संघटित आणि असंघटित अशा दोन्ही उद्योगांतील कामगार वर्गाला सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्यास कटिबद्ध आहे. व्यापार सुलभतेस आणखी प्रोत्साहन

मिळावे व नवे गुंतवणूकदार आकर्षित व्हावेत यासाठी आम्ही कामगार कायद्यामध्ये अर्थपूर्ण सुधारणा घडवून आणण्यासाठी पाठपुरावा करू. हे करताना कामगारांच्या हिताला प्राधान्यानं जपलं जाईल. भविष्य निर्वाह निधी कायद्याची काटेकोरपणानं अंमलबजावणी केली जाईल. कर सुधारणा करत असताना कररचना अधिक तर्कसुसंगत आणि सुटसुटीत करण्याच्या संदर्भातली आमची भूमिका राहील.

असं सांगितलं जातं, की जीएसटीमुळं सरकारचं उत्पन्न मासिक 1 लाख कोटी होईल. परंतु, वारंवार सांगूनदेखील हे अजून शक्य झालेलं नाही. आणि म्हणून आमची अशी भूमिका आहे, की जीएसटीचा जास्तीत जास्त दोन किंवा एक असा कररचनेचा दर त्याठिकाणी असला पाहिजे. त्याच्यासंदर्भातले डिटेल्स हे नंतर आपल्यासमोर मांडण्यात येतील.

आपल्याला हेच सांगू इच्छितो, की आमच्या या जाहीरनाम्याचा उद्देश अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला बाहेर काढणं, अर्थव्यवस्था सुधारणं, बेरोजगारी कमी करणं, महागाई कमी करणं, भ्रष्टाचार कमी करणं आणि या आमच्या निवडणुकीमधल्या जाहीरनाम्याचा उद्देश आणि पक्षाचं धोरण, की ज्याच्यावर शेतकरी, युवा आणि महिला यांना केंद्रबिंदू मानूनच आम्ही ही निवडणूक लढवत आहोत. त्याच्यासाठी हा जाहीरनामा आपल्या सगळ्यांच्यासमोर






सादर केलेला आहे.

**यावेळी झालेली प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे**

**प्रश्न : संपूर्ण कर्जमाफी ही कोणत्या वर्षापासून असेल, याविषयी काही ठरले आहे का?**

**वळसे पाटील :** आमचा पक्ष मर्यादित जागा लढवतोय हे आम्हाला माहिती आहे. परंतु, देशामध्ये ज्यावेळेला यूपीएचं सरकार येईल, त्यावेळेला लवकरात लवकर त्याच्या संदर्भामध्ये कर्जमाफीच्या संदर्भातला निर्णय आम्ही त्याठिकाणी घेऊ आणि शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळवून देऊ. ज्या वेळेला शेतकरी सलग तीन-तीन, चार-चार वर्षे अडचणीत असताना त्याला ज्या गोष्टीची आवश्यकता असते ती गोष्ट त्याला उपलब्ध करून द्यावी लागते. आणि म्हणून शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या संदर्भातली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ही भूमिका आहे.

**प्रश्न : तिहेरी तलाकसंदर्भातील भूमिका विस्ताराने सांगाल का?**

**नवाब मलिक :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर तीन तलाकची जी प्रथा आहे ती बेकायदा झालेली आहे. मात्र सरकार ज्या पद्धतीने कायदा राबवू पहात आहे, लोकांना तुरूंगात टाकू इच्छिते आहे. याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही कधीच मान्यता दिलेली नाही. निश्चितपणे समाजातील सर्व घटकांना बोलावून कशापद्धतीने बेकायदा ठरवलेल्या प्रथेची अंमलबजावणी केली



जाईल यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस प्रयत्न करेल आणि त्यासाठी नवीन मार्ग काढेल.

**प्रश्न : जाहीरनाम्यात पाकिस्तानशी चर्चा करू आणि दहशतवादासंबंधी चर्चा करू. मात्र, अनेक लोकांची इच्छा आहे, की पाकिस्तानशी चर्चा केली गेली नाही पाहिजे.**



**नवाब मलिक :** पंतप्रधान स्वत: संदेश पाठवत आहेत. म्हणजे पंतप्रधानांनी चर्चेची सुरूवात केलेली आहे. सुषमाजींनी ट्रेनची सुरूवात केली, कर्तारपूर कॉरिडोअरवर चर्चा झाली आहे. तेव्हा आमची इच्छा आहे, की दहशतवाद नष्ट व्हावा. त्यासाठी सर्व पातळीवर आम्ही प्रयत्न करू.

**प्रश्न : मुख्यमंत्र्यांनी आम्ही चार वर्षात काय केले आणि तुम्ही पंधरा वर्षात काय केले याचे आकडे घेऊन येण्याचं आव्हान दिलं आहे. हे आव्हान राष्ट्रवादी स्वीकारणार आहे का?**

**वळसे पाटील :** मला असं वाटतं, की आज आम्ही आमचा जाहीरनामा आपल्यासमोर मांडलेला आहे. बाकीचे अन्य जे काही विषय असतील, त्याबाबत पत्रकार परिषद घेऊन नवाब मलिक साहेब त्याची उत्तरे देतील.




**प्रश्न : राहुल गांधींनी 20 कोटी लोकांना महिना बारा हजार रूपये देण्याची घोषणा केली आहे. त्याविषयी आपल्या पक्षाची भूमिका काय आहे?**

**नवाब मलिक :** काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षांनी आज जी काही घोषणा केलेली आहे, किमान उत्पन्न हमीच्या बाबतीत त्याचे आम्ही स्वागत करतो. काळाची गरज आहे. देशात अंतिम उभा राहिलेला जो घटक आहे, तो कुठेतरी अस्वस्थ आहे. त्याची कुठेतरी इन्कम झाली पाहिजे, आणि ती जी घोषणा आहे त्याला आमचा पाठिंबा आहे. देशात सध्या सुटाबुटातील व्यक्तींना मजबूत करण्याचा कार्यक्रम राबविला जात आहे. देशाची सर्व संपत्ती मोजक्याच लोकांकडे जात आहे. अशा परिस्थितीत संपत्ती, उत्पन्नाचे विकेंद्रीकरण व्हावे यासाठी जो कार्यक्रम जाहीर होईल त्याला आमचा संपूर्ण पाठिंबा असेल.

**प्रश्न : भाजपने एवढा पैसा कुठून आणणार असा प्रश्न विचारला आहे.**

**नवाब मलिक :** भाजप ज्या पद्धतीने प्रश्न विचारत आहे, 70 वर्षांपासून देशावर 52 हजार कोटी रूपयांचे कर्ज होते. मोदी सरकारने पाच वर्षात 32 लाख कोटी रूपयांचे कर्ज केले आहे. देशातील भांडवलदारांना कुठेना कुठे पूर्णपणे मेहरबानी दाखवलेली आहे. पैसा कसा येईल, कसा दिला जाईल, निश्चितपणे कार्यक्रम बनविला जाईल. आम्ही देशात पूर्णपणानं समाजवादी व्यवस्था लागू व्हावी, भांडवलशाहीला चालना देण्याऐवजी गरीबांना न्याय देण्याची भूमिका आमच्या येणाऱ्या सरकारची असेल.

**प्रश्न : तुम्ही म्हणालात, की 1 कोटी 80 लाख लोक बेरोजगार झाले. हा आकडा कुठून आला?**

**नवाब मलिक :** हे आकडे सरकारी आहेत. नोटाबंदीनंतर असंघटित क्षेत्रात काम करणारे जे लोक होते, छोटे व्यावसायिक होते, ते नोटाबंदी आणि जीएसटीनंतर मोठ्या प्रमाणावर बेरोजगार झाले आहेत.

**प्रश्न : मराठा आणि धनगर आरक्षणासंदर्भात काय सांगाल?**

**नवाब मलिक :** हा राज्याचा विषय आहे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा हा जाहीरनामा देशाचा जाहीरनामा आहे. हा जाहीरनामा दिल्लीहूनही प्रसिद्ध झालेला आहे. काही दिवसांमध्ये आता विधानसभेची निवडणूक येईल. तेव्हा राज्याचा जाहीरनामा आम्ही प्रसिद्ध करू.



# ५६ इंचाची छाती

**मा. शरद पवार साहेबांचे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रभर पोहोचविण्याचे काम आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांनी केले. कऱ्हाड ही चव्हाण साहेबांची कर्तृत्वभूमी. या भूमीने महाराष्ट्राला दिशा दाखविली. त्याची आठवण म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस- काँग्रेस व मित्र पक्षांच्या महाआघाडीच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची सभा सातारा जिल्ह्यातील कराड येथे झाली. त्यावेळी शरद पवार यांनी केलेले मार्गदर्शन...**

सभेची सुरवात महाराष्ट्रातून कुठून करावे, याची चर्चा आमच्यात सुरू होती. कोणी सांगितले की, कोल्हापुरातून अंबाबाईचे दर्शन घेऊन भाजपवाले सुरवात करत आहेत. कोणी सुचवले की, तुळजापुरातून आपण या सभेची सुरवात करावी. पण माझं जाहीर सभेतले भाषण पहिले करण्याचा विचार माझ्या मनात आला, त्यावेळी मला एका गोष्टीचे स्मरण झाले, महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणामध्ये गेले 52 वर्षे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणामध्ये निवडून जाण्याची संधी मला ज्या महाराष्ट्राने दिली आणि महाराष्ट्रामध्येही माझं व्यक्तिमत्त्व लोकांमध्ये पोचविण्याचे काम कोणी केले असेल, तर ते कैलासवासी यशवंतराव चव्हाणांनी केले. आणि यशवंतराव चव्हाणांची कर्तृत्वभूमी, कृष्णा आणि कोयनेच्या संगमाची ही भूमी. महाराष्ट्राला दिशा दाखविणारी ही भूमी आज छत्रपतींच्या निवडणुकीची सुरवात करायची असेल, तर चव्हाणसाहेबांच्या



# काय कामाची? शरद पवार यांचा सवाल

या नगरीपासून केली पाहिजे म्हणून मी आज आपल्या सर्वांच्या समोर उभा आहे.

अनेकांनी देशासमोरचे प्रश्न मांडले. गेली पाच वर्षे मोदींचे सरकार जवळून पाहिले. सत्तेचा गैरवापर कसा केला जातो, याची उदाहरणे पाहिली. फसवणूक कशी केली जाते, हे आम्ही पाहिले. त्यामुळे आपल्याला जी मालिका आपण सगळ्या वक्त्यांच्या भाषणातून ऐकली फसवणुकीच्या संबंधीची. धोका देण्याच्या संबंधीची त्याबद्दल अधिक सांगण्याची गरज नाही.

नोटाबंदीचा उल्लेख केला. लाखो लोकांचे धंदे बुडाले. लाखो तरुण बेकार झाले. शेतकरी उद्ध्वस्त झाला आणि नोटाबंदीच्या माध्यमातून जो काळा पैसा बाहेर काढण्यासंबंधीची जी घोषणा केली होती, ती शंभर टक्के खोटी ठरली. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न या ठिकाणी मांडला. मोदींच्या राजवटीमध्ये दोन वर्षाच्या काळामध्ये या महाराष्ट्रामध्ये 12 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मी शेती मंत्री असतानाही आत्महत्या झाली. माहिती आम्हाला कळली. माहिती घेतली. आणि त्या दिवशी मी देशाचे पंतप्रधान त्यावेळेचे मनमोहनसिंग यांच्याकडे गेलो आणि त्यांना सांगितले की, महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यानी आत्महत्या केली. त्याची कारणे आपण समजून घेतली पाहिजे. या देशातील कोट्यवधी लोकांचा भुकेचा प्रश्न सोडविणारा हा बळीराजा आत्महत्या करतोय. आपल्याला काही तरी धोरणात बदल केला पाहिजे. आणि म्हणून मग त्यांना विनंती केली. आपण जाऊया. मनमोहनसिंगांनी सगळे कार्यक्रम रद्द केले. दुसऱ्या दिवशी आम्ही दिल्लीवरून नागपूरला आलो. नागपूरहून यवतमाळला आलो. ज्याच्या घरात आत्महत्या झाली होती, त्या गावी जाऊन त्या माऊलीला भेटलो. डोळ्यात पाणी होते. त्या माऊलीला म्हणालो. काय झाले माऊली. का तुझ्या मालकाने आत्महत्या केली. तिने सांगितले की, माझा मालक

कर्जबाजारी झाला. बँकेचा थकबाकीदार झाला. बँकेची नोटीस आली. घरातील भांडीकुंडी काढण्यासंबंधीची नोटीस होती. वीस वर्षांची मुलगी आहे. तिचे लग्न ठरले होते. 15 दिवसांनी लग्न होणार होते. त्या लग्नाच्या आधी बँकेच्या जप्तीसाठी अधिकारी घरी आले. त्या लग्नासाठी दहा- बारा हजार रुपये किडूकमिडूक विकून ठेवले होते. ते जप्त केले. भांडी काढली. माझ्या अब्रूचा पंचनामा झाला. माझ्या नवऱ्याला झोप येईना. उद्या मुलीचे लग्न मोडले तर कोणाच्या तोंडाने समाजाकडे जाऊ याची चिंता होती, म्हणून रात्री विष प्याला आणि जीव दिला. हे कशामुळे घडले. कर्जबाजारीपणा, सक्तीची वसुली. आणि म्हणून आम्ही दोघेही दिल्लीमध्ये गेलो आणि निकाल घेतला की, या देशातील शेतकऱ्याच्या डोक्यावरचे कर्ज माफ केल्याशिवाय गप्प बसायचे नाही. मग दहा दिवसांच्या आत 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज एक हुकुमाने माफ केले. आणि त्या शेतकऱ्याला बाहेर काढले. त्याच्या व्याजाचे दर कमी केले. त्याला अधिक पैसे दिले. आणि त्याचा परिणाम असा झाला की, या देशातील बहाद्दर शेतकऱ्यांनी तांदूळ असेल, गहू असेल, साखर असेल, कापूस असेल पहिल्या दोन क्रमांकांमध्ये या देशाला आणले.

आजचे सरकार काय करत आहे. आज कांदा उत्पादक स्वतःला कांद्यात गाडून घेत आहे. आजच्या वर्तमानपत्रात जाहीर झाले की, उत्तर प्रदेशात उसाचे पैसे देण्यात आले नाहीत. ती थकबाकी 10 हजार कोटींवर गेली आहे. अनेक ठिकाणी आज शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. त्याला मदत करण्यासाठी आजचे सरकार कुठल्याही प्रकारचे पाऊल टाकत नाही. आम्ही ही चर्चा केली. देशातील महत्त्वाच्या व्यक्तींशी चर्चा केली. ज्यांच्या हातात देशाचा कारभार आहे त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी मला सांगावं काय, पवारसाहब आप पैदा करनेवाले की बात करते है, मगर जो खानेवाला है उसकी बात नही करते. मी त्यांना असं सांगितले की, खाणाऱ्याला जर हे सगळे द्यायचे असेल तर जो हे सगळे उत्पन्न करतो, तो जगवला पाहिजे. उत्पन्न करणारा शेतकरी उद्ध्वस्त झाला तर आपल्याला परदेशातून धान्य आणायला लागेल. मला आठवतंय की, 50 वर्षापूर्वी मी पहिल्यांदा महाराष्ट्राच्या विधानसभेत गेलो, त्यावेळी दुष्काळ पडला आणि त्यावेळीच्या सरकारने अमेरिकेतून लाल मिलो आणला. आम्हा लोकांच्या घरामध्ये लाल मिलोची भाकरी तयार होत होती. ही भीक मागण्याची अवस्था या देशावर आली होती. कशामुळे आली, तर शेतकऱ्याला मालाची किंमत मिळाली नाही म्हणून.

आणि म्हणून आम्ही त्यांना सांगितले की, तुमचे हे धोरण चुकीचे आहे. पण, मोदी सरकार हे धोरण बदलायला तयार नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मी 34 हजार कोटींची कर्जमाफी करतो. आज माहिती घेतली, 50 टक्के शेतकऱ्यांचीसुद्धा कर्जमाफी झाली नाही. आज पुन्हा त्याच्या डोक्यावर ओझं आहे. म्हणजे शेतकरी नाखूष. नोटाबंदीतून व्यापारी नाखूष. छोटा व्यावसायिक उद्ध्वस्त. ज्याचा उल्लेख पृथ्वीराजांनी केला की, देशातील सर्वांत महत्त्वाच्या संस्था उद्ध्वस्त करण्याची भूमिका घेतली गेली. न्यायालय असेल, सीबीआय असेल, रिझर्व बँक



**कऱ्हाड येथील कै. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या समाधीस्थळी जाऊन पुष्पचक्र अर्पण करताना शरद पवार, पृथ्वीराज चव्हाण, उदयनराजे भोसले, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, आनंदराव पाटील, जोगेंद्र कवाडे व इतर मान्यवर.**

असेल, रिझर्व बँकेचा गव्हर्नर यांनी नेमला आणि तो राजीनामा सहा महिन्यांच्या आत देऊन जातो आणि म्हणतो की, यांच्या मार्गदर्शनामुळे सरकारमध्ये काम करणे शक्य नाही. आज ते संबंध उद्‌ध्वस्त करण्याचे काम त्यांनी केले.



भ्रष्टाचार आम्ही घालवू. प्रधानमंत्री सगळीकडे जाऊन सांगत होते की, ना खाऊंगा ना खाने दुंगा. एक उदाहरण राफेलचे. जगातील ती मोठी कंपनी. फ्रान्समधील. त्या कंपनीमध्ये ही विमाने तयार केली जातात. ही बघण्यासाठी मी स्वतः संरक्षणमंत्री म्हणून आणि त्या वेळेचे संरक्षण खात्याचे सचिन व्होरा, आम्ही दोघे फ्रान्सला गेलो. ती विमाने पाहिली आणि विमानाच्या संबंधीची माहिती आमच्या हवाई दलाला विचारण्यासंबंधीची प्रक्रिया सुरू केली. मनमोहनसिंगांचे सरकार आले आणि हवाई दलाने ते विमान पसंत केले. पहिल्या विमानाची किंमत 350 कोटी सांगितली होती. 350 कोटीला मिळणारे विमान राज्य बदलले आणि मोदींचे राज्य आले. 2016 ला केंद्राच्या संरक्षण मंत्र्यांनी पार्लमेंट उत्तर दिले की, त्या विमानाची किंमत आता 350 कोटीवरून 600 कोटी झाली. आणि फेब्रुवारी 2017 ला त्याच विमानाची किंमत 1650 कोटी झाल्याच्या संबंधीची माहिती दिली. मोठी गंमत आहे. 350 कोटीचे विमान 1650 कोटीवर होतय. एवढं मोठं विमान घेतल्यानंतर सरकार करार करत, गॅरंटी घेतं. इथं गॅरंटीचा क्लॉज नाही. आपण विमान घेतो. तंत्रज्ञान घेतो. यशवंतराव संरक्षणमंत्री असताना त्यांनी या देशात विमान तयार करण्याचे कारखाने तीन ठिकाणी काढले. नाशिकला ओझरजवळ मीगचा कारखाना, बंगलोरला मीगचा कारखाना, लखनौला मीगचा कारखाना, यशवंतराव चव्हाणांनी हे कारखाने काढले आणि या देशामध्ये विमाने तयार व्हायला लागली. मीगचा कारखान्यात आज लोकांना काम नाही. अपेक्षा अशी होती की, राफेल खरेदी केल्यानंतर काही विमाने फ्रान्समधून आणली जातील, आणि बाकीची विमाने ही यशवंतराव चव्हाणांनी काढलेल्या कारखान्यातून तयार होतील. पण या सरकारनी सरकारच्या मालकीच्या कारखान्याला काम दिले नाही. अनिल अंबांनीच्या मालकीच्या कारखान्याला काम दिले. करार झाल्याच्या एक महिना आधी ही कंपनी स्थापन झाली. जमीन घेतली नागपूरला. इमारतीचं बांधकाम अजून सुरू नाही. मशिनरी नाही. तज्ञ लोक नाहीत आणि ते विमान तयार करण्यासंबंधीचे काम रिलायन्स कंपनीला देण्यासंबंधीचा निकाल मोदी सरकारने केला. ज्या रिलायन्सच्या मालकाने शाळेतील मुलं कागदाचे विमान करतात, तेही कधी केले नाही. त्यांना संरक्षण खात्याचे हवाई दलाचे विमान करण्यासंबंधीची अधिकार दिला. याचा अर्थ याच्यात काहीतरी गैर आहे. त्याबाबत अधिक सांगण्याची गरज नाही.

हा प्रश्न आम्ही संसदेत काढला. संरक्षण खात्याच्या मंत्री त्याच्यावर एक तास भाषण करत होत्या. आम्ही कागदपत्र मागितले. आम्हाला सांगितले, गुप्त आहेत. देशाच्या रक्षणासाठी ही माहिती बाहेर देणे आवश्यक नाही. सुप्रिम कोर्टामध्ये ज्यावेळी कागद मागितले, त्यावेळी सांगितले की, कागद चोरीला गेले. नंतर सांगितले, नाही नाही, चोरीला नाही गेले. संरक्षण खात्याच्या कपाटातून त्याची कॉपी कोणी तरी केली. आणि आता ती बाहेर गेली. एवढ्या महत्त्वाच्या कागदांची कॉपी केली जाते. प्रश्न आम्ही विचारला की, त्या संबंधी पोलिस स्टेशनला केस तरी केली का. आजअखेर त्या संबंधीची कुठलीही एफआरआय कुठेही केली नाही. याचा अर्थ स्वच्छ आहे की, ना खाऊंगा ना खाने दुंगा, या सगळ्या घोषणा खोट्या आहेत. इथं खाल्लेलं आहे. कुणी खाल्लय याची चौकशी करण्यासाठी पार्लमेंटची कमिटी नेमा म्हणून सांगितले, पण त्यांची संमती नाही.

मला आठवतंय की, बोफोर्सची तोफ घेतली. राजीव गांधी पंतप्रधान होते. आत सत्तेवर होते. त्यांनी त्यावेळेला चौकशीची मागणी केली. राजीव गांधींनी सगळ्या पक्षांच्या खासदारांनी कमिटी नेमली. चौकशी झाली. त्याच्यात काहीच निघालं नाही. पण चौकशीसाठी राजीव गांधी कधी घाबरले नाही. पण आजचे राज्यकर्ते चौकशी करण्याची मागणी केल्यानंतरही चौकशी

करण्यास तयार नाहीत. याचा अर्थ स्वच्छ आहे की, यांचे व्यवहार स्वच्छ राहिलेले नाहीत. ते उघड होतील म्हणून ते झाकून टाकण्याचे काम चालले आहे.

आज लष्कराच्यादृष्टीने, हवाई दलाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. या देशाच्या सैन्याच्या संबंधी तुम्हाला आणि आम्हाला अभिमान आहे. तुम्हाला ठाऊक असेल, चीनने आपल्यावर हल्ला केला. जबरदस्त किंमत द्यावी लागली. हा देश संकटात आला. त्या चीनच्या हल्ल्यातून या देशाला वाचविण्यासाठी, हिमालयाला वाचविण्यासाठी महाराष्ट्राचा सह्याद्री यशवंतरावांच्या रूपाने दिल्लीला गेला. आणि संरक्षण दलाची त्यांनी पुन्हा एकदा उभारणी केली. कारखाने काढले. शस्त्र बनवली. आणि देश मजबूत केला. यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री असताना पुन्हा एकदा पाकिस्तानने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. आणि लाल बहादूर शास्त्री प्रधानमंत्री असताना चव्हाणसाहेबांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानला जबरदस्त उत्तर दिले. पाकिस्तानचे हजारो सैनिक अटक केले. आणि भारताच्या सैन्य दलाची ताकद काय आहे, हे दुनियेला दाखविण्याचे काम या देशातील जवानांनी केले. आणि त्यांचे नेतृत्व यशवंतराव चव्हाणांनी केले. हा इतिहास तुमच्या माझ्या पुढे आहे.



नंतरच्या काळात पुन्हा एकदा पाकिस्तानने आपल्या देशात घुसखोर घातले. इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या. त्यांनी पाकित्सानला विनंती केली की, हे घुसखोर आमच्या देशात येत आहेत. त्यांना आवरा. जगाला सांगितले की, या ठिकाणी घुसखोर येत आहेत. कोणी ऐकले नाही. इंदिरा गांधींनी निकाल घेतला आणि सैन्य पाठविले. सैन्य पाठवून इंदिरा गांधी बसल्या नाहीत. त्यांनी इतिहास नाही बदलला. तर या देशाचा भूगोल बदलला. एका पाकिस्तानचे दोन तुकडे केले. एक बांगलादेश आणि दुसरा पाकिस्तान. ही जबरदस्त कामगिरी देशाच्या नेतृत्वाने सैन्याच्या जोरावर केली. आज काय दिसतंय आपल्याला, सैन्य पडेल तो त्याग करायला तयार आहे. त्या त्यागाची किमतीतून राजकारण करण्याचे पाप आजचे राज्यकर्ते करत आहेत. ही चिंताजनक गोष्ट आहे.

गेल्या महिन्याच्या 16 तारखेला 2700 हून अधिकारी व जवान जम्मूवरून श्रीनगरला निघाले. त्यावेळी रस्त्यामध्ये एक जीप आली आणि त्या जीपने सैन्य दलाच्या बसला धडक मारली. त्या जीपमध्ये स्फोटके होती. त्या स्फोटकाचा स्फोट झाला आणि त्या बसमधील 40 जवान जागच्या जागी मृत्युमुखी पडले. जबरदस्त किंमत देशाला द्यावी लागली. कसं करायचं, याच्यासाठी बैठक बोलावली. सगळ्या पक्षाच्या लोकांना बैठकीला बोलावले. मी होतो. प्रधानमंत्री नव्हते. संरक्षणमंत्री नव्हते. पण आम्ही सगळे होते. गृहमंत्री होते. आम्ही स्वच्छ सांगितले की, तुमचे आणि आमचे राजकारणात भांडण आहे, ते राहील. पण जवानांची हत्या होण्याचे काम दहशतवाद्यांकडून होत असेल, तर त्या दहशतवाद्यांसंबंधी तुम्ही जो काही निर्णय घ्याल, त्या निर्णयाला आम्ही राजकारण न आणता आम्ही तुमच्या निर्णयाच्या पाठीशी राहू. जवानांच्या पाठीशी उभे राहू. मला आनंद आहे की, जवानांना अधिकार दिल्यानंतर दहशतवाद्यांवर हल्ला करून त्यांची घरे उद्ध्वस्त करण्याचे काम आपल्या हवाई दलाने केले. अभिमान वाटला हवाई दलाचा. हवाई दलाचे एक विमान पाडले गेले. ते पाडल्यानंतर त्यातील जो अधिकारी होता. विंग कमांडर अभिनंदन. त्याला पकडण्यात आले. जगामधल्या सगळ्या देशांनी करार केलाय की, युद्धामध्ये हल्ल्यामध्ये जर एखादा अधिकारी अटक केली, तर जीनिव्हा नावाच्या एका शहरामध्ये जगातील देशांनी करार केला आहे की, अटक केलेल्या व्यक्तीला सोडले पाहिजे.

अभिनंदनला अटक केली. जगातील सर्व देशांनी पाकिस्तानवर एक प्रकारचा दबाव टाकला. त्याला सोडले पाहिजे, कराराप्रमाणे असा आग्रह केला. शेवटी पाकिस्तानला जगाच्या दबावापुढे नमावे लागले. अभिनंदनची सुटका करावी लागली. अभिनंदन आला. सुटून आला. सर्व देशाला आनंद झाला. त्याचवेळी एक प्रकार घडला. काश्मीरमध्ये जवान आणि अधिकाऱ्यांचे एक हेलिकॉप्टर पाडले गेले. त्याच्यामध्ये स्क्वॉडन लीडर निनाद मांडवगणे हा आपल्या नाशिकचा. त्याचा मृत्यू झाला. मी नाशिकला होतो. नाशिकला हे दुःख कळल्यानंतर मी ठरवले की, निनादच्या घरी जावं. कुटुंबीयांचे सांत्वन करावे. कुटुंबीयांनी सांगितले की, माझा नवरा गेला, त्या भगिनीला मी सांगितले की, सरकारला काही सांगायचे असेल तर मी सांगते, ती म्हणाली, हात जोडून सरकारला सांगते की, देशाच्या रक्षणासाठी माझ्या नवऱ्याने प्राण दिले. त्या प्राणाचे राजकारण करू नका. त्याचा राजकीय फायदा





**शर्टची कॉलर उडवून डायलॉग म्हणण्याची छत्रपती उदयनराजेंची कृती देशभर व विशेषतः तरुण युवकांमध्ये खूप लोकप्रिय झाली असून या एका कृतीमुळे सगळीकडून त्यांना भाषणासाठी आमंत्रणे येत आहेत. भाषण संपवून जागेवर आल्यावर पवार साहेबांशीही त्यांनी हस्तांदोलन केले. कॉलर उडविण्याच्या राजेंच्या कृतीला साहेबांनीही खळखळून हसत दाद दिली.**

घेऊ नका. असं ती का म्हणाली. इथं जवानांनी त्याग केला. अभिनंदन अटक झाला. निनाद शहीद झाला. आणि प्रधानमंत्री सांगतात, 56 इंचाची माझी छाती. अरे तुझी 56 इंचाची छाती होती, तर त्या कुलभूषण जाधवांना दोन वर्षे पाकिस्तानने तुरुंगात डांबले आहे. त्याला सोडून आणायला तुझी 56 इंचाची छाती कधी पुढे आणली नाही. आणि सांगतात 56 इंचाची माझी छाती आहे. शौर्य दाखवले हवाई दलाच्या जवानांनी, हवाई दलानी.

या सातारा जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे की, या देशात व राज्यात सर्वांत जास्त जवान कोणाच्या जिल्ह्यात असतील तर ते या सातारा जिल्ह्यात आहेत. या सातारा जिल्ह्यातील कोरेगाव येथील एक जवान पुलवामामध्ये जखमी झाला. त्या जखमी जवानाची साधी चौकशीही प्रधानमंत्र्यांनी केली नाही आणि काल त्यांनी पाकिस्तानला शुभेच्छा पाठवल्या. आणि सांगतात की 56 इंचाची छाती असलेला माणूस देशाचे संरक्षण करतोय. अरे, गेलेल्या जवानासंबंधी माणुसकी दाखवण्याचे कामही तुम्ही करत नाही. आणि जवानांनी शौर्य दाखवले नाही. त्याचा लाभ तुम्ही घेता. तर माझी खात्री आहे की, या देशातील नागरिक तुम्हाला तुमची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही. आणि ती वेळ आता आलेली आहे. त्यासाठी तुम्हाला आणि मला पावले टाकायला लागतील.

अनेक ठिकाणी फसवले. धनगर समाजाला सांगितले, बारामतीमध्ये येऊन सांगितले. पाच वर्षांपूर्वी की, आमच्या हातात सत्ता द्या, सत्ता मिळाल्यानंतर एका आठवड्याच्या आत धनगर आरक्षणाचा प्रश्न आम्ही सोडवू. मराठा समाजास सांगितले तुमच्या आरक्षणाचा प्रश्न आम्ही सोडवू. मुस्लीम समाजाच्या आरक्षणाचा निकाल पूर्वीच्या सरकारने घेतला. त्याच्यावर अंमलबजावणी नाही. धनगरांना फसवले. मराठ्यांना फसवले. मुस्लिमांना फसवले. दलितांना फसवले. जवानांना फसवले. सगळीकडे फसवेगिरी.

आजच्या राज्यकर्त्यांचे वैशिष्ट्य काय, फसवेगिरी. म्हणून तुम्हाला आणि मला फसवून देशाचा राज्यकारभार करण्यासाठी जे कोणी पावले टाकतील, त्यांना तुम्ही धडा शिकविण्याचे काम केले पाहिजे. मला अभिमान आहे की, धडा शिकवायचा असेल तर दम असलेला प्रतिनिधी पाहिजे. ज्याच्या मनगटात दम आहे. ज्याच्या छातीत दम आहे. जो गरीब माणसावर अन्याय झाल्यावर पडेल ती किंमत द्यायला तयार आहे, असा उमेदवार उदयनराजेंच्या रूपाने तुम्हाला दिला आहे. त्यांना मोठ्या मतांनी विजयी करा आणि हा साताराचा छत्रपतींचा वंशज देशाच्या संसदेमध्ये पाठवून महाराष्ट्राचा नावलौकिक देशामध्ये करण्याची विनंती करतो.



# सरकार उलथवून टाका

## जयंत पाटील यांचे आवाहन

आता उदयन महाराजांनी कॉलर उडवलेली आहे. 50 टक्के प्रचाराचे काम झाले आहे. पण, मित्रांनो महाराष्ट्रामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उदयनराजे साताऱ्यात स्वतः उमेदवार आहेत. आणि भारतीय जनता पक्ष आण शिवसेना त्यांना पराभव करण्यासाठी जंग जंग पछाडायला लागले आहेत. ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावानी महाराष्ट्रात मते मिळवली. ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून सत्ता राबविण्याचे ठरवले, त्यात त्यांना अपयश आले. अशी लोकं साताऱ्यात छत्रपती उदयन महाराजांचा पराभव करण्यासाठी भाड्याने उमेदवार घेऊन निवडणूक लढायला लागले आहेत. राष्ट्रवादीने ज्यांना सहा वर्षे विधान परिषद दिली, त्या सहा वर्षात ज्यांना माथाडी कामगारांचे साधे प्रश्न सोडवता आले नाहीत. ज्यांना सत्तेच्या बाजूला जाण्याचा प्रयत्न करून आधी भाजपमध्ये गेले, तेच बाळ आता भाजपने शिवसेनेच्या ओट्यात घातले आहे.

आपल्या सर्वांना विनंती आहे की, भाजप आणि शिवसेनेचे पाप सांगण्यासाठी दोन तास लागतील. त्या तपशीलात मी आज जात नाही. पण, कालच काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अशोकरावजी चव्हाण साहेब, राजू शेट्टी साहेब आणि अनेक नेत्यांनी एकत्र येऊन पुरोगामी पक्षांना एकत्रित करून महाआघाडी केलेली आहे. ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रवादीचा कार्यकर्ता असेल, काँग्रेसचा उमेदवार असेल, त्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पूर्ण ताकदीने काम करेल. आणि जिथे राष्ट्रवादीचा उमेदवार असेल तिथे काँग्रेसचा कार्यकर्ता पूर्ण ताकदीने काम करेले, ही भूमिका घेऊन आपण दिल्ली आणि मुंबईतील शिवसेना-भाजप युतीचे सरकार उलथवून टाकण्यासाठी आपण काम करायला सुरवात केली आहे.

छत्रपती उदयन महाराज हा महाराष्ट्रातील युवकांचा आयकॉन आहे. आज माझ्याकडे पक्षाचा अध्यक्ष म्हणून छत्रपती उदयन महाराजांची अनेक निमंत्रणे आहेत. छत्रपती उदयन महाराजांना बीडला जायचे आहे. परभणीला जायचे आहे. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी त्यांना निमंत्रणे आहेत.

मागच्या पाच वर्षात आपण विरोधी पक्षात होतो. चार ठिकाणी कामे झाली असतील नसतील, पण महाराष्ट्रात जाऊन वातावरण बघितलं, तर महाराष्ट्रातला असा कुठला घटक नाही की, जो आज सध्याच्या सरकारवर नाराज नाही. शेतकरी असतील, शेतमजूर असतील, कामगार असतील, या राज्यातला दलित समाज असेल, अल्पसंख्याक असेल, धनगर समाज असेल, या सर्व समाजामध्ये आज या सध्याच्या सरकारबद्दल नाराजी आहे. या देशामध्ये या सरकारने सर्वोच्च बेकारी निर्माण केली. 45 वर्षात जेवढी बेकारांची संख्या झाली नाही, तेवढी मोंदीच्या काळात झाली. नोटबंदी आणि चुकीच्या पद्धतीने जीएसटी लाऊन या देशाच्या अर्थव्यवस्थेचा खेळखंडोबा नरेंद्र मोदींकडून झाला. या देशामध्ये आरबीआय असेल, सीबीआय असेल, या सगळ्यांचा वापर स्वतःची सत्ता टिकविण्यासाठी हे सरकार करतय आणि या देशातील सामान्य माणसांच्या प्रश्नाकडे ते दुर्लक्ष करतय. ते सरकार घालविण्याची आज तुम्हा आम्हाला गरज आहे. आज देशात जन्मलेल्या देशातील प्रत्येक मुलाच्या डोक्यावर 65 हजार रुपयांचे कर्ज

आहे. काँग्रेस राष्ट्रवादीच्या काळात देशावर 51 लाख कोटींचे कर्ज होते. आज नरेंद्र मोदींनी देशावर 82 लाख कोटींचे कर्ज देशावर केले आहे. प्रश्न माझा या शिवसेना- भाजपच्या मोदींना आहे की, 32 लाख कोटी रुपयांचे तुम्ही या देशात काय केले. या देशातील जनतेला 32 लाख कोटी रुपयांचा हिशोब नरेंद्र मोदी सरकारने देणे आवश्यक आहे. कारण, विकास तर आम्हाला कुठे दिसलेला नाही.

सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे की, आपण तो पाहिला का नाही, मला माहिती नाही. पण, संसदेसमोर पै आणि पै खर्च झालेला सांगायचा असतो. पण, या संसदेने एक लाख कोटी रुपयांचा खर्च न दाखवता या देशाच्या तिजोरीतून पैसे खर्च केले. आज मी नाही, या देशाचा सीएजीचा अहवाल सांगतोय, की भारत सरकारने 96 हजार 610 कोटी रुपये केंद्र सरकारने संसदेत न दाखवता खर्च केले.

अनेक मुद्दे आहेत. पण, आपणाला एवढीच विनंती करतो की, या मतदारसंघामध्ये आपण सगळ्यांनी उदयनराजेंच्या घड्याळाच्या चिन्हाला आशीर्वाद द्यावा. थोड्यावेळा पूर्वी मी कोल्हापुरातून जाऊन आले. कोल्हापुरात पाच जिल्ह्यातील गर्दी जमा केलेली आहे. यांना एका जिल्ह्यातील गर्दी जमा होत नाही. पण आज या उदयनराजेंच्या काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या सभेसाठी फक्त याच मतदारसंघातील गर्दी आहे. दुसऱ्या शेजारच्या पाजारच्या मतदारसंघातून एकही माणूस आलेला नाही. त्यामुळे या ठिकाणी इथे आमची जमलेली एका मतदारसंघाची गर्दी आपण समोर इतके बसलेला आहात. मी स्टेजच्या मागच्या बाजूने आलो. आदरणीय पवारसाहेब या स्टेजच्या मागच्या बाजूला काही हजार लोकं एलईडीच्या स्क्रीनवर ही सभा बघताना दिसत आहेत. म्हणून या देशातील शिवसेना- भाजपच्या सरकारला जाण्याची वेळ आलेली आहे. जनतेचा जनाधार फार मोठा आहे. उद्याच्या निवडणुकीत हे दिल्लीचे सरकार उलथवून टाकण्यासाठी आपण सर्वांनी आमच्या उदयनराजेंच्या पाठिशी आपला आशीर्वाद उभा करावा. हीच विनंती करतो.

---



# उदयनराजेंचा मीही चाहता

**रामराजे नाईक-निंबाळकर**

तरुणांनी विनंती आहे की, तुम्हाला जेवढं उदयन महाराजांचे भाषण ऐकायचे आहे, तेवढेच आम्हालाही ऐकायचे आहे. परंतु तुम्ही एकटेच नाहीत उदयन महाराजांचे चाहते. तुम्ही जेवढे उदयन महाराजांचे चाहते आहात, तेवढे आम्हीही आहोत. हा जिल्हा 1999 पासून पवारसाहेबांवर विलक्षण विश्वास टाकून काम करणारा जिल्हा आहे. मला कित्येक वेळा वाटते की, आमच्यासारखे मधले जे कार्यकर्ते असतात त्यांच्यापेक्षा पवारसाहेब या जिल्ह्यातील जनता आपल्यावर जास्त विश्वास टाकते. हे जाणीवपूर्वक मी गेली 20- 25 वर्षे बघतोय. उदयनराजेंची जी स्टाईल आहे, त्यामुळे उद्यनराजेंची क्रेझ ही या जिल्ह्यात कायम टिकलेली आहे. हे बघून मलाही आनंद झालेला आहे. परंतु, माझा मतदारसंघ हा माढा असल्यामुळे मी सातारा मतदारसंघात काही जास्त बोलत नाही.

सातारा, कऱ्हाड ही कै. यशवंतराव चव्हाण साहेबांची कर्मभूमी. आधुनिक महाराष्ट्राला विकासाची नवी दिशा चव्हाण साहेबांनी दिली. त्यांनी विकासाचा जो मार्ग आखून दिला तो पुढे नेण्याचे काम कै. वसंतदादा पाटील, कै. वसंतराव नाईक आणि शरद पवार साहेबांनी केले. पवार साहेब हे तर चव्हाण साहेबांचे वारसदारच मानले जातात. सर्वसामान्यांच्या विकासासाठी चव्हाण साहेबांनी आयुष्य वेचले.

आज उदयनराजेही त्याच मार्गावर वाटचाल करीत आहेत. त्यामुळे उदयनराजेंना माझ्यातर्फे, माझ्या कुटुंबियांतर्फे आणि पार्टीतर्फे आपल्याला खूप खूप शुभेच्छा. मागच्या सारख्या विक्रमी मतांनी आपण निवडून याल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. शुभेच्छा देतो.



# सरकारने लोकांना गाळात घातले

## श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले

या ठिकाणी उपस्थित असलेले आपण सर्व लोकशाहीतील राजे. ही लोकशाही आहे. आपण ती मान्य केली. लोकशाहीमध्ये दर पाच वर्षांनी निवडणुकीची प्रक्रिया चालू असते. मात्र, ज्यावेळेस पाच वर्षांनंतर निवडणुका जाहीर होतात, निवडणुका वेगवेगळ्या असतात. लोकसभेच्या असतात, विधानसभेच्या असतात, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या असतात. पण आपण विचार करायचा असतो की, आपण मतदान कोणाला आणि कशासाठी करायचे. कारण, या ठिकाणी व्यासपीठावर जे उपस्थित आहेत, ते एका विशिष्ट विचारानी उपस्थित आहेत. आणि लोकं ज्यावेळी एका विचाराने एकत्र येतात. त्यावेळी त्यांना एकत्र ठेवण्याकरिता कुठल्या ताकदीची गरज नाही. कारण, त्यांचे उद्दिष्ट हे एक असते. पण, ज्यावेळी लोकं स्वार्थासाठी एकत्र येतात, त्यावेळी स्वार्थासाठीच ते एकत्र येतात आणि स्वार्थ साधल्यानंतर वेगवेगळ्या दिशेने वाटचाल करतात. हे सांगण्याचे तात्पर्य की, गेल्या पाच वर्षापूर्वी ज्यावेळी निवडणुका जाहीर झाल्या, अत्यंत चांगल्या पद्धतीने लोकांची दिशाभूल केली गेली. हायटेक पद्धतीचा उपयोग करून, मग थ्री डायमेन्शन इफेक्ट, थ्रीडी इफेक्ट याचा वापर करून आणि चांगली वक्तव्ये करून लोकांची अशा पद्धतीने दिशाभूल करण्यात आली की, समोर बसलेल्यांना वाटले की, अरे वा. जर आपले कोण कल्याण करणार असेल तर हेच करू शकतात. त्यांनी लोकांना वाटेल ती आश्वासने दिली. या आश्वासनांना देशातील सर्व जनता बळी पडली. बेंबीच्या देठापासून ज्यावेळी त्यांनी वक्तव्ये केली. त्यावेळी लोकांना वाटले की, एवढं बोलतायेत म्हणजे नक्कीच करत असतील. पण ज्या तळमळीने बोलले या तळागाळातील लोकांसाठी या पाच वर्षाच्या काळामध्ये अवस्था जर पाहिली, ती केवळ महाराष्ट्रातीलच नाही तर सर्व देशातील तळागाळातील लोकांची अवस्था पाहिली, तर त्या लोकांचा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सोयीप्रमाणे विसर पडला आणि या पाच वर्षाच्या काळात अन्यायकारक निर्णय घेतले गेले. धोरणे राबवली गेली. आणि याच तळागाळातल्या लोकांना जास्तीत जास्त गाळात घालण्याचे काम करण्यात आले.

सुरवातीच्या काळात मलाही वाटले, चला काही तरी चांगले होतय. अपेक्षा होती. ठीक आहे, लोकांनी आता एवढे बहुमत दिले आहे. लोक आपला सकाळी रेडिओ लावायचे आणि रेडिओवर काय यायचे, मन की बात. मन की बात. मन की बातमध्ये काय असायचे. पण, निवडणुकीच्या आधी काय असायचे, आम्ही गरिबांच्या खात्यात 15 लाख रुपये जमा करू. आमचं सरकार आले तर शेतकऱ्यांची कर्ज माफ करू. आणि तिसरे की, आमचे सरकार आले तर, दोन कोटी लोकांना रोजगार देऊ.

सगळ्यांनी ऐकले पटापट जाऊन चकाचक मतदान केले. मतदान करून काय मिळाले. इल्ला. ही झाली त्यांची त्यावेळीची मन की बात. आता मी समाजासमोर समाजाची प्रतिक्रिया

मांडतोय. त्या समाजातीलच मी एक घटक आहे. त्या समाजाचे जसे तुम्ही घटक आहात, त्याच समाजाचे या व्यासपीठावरील मान्यवर ही घटक आहेत. ते म्हणायचे प्रत्येकाच्या खात्यात 15 लाख भरू. पण, आता लोकं म्हणतात की, ते म्हणतात खात्यातून 15 लाख काढून घेऊ. ते म्हणायचे की शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू आणि शेतकऱ्यांचे मत आहे की, ते आम्हाला कर्जात बुडवतील. त्यावेळी ते म्हणाले होते की, आमचे सरकार आले तर दोन कोटी रोजगार देऊ. पण त्यांनी दोन कोटीपेक्षा जास्त लोकांना बेरोजगार केलेले आहे.

या लोकांनी मेक इन इंडिया खाली जर काय केले असेल तर त्यांनी मेक नाही पण ब्रेक आर इंडिया हे काम या पाच वर्षात करण्यात आले. त्यामुळे या निवडणुकीकडे निवडणूक म्हणून पाहू नका. चळवळ म्हणून पहा. चळवळ म्हणून का पहा, तर उदयनराजेंना निवडून द्या म्हणून नाही. एवढा संकुचित विचार चालणार नाही. अजिबात करू नका. स्वतःचाही तुम्ही कधी तरी विचार केला पाहिजे.

आज त्यांनी निर्णय घेतलेले आहेत. त्यातून ते माघारही घेऊ शकत नाहीत. आणि घेतली तर त्याचा अर्थ काय निघतो की, त्यांनी चुकीचे निर्णय घेतले. त्यामुळे त्याचे समर्थन हे करत राहणार. त्यांचे खंडन करणे गरजेचे आहे. त्यासाठी फक्त महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण केंद्रात प्रत्येक ठिकाणी काँग्रेस, राष्ट्रवादी आणि मित्र पक्षांचे ज्या ज्या राज्यात असतील त्यांच्या पाठीशी उभे राहणे, ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. जोपर्यंत यांनी घेतलेले निर्णय आपण मागे घेत नाही. हे कधी होणार, जोपर्यंत सत्तांतर होत नाही. तुम्ही करणार नाही. तोपर्यंत हे निर्णय आपण बाजूला करू शकत नाही. तोपर्यंत जी परिस्थिती होत नाही. जी इंडस्ट्रीजची आज अवस्था आहे, म्हणजे दुरवस्था म्हटले तर काही वावगं ठरणार नाही. चांगलं चाललेले, सुरळीत चाललेले आज भकास अवस्थेत पाहायला मिळते. काय निर्णय घेतले, कशाकरिता निर्णय घेतले, कोणाच्या हिता करता आणि का. तेच कंट्रक्शनच्या बाबतीत. त्याच्यावर अवलंबून आहेत, सर्व इंजिनिअर, गवंडी, त्यानंतर बरेच असे कामगार आहेत, त्यांची वाईट अवस्था झाली आहे. अन्यायकारक जीएसटी लागू केला. त्यामुळे तर व्यापारी हतबल झालाय. शेतकऱ्यांच्या आत्महत्येत एवढी भर पडली आहे की, ज्याचे नाव ते. त्यामुळे शेतकऱ्यांची तर अशी अवस्था झाली आहे की, जन्म तो कर्जाघरी, जगतो कर्ज उरावरी, मरतो परी कर्ज उरी, तो भारतीय शेतकरी. आणि ही जर तर सत्तेत आपल्याला बदल पाहिजे. अवस्था शेतकऱ्याची बदलायची असेल, तर तुम्ही लोकशाहीतील राजे आहात. सगळं तुमच्या हातात आहे. त्यामुळे तुम्ही चांगल्या लोकांना निवडून द्या. चांगलं म्हणजे, जे लोकांचे हित जोपासतात. म्हणजे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षांचे, ज्या ज्या ठिकाणी उमेदवार आहेत. त्यांना तुम्ही निवडून द्या. या सत्तेत बदल करा आणि पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली, बाबांच्या मार्गदर्शनाखाली या राज्यात नाही तर या देशात एक चांगल्या प्रकारची सत्ता लहर तुम्हाला पाहायला मिळेल, असं मला आवर्जून सांगावेसे वाटतं.





माझ्या समोर मीडिया आहे. सोशल मीडिया आहे. प्रेस मीडिया आहे. आपण लोकशाहीचे चौथा स्तंभ आहात. आमचं आणि सर्वांचं भाषण एवढ्यापर्यंत मर्यादित आहे. ते लोकांपर्यंत पोचविण्याचे काम तुम्ही करत असता. त्यामुळे लोकांचे हित आपण पाहिले पाहिजे. लोकांचे  हित ज्यावेळी म्हणतो, त्यावेळी तुम्हीही या देशाचे नागरिक आहेत. देशाचे हित जोपासण्याचे काम केवळ माझे नाही. व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांचे नाही. इथं उपस्थित सर्व लोकशाहीतल्या राजांचे नाही. त्यांचे आणि आमचे सर्वांचे आहे. पण सर्वांत जास्त जर कोणाचे असेल, तर तुमचे आहे. तुमच्या हातात सर्व यंत्रणा आहे. तुम्ही लोकांपर्यंत पोचवले पाहिजे. नाहीतर सगळा प्रगतीचा मार्ग तर सोडून द्या, अधोगतीला पण सोडून द्या. देशोधडीला लागल्याशिवाय राहणार नाही. निर्णय जर आपण पाहिले तर या देशाची अवस्था अशी झाली आहे. पाच वर्षे म्हणजे काय थोडा कालावधी नाहीये. पाच वर्षे म्हणजे आज जी काही दुरवस्था झाली आहे, तिला पुन्हा सुधरावायची असेल, तर त्याला काळ बराच जाणार आहे. जर तुम्ही सगळ्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा ग्राफ पाहिला, तर फारसं बरं नाही. तर डळमळीत आहे. कोण सुखी आहे. मी एवढ्या करता म्हणतो की, हा ज्वलंत इश्यू आहे. याचे परिणाम लोकांसाठी चांगले किंवा वाईट असतील तर ते तुमच्या हातात आहेत. कारण, एखादा इश्यू असेल तर कृपा करून त्याचा नॉन इश्यू करू नका. तत्काळ ते बरं वाटतं. टीआरपी वाढतो. मी काय ते व्हॉट्सअप बिट्सअपवर नसतो. मला व्हॉटस डाऊन असतं. म्हणून ई 50 सारखा फोन वापरतो. मला काय या बाकीच्या भानगडी माहीत नसतात. पण मला एवढं माहिती आहे की, आज सर्वसामान्य माणसाची अवस्था वाईट आहे. तो अन्नाला मौताज आहे. आज उदरनिर्वाहसुद्धा करता येत नाही. अशी परिस्थिती आहे. त्याच्यातून जर सुटका करायची असेल, तर त्याची जबाबदारी जेवढी आमची सर्वांची आहे, तेवढीच उपस्थित सर्व तुमच्या सर्वांची आहे. सर्व जनतेची आहे. राज्यातील प्रत्येक व्यक्तीची आहे. मिडियाची आहे. मी आपल्याला हात जोडून कळकळीची विनंती करतो की, मनापासून सांगतो. काही गोष्टी अशा असतात की, त्या आपल्याला परत कधी मिळत नसतात. आपण 15 मिनीटांपूर्वी बोललो तो इतिहास झाला. म्हणजे वेळ ही कितीही आटापिटा केला तरी परत मिळू शकत नाही. एकदा वेळ गेली की, ती गेली. आणि मग गेल्या पाच

वर्षात लोकशाहीतल्या माझ्या राजांना कपाळावर हात मारून घेण्याशिवाय काही उरले नाही. तशी वेळ तुम्ही स्वतःची स्वतःवरती आणू नका. तशीच मिडीयाच्या सर्व प्रतिनिधींनी साथ द्या. लोकांचा उत्कर्ष पाहायचा असेल, तुम्ही ही शेतकरी किंवा सामान्य कुटुंबातील आहात. तुमचाही उत्कर्ष यातून झाला पाहिजे. फार मोठे व्हा. तुम्ही आर्थिक दृष्ट्या मोठे झाले की, सातारा जिल्हा सधन होईल. मग असे अनेक जिल्हा सधन झाले की, महाराष्ट्र सधन झाला. अशी प्रक्रिया राबवली तर संपूर्ण देश सधन झाला. तरच हा देश महासत्तेकडे वाटचाल करेल. तरच ते छत्रपती शिवाजी महाराजांना, चव्हाणसाहेबांना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले असे जे असंख्य आहेत, ज्यांनी आपल्या प्राणाची बाजी लावली. आपल्या प्राणाची आहुती दिली. या लोकांनी आपल्या आयुष्याचा श्वास मोजला. त्याकरता आपण त्यांना सार्थक होईल. आणि कोणी कोणाला सांगितले. आज आहे उद्या नाही. पण एक सांगतो जोपर्यंत आहे, तोपर्यंत हे सर्व जण तर आहेतच. पण ज्यावेळी मी बोलतो. त्यावेळी मी या सगळ्यांचा पाठिंबा असल्याशिवाय उगीच बोलणार नाही. या सगळ्यात पाठिंबा पवारसाहेबांचा आणि या सर्व मान्यवरांचा आहेच. पण मला सर्वांत जास्त पाठिंबा रामराजेंचा आहे, कॉलेजच्या दिवसापासून. खरं आहे. त्याला साक्षीदार सत्यजित पाटणकर आहेत. त्यामुळे एक सांगतो. तेव्हापासून मी कधी कोणावर अन्याय झालेला सहन केला नाही. त्यावेळेस केला नाही. आज नाही. भविष्यकाळात करू देणार नाही. सिनेमातील एक प्रसिद्ध डॉयलॉग आहे, **''एक बार मैंने जो कमिटमेंट करदी. तो में अपनी खुद की भी नहीं सुनता.''**





# उदयनराजेंना देशात एक नंबरनी निवडून आणणार

## शशिकांत शिंदे यांची ग्वाही

आज दोन सभा होत आहे. एक सभा कोल्हापूरला होत आहे. ती सभा युतीच्या पश्चिम महाराष्ट्राची होत आहे. आणि एक सभा फक्त सातारा लोकसभा मतदारसंघाची होत आहे. आज कराड हाऊसफूल झालेले आहे. मी सभेची तुलना करणार नाही. पण, आज ही होणारी शुभारंभाची सभा, चव्हाणसाहेबांच्या पुरोगामी विचारांनी निश्चिपणाने या जातीयवादी विचारांना बाजूला करण्याचा निश्चितपणाने काम करेल, असा विश्वास व्यक्त करतो. चव्हाणसाहेबांच्या विचारांचा देश आणि महाराष्ट्र घडावा.

गर्दीमुळे सर्वांची माफी मागतो. पण उमेदवारची क्रेझ आहे, त्याला मी तरी काय करणार. साहेब, आपल्याकडे दोन नेते असे आलेले आहेत. एक शिवाजी महाराजांचे वंशज आणि दुसरे संभाजी महाराज. एक छत्रपती उदयनराजे भोसले आणि दुसरे अमोल कोल्हे. महाराष्ट्रामध्ये शाहू, फुले, आंबेडकर आणि छत्रपतींचा विचार जर फिरवायचा असेल, आणि जे छत्रपतींच्या नावाचा वापर करून राजकारण करतायेत, त्यांना या देशातून हद्दपार करायचे असेल, तर या दोघांनाही या महाराष्ट्रात फिरवा आणि शाहू, फुले, आंबेडकर व चव्हाणसाहेबांचा महाराष्ट्र उभा करावा, हीच अपेक्षा व्यक्त करतो.

आपल्या सर्वांची उपस्थिती ही विक्रमी उपस्थिती आहे. मी आजच सांगतो, देशाच्या लोकसभेमध्ये अनेक राजे निवडून येतात. पण एक राजा हा विक्रमी मतांनी येतो, तो छत्रपती शिवाजी महाराजांचा तेराव वंशज उदयनराजे भोसले येतो. हा निश्चय या सभेच्या निमित्ताने आपण करूयात.

या सरकारच्या विरोधात बोलायला अनेक मुद्दे आहेत. पण ज्या ज्या वेळेला हुकूमशाही मोडायची असेल, त्या त्या वेळेला विरोधाच्या माध्यमातून संघर्ष करायचा असेल, त्या त्या वेळी उदयनराजे उभे राहिलेले आहेत. अनेक लोकांनी आमिषे दाखवली. पण जे पटत नाही, त्याच्या विरोधात उभे राहण्याचा प्रयत्न हा छत्रपती उदयनराजे यांनी केलेला आहे. जी आज देशाची परिस्थिती आहे. चौकीदार चौकन्ना है. मी म्हणतो, चौकीदार निकम्मा है. आज जर चौकीदार चौकन्ना है तर पुलवामाचा हल्ला झालाच कसा. आज जर चौकीदार चौकन्ना है तर राफेलची फाईल गहाळ झालीच कशी. आज जर चौकीदार चौकन्ना है तर नीरव मोदी आणि मल्ल्या परदेशी गेलेच कसे. देशाची तिजोरी लुटणाऱ्यांना पळण्यासाठी मदत करणाऱ्याला चोर आहे, असा जर नारा आता देशात व्हायला लागला आहे. त्यामुळे या चौकीदारासह राज्याचेही चौकीदार बदलले पाहिजे. त्याची सुरवात या साताऱ्याच्या चव्हाण साहेबांच्या भूमितून करतोय, याचा निश्चित आम्हाला अभिमान आहे. आज व्यासपीठावर महाराष्ट्रातील सगळी आघाडी एकत्र आलेली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न बोलले जातील. बेरोजगारांचे प्रश्न बोलले जातील. सर्वांचा विचार करा. पण, सामान्य माणसाचा नेता असला पाहिजे आणि सामान्य माणसाचे सरकार असले पाहिजे. त्यासाठी आजपासून प्रचाराचा शुभारंभ होतोय. इतकं काम कार्यकर्त्यांनी आणि जनतेने करावं.

पत्रकारांनी परवा एक बातमी टाकली. त्या बातमीत असे

सांगितले की, काही लोकं त्या ठिकाणी वेगवेगळ्या बातम्या पसरवत आहेत. काही लोकांचा वाद हा तात्पुरता वाद दाखवला जात आहे. मी या व्यासपीठावरून सांगतो की, आमचे दैवत फक्त शरद पवार आणि शरद पवार आहेत. आम्ही मरू शरद पवारांसाठी आणि जगूही शरद पवारांसाठी. साहेब, आम्ही शब्द देतो. पृथ्वीराज बाबा आम्ही शब्द देतो. आम्ही सगळे आमदार उदयनराजेंसाठी एकत्र येऊ आणि इतिहास घडवून दाखवू. आपल्या अपेक्षित असेल तो उमेदवार कोणीही असूदे. पण उदयनराजेंना विक्रमी मतांनी निवडून देऊ. आपल्याला विनंती करतो की, छत्रपतींचे तेरावे वंशज जेव्हा देशाच्या राजधानीत जातील. त्यावेळी ते देशात एक नंबरनी निवडून आले पाहिजे, एवढंच काम करा.



# सरकारला शेतकऱ्यांचा तळतळाट लागेल...

## राजू शेट्टी यांचा शाप

या संयुक्त पुरोगामी महाआघाडीच्या प्रचार शुभारंभानिमित्ताने आज खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा काय चालू आहे. हा एक धडधडीत पुरावा आहे, असं म्हटल तरी वावगं ठरणार नाही. अनेकांना वाटायला लागले की, या महाराष्ट्रात 2014 साली एक लाट तयार झालेली होती, अशीच लाट आता या वेळी तयार झालेली आहे. होय, ही गोष्ट खरी आहे. तशीच लाट या वेळीही तयार झालेली आहे. पण ती त्यांना पराभूत करण्यासाठी तयार झालेली आहे. कारण, ज्या पद्धतीने त्यांनी गेल्या पाच वर्षात या देशातल्या, या महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, गोरगरिबांचा अगदी व्यापाऱ्यांपासून उद्योजकांचा विश्वासघात केलेला आहे. त्यांच्या विश्वासला तडा दिला आहे. त्याची शिक्षा कधी करायची, याची वाट हा सगळा महाराष्ट्र बघत होता.

खरं म्हणजे, यांनी आम्हाला अच्छे दिनाचे स्वप्न दाखवलं. पण आमच्या वाट्याला अच्छे दिन काय आले नाहीत. पण, लुच्च्या माणसाचे दिन आमच्या वाट्याला आले. अशी अवस्था गेल्या पाच वर्षात झाली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन त्यांनी सांगितले की, आम्ही छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना आणलेली आहे. पण ती काही शेतकरी सन्मान योजना नव्हती. तर ती शेतकरी अवमान योजना होती. कारण, त्याचा महाराष्ट्रातील कोण्याही शेतकऱ्याला फायदा झाला नाही. 34 हजार कोटी रुपये देतो म्हणाले, पण 13 हजार कोटींवरती आकडा काही जायला तयार नाही. आणि त्यामध्ये मुंबईतील अनेक शेतकऱ्यांना लाभ मिळाल्याचे मी एकले. प्रत्यक्षात आमच्या खेडोपाड्यातील शेतकऱ्याला त्याचा काही लाभ झाला नाही. पण यांच्या ऑनलाईन पद्धतीने फार्म भरण्याचे आमची पुरती दमछाक झाली. सेतू केंद्रवाल्यांनी आम्हाला दमवले. तलाठ्यांनी आम्हाला दमवले. सगळ्या सगळ्यांनी आम्हाला दमवले. आम्ही जाताना सातबारा घेऊन गेलो. आठचा उतारा मागितला. बायकोला घेऊन यायला सांगितले. नवऱ्याला

घेऊन यायला सांगितले. आणि मिळाले शेवटी काहीच नाही, अशी आमची अवस्था झाली. आणि दुसऱ्या बाजूला बँकांनी काही आमचा हिशोब चुकता केला नाही. बँकांचे आणि सोसायट्यांचे व्याज मात्र आमच्या बोकांडी बसले, अशी ही सन्मान योजना आहे. याच्यामुळे कोणाचे काही भले झाले नाही. पण, याच्यामुळे अनेकांची थकलेली कर्ज मात्र वसूल करून घेतली.

ही जी शेतकऱ्यांची अवस्था झाली आहे. एक बाजूला कर्जमाफीचा हा बोजवारा झाला. पण दुसऱ्या बाजूला शेतकरी दुष्काळात होरपळत आहे. दुष्काळ जाहीर करून तीन महिने होऊन गेले, पण त्यासाठी ज्या उपाययोजना करायला पाहिजे, त्या होताना दिसत नाही. दहावी- बारावीच्या परीक्षा चालू आहेत. विद्यार्थ्यांच्या पासचा पत्ता नाही. फीचा पत्ता नाही. आज विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू देत नाहीत. पण त्याची त्यांना चिंता नाही. आज अशी अवस्था आहे, दुष्काळ विभागामध्ये जनावरे



विकायची पाळी आलेली आहे. जनावरांच्या किमती कमी झाल्या आहेत. त्याचे कारण विकणाऱ्यांची संख्या जास्त आणि विकत घेणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. चारा नाही आणि पाणी नाही. चारा आणि पाण्यासाठी लोकं वणवण भटकत आहेत. तरी त्यांना दया येत नाही. चारा छावण्या चालू करतो म्हणाले, दावणीला द्या म्हणाले, दावणी राहू द्या छावणीला द्या. पण दावणीला नाही. छावणीला नाही. चारा नाही. फक्त घोषणा झाली. शेतकऱ्याच्या पदरात काही पडले नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या दुप्पटीने झाल्या. हे आम्हाला अच्छे दिन आले.

आणि म्हणून या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा तळतळाट या लोकांना लागल्याशिवाय राहणार नाही. कारण, तुम्ही आम्हाला सांगितले होते की, दीडपट भाव देतो. भाव आमचे कमी झाले. जी आधारभूत तुम्ही जाहीर केली, त्याच्यापेक्षा कमी किमतीला आम्हाला आमचा शेतीमाल विकावा लागला. तुम्ही सांगितले होती की, कर्जमुक्त करतो, पण आमच कर्ज काही माफ झाले नाही. जे जे सांगितले ते तर केले नाही, उलट जे आमचे होते, जी आमची जमीन होती, ती ओरबाडून घेण्याचा प्रयत्न केला.

2015 साली यांनी भूमी अधिग्रहणाचा नवीन कायदा सभागृहात आणला. त्यामध्ये आज शेतकऱ्यांना जमीन घेतल्यानंतर 70 टक्के शेतकऱ्यांनी संमती घ्यावी लागते, बाजारभावापेक्षा पाचपट रक्कम देण्याची तरतूद आहे, तो कायदा बदलण्याचा प्रयत्नसुद्धा या सरकारने केला. कारण, उद्योगपतींच्या घशामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी घालायचा यांचा डाव होता. कदाचित त्यांना असं म्हणायचे असेल की, तुम्ही आमच्या कूळ कायद्याच्या जमिनी घेताय काय, त्या जमिनी आम्ही परत वेगवेगळ्या पद्धतीने परत घेतो. असा डाव या लोकांना रचला होता.



जसा छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याला आदेश दिलेला होता, शेतकऱ्याच्या बांधावरून जाताना गवताच्या काडीलाही धक्का लागू नये. असे सांगणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज या ठिकाणी उभे आहेत. गेली 10 वर्षे मी त्यांच्यासोबत सभागृहात काम करतो, जेव्हा जेव्हा गरज होती, तेव्हा तेव्हा उदयन महाराज शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आमच्यासोबत होते. ज्या ज्यावेळी रस्त्यावरची लढाई सुरू असते, त्यावेळी ते पक्षभेद विसरून येतात. म्हणून माझी तमाम शेतकऱ्यांना विनंती आहे, कष्टकऱ्यांना कळकळीची विनंती आहे, आपल्या कष्टाची जान ठेवणाऱ्या, आपल्यासाठी झटणाऱ्या या महाराजाला एक मत दिले पाहिजे. त्यांना मोलाचे मत द्या.

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डी. पी. त्रिपाठी व पक्षाचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी मुंबईत माध्यमांच्या प्रतिनिधींशी साधलेला संवाद...**

# मोदींकडून पंतप्रधानपदाच्या मर्यादेचे उल्लंघन

## डी. पी. त्रिपाठी यांचे विचार



डी. पी. त्रिपाठी – राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस आघाडीच्या माध्यमातून लोकसभेची निवडणूक लढत आहे. आणि आम्हाला विश्वास आहे की, आम्ही निर्णायक विजय संपादन करू.

**प्रश्न – पण आपला मित्र असलेल्या काँग्रेस पक्षात नाराजी दिसत आहे. प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण नाराज दिसत आहेत. मुंबई अध्यक्षांना पदावरून हटवले आहे. त्यातून आपली आघाडी कुठं तरी कमकुवत होत असताना दिसत आहे.**

**डी. पी. त्रिपाठी –** नाही नाही...असं काही नाही. पक्षात बदल होत असतात. प्रत्येक पक्षाला अधिकार आहे की, कोणाला ठेवायचे, कोणाला बदलायचे. त्यांचा तो अंतर्गत प्रश्न आहे. त्यामुळे त्याच्यातून असं अर्थ काढू नये की, आघाडी कमकुवत होत आहे. आमची आघाडी फार भक्कम आहे. त्यामुळे आम्ही शिवसेना आणि भाजपचा फार मोठ्या प्रमाणावर पराभव करणार आहोत.

**प्रश्न – पंतप्रधान मोदींनी समाजवादी पार्टी, बहुजन समाज पार्टी आणि राष्ट्रीय जनता दलाच्या आघाडीला सराब असं म्हणून अवहेलना केली आहे. याबाबत आपण काय सांगाल...**

**डी. पी. त्रिपाठी –** अत्यंत दुर्दैवी प्रकार आहे. देशाचे पंतप्रधान ज्या पद्धतीच्या भाषेचा वापर करत आहेत, आता निवडणूक आहे म्हणून नाही तर पहिल्यापासूनच ते अशा प्रकारची भाषा वापरत आहे. पदाचा मान ठेवण्यासारखे हे नाही. पंतप्रधानपदाला एक मान असतो आणि मर्यादा असतात. त्यानुसारच पंतप्रधानांनी शब्दाचा वापर केला पाहिजे. पण, हे दुर्दैव आहे की, मोदी तसा वापर करत नाहीत.

**प्रश्न – जाहिरातबाजीसाठी एक वेगळाच ट्रेंड येताना दिसत आहे. नरेंद्र मोदींवर विवेक ओबेरायच्या सिनेमातून ते दिसत आहे. ते योग्य आहे.**

**डी. पी. त्रिपाठी –** निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेमध्ये जे सांगितले आहे, त्याचे सक्तीने पालन केले पाहिजे. हे आम्ही नेहमी सांगितले आहे. त्यामध्ये काय काय येते, ते निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे कोणताही व्यावसायिक सिनेमा त्यामध्ये येतो. त्यामुळे त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे. त्याचा निर्णय घेणे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे.

**प्रश्न – पंतप्रधान म्हणतात की, काँग्रेसला हटवले तर गरिबी हटेल...**

**डी. पी. त्रिपाठी –** पंतप्रधानांना त्यांच्या पक्षाचा इतिहास माहिती नाही. ज्यावेळी त्यांचा पक्ष जनसंघ म्हणून होता, त्यावेळी

1967 मध्ये त्यांनी घोषणा दिली होती, हर हात को काम, हर खेत को पाणी, घर घर में दीपक जनसंघकी निशाणी...त्याचे काय झाले. केंद्रात आणि अनेक राज्यांत भाजपचे सरकार आले. त्याचे काय झाले. काय प्रत्येक हाताला काम मिळाले का आणि प्रत्येक शेतात पाणी आले का? 1967 मध्ये त्यांनी जी घोषणा दिली, त्याच्याविषयी मी बोलतोय. पण, ते तर 1971 च्या घोषणेविषयी बोलत आहे. स्वतःच्या इतिहासाकडे त्यांचे लक्ष जातच नाही. त्यांनी काय काय केले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्ष विकासाच्या योजना जनतेसमोर मांडत असेत. त्यांच्या सामाजिक, वैयक्तीक प्रगतीसाठी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची प्रतिमा सुधारण्यासाठी विविध आश्वासने आणि योजना मांडल्या जातात. त्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. पण काँग्रेसवर टीका करताना सत्य परिस्थितीवर केली पाहिजे. त्यामुळे तथ्य न पाहता केली जाणारी टीका अयोग्य आहे. आम्ही त्याचा निषेध करतो.

**प्रश्न – ज्या बनारसमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी निवडणूक लढणार आहेत. तेथून भीम आर्मीचे चंद्रशेखर आझादही निवडणूक लढणार आहेत. याबाबत आपले मत काय आहे...**

**डी. पी. त्रिपाठी –** आमचे स्पष्ट मत होती की, मोदींच्या विरोधात बनारसमध्ये सर्व पक्षांच्या वतीने एक उमेदवार लढवायला पाहिजे होता. अजूनही आम्ही त्यासाठी प्रयत्न करत आहोत.

**प्रश्न – नुकतेच अंतराळात आपण उपग्रह पाडला, त्याकडे तुम्ही कसे पाहता...**

**डी. पी. त्रिपाठी –** हे पहा, डीआरडीओने जे काही केले त्याला प्रचारासाठी वापर करणे, अयोग्य आहे. ते देशाच्या शास्त्रज्ञांचे यश आहे. हे पहिले पण केले जाऊ शकत होते. ती योग्यता आपल्या शास्त्रज्ञांची होती. मी माझ्या कार्यकाळात एक संसदीय समितीचा अध्यक्ष होतो. त्यावेळीही मी डीआरडीओला विचारले होते, त्यावेळीही त्यांनी सांगितले होती की, हे आपण करू शकतो. आपल्याकडे त्याबाबत परिपूर्ण आहोत. निर्णय हे काम इस्त्रोमध्ये बसलेल्या अधिकाऱ्यांचे काम होते. त्यांना तो अधिकार होता. आताही त्यांना अधिकार होता. त्यांनी तो निर्णय घेतला. पण, त्याबाबत पंतप्रधानांनी घोषणा करणे, माझ्या मते आचारसंहितेचे उल्लंघन आहे.

**प्रश्न – पंतप्रधानांनी आरोप केलाय की, युपीएने या कामासाठी उशिर केलाय. आणि डीआरडीओच्या अधिकाऱ्यांनीही सांगितले की, आम्ही युपीएला प्रेझेंटेशन दिले होते. पण त्यांनी परवानगी दिली नाही.**

**डी. पी. त्रिपाठी –** हे बघा एक कोणतेही कारण नसते, त्याला अनेक कारणे असतात. आपल्या शास्त्रज्ञांना आपण आज संधी देऊ किंवा उद्या. हे वेगवेगळ्या गोष्टींवर अवलंबून आहे. वेगवेगळी परिस्थिती असते. त्यामुळे अशा राष्ट्रीय सुरक्षेच्या गोष्टींविषयी वाद निर्माण करणे, पंतप्रधानांना शोभत नाही. देशात वेगवेगळी सरकारे आली, पण परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षेविषयी एक भावना होती. त्यांचे उल्लंघन पहिले पंतप्रधान असतील मोदी जे करत आहेत. आणि हे दुर्दैवी आहे.

**प्रश्न – देशद्रोहाचे आरोप असलेल्या कन्हैय्या कुमारला आपण पाठिंबा देत आहात..**

**डी. पी. त्रिपाठी –** त्यांच्यावर चार्जशीटही दाखल होऊ








शकले नाही. कन्हैय्या कुमारने त्याच्यावरील या आरोपांचे नेहमीच खंडन केले आहे.

**प्रश्न – आपण सांगितले की, पंतप्रधान मोदी यांनी केलेली घोषणा ही आचारसंहितेचे उल्लंघन आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस याबाबत काही औपचारिक तक्रार करणार आहे का...**

**डी. पी. त्रिपाठी –** सर्व जन सांगत आहे की, याबाबत लोकांमध्ये जायचे, त्यांच्यात जागृती करायची, हे राजकीय पक्षांचे कर्तव्य आहे. ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी करत आहे.

**प्रश्न – मंत्री दिलीप कांबळेंवरती आरोप झाले आहेत.**

**नवाब मलिक –** ज्या पद्धतीने मंत्री महोदयांवरती गुन्हा दाखल झालेला आहे, आता निवडणूक असताना गृह विभाग आणि पोलिसांची जबाबदारी आहे की, तात्काळ त्यांना अटक केली पाहिजे. जर त्यांना अटक होत नसेल, तर त्याचा अर्थ आहे की, कुठं तरी गृह खाते काम करत नाही. आजच हायकोर्टाने पानसरे आणि इतर हत्या या राज्यात झाली, त्याबाबत कोर्टाने कुठं तरी नाराजी व्यक्त केलेली आहे. तुमच्याकडे गृह खाते असताना मुख्यमंत्री करता काय. याचा अर्थ आहे की, हे सरकार व गृहशाखा एका विशेष विचारधारेसाठी काम करत आहे काय. याच्यातून दिसून येते की, कोर्टाने नाराजी व्यक्त केलेली आहे. आमचे म्हणणे आहे की, पोलिसांना की, कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही. त्याला तात्काळ अटक केली पाहिजे.

आणखी एक विषय आहे. शिक्षण मंत्री आहेत, काल पक्षाने जाहीरनामा जाहीर केला आहे, त्यावर सांगितले आहे की, हा जाहीरनामा कोणी लिहिला आहे. पण, ते स्वतः बारावी नापास आहेत. ज्यांच्याकडे डिग्री नाही. बोगस डिग्रीवाले हे मंत्री आहेत. हे सिद्ध झाले आहे की, त्यांची डिग्री बोगस आहे. त्यांना कागद वाचता येत नाही, हे त्याच्यातून सिद्ध झाले आहे. म्हणजे जे बोगस डिग्रीवाले लोक आहेत, की जे आमच्या जाहिरनाम्यावर टिप्पणी करत आहेत, आणि त्यांनी पहिल्यांदा आपला बारावी उत्तीर्ण झाल्याचा दाखला दाखवावा. नंतर त्यांनी आमच्या जाहिरनाम्यावर टिप्पणी करावी.

**प्रश्न – आपल्या जाहिरनाम्यात ट्रिपल तलाकवर काय मत मांडले आहे.**

**डी. पी. त्रिपाठी –** या सर्व प्रश्नांवर, स्त्रीयांच्या अधिकारावर चर्चा झाली पाहिजे. धर्म आणि जातीवर नाही, असा विचार आमचा पक्ष पहिल्यापासून करत आहे. त्याबाबत आमच्या जाहिरनाम्यात म्हटले आहे. तसचे, विविध समाजातील प्रश्नही उठवले आहेत.

**प्रश्न – आपल्या जाहिरनाम्यात अल्पसंख्याकांसाठी जास्त मांडले आहे. त्यातून बहुसंख्यांकांची अवहेलना झाल्यासारखे वाटत नाही...**

**डी. पी. त्रिपाठी –** नाही नाही, कोणत्याही समाजात बहुसंख्यांकाची अवहेलना होत नाही. जाहिरनाम्यात बऱ्याच गोष्टी



आहेत की, ज्या सर्वांसाठी आहेत. आणि जे सर्वांसाठी असते, त्यात नक्कीच बहुसंख्य समाज असतो. शहरी समाज आणि ग्रामीण समाज, या सर्वांसाठी ते सांगितले आहे. तुमचे एका गोष्टीकडे लक्ष वेधतो की, भारत हा असा देश आहे की, जिथे एका भागात बहुसंख्य असणारा समाज दुसऱ्या भागात अल्पसंख्यांक आहे. त्यामुळे तशा पद्धतीचे धार्मिक विभाजन भारतासारख्या देशात अशक्य आहे.

**प्रश्न – ट्रीपल तलाकबाबत आपल्या जाहिरनाम्यात काय म्हटले आहे.**

**नवाब मलिक –** आम्ही आमच्या जाहिरनाम्यात स्पष्ट म्हटले आहे की, जो आता ऑर्डीनन्स आहे ते रद्द करणार आणि नवीन प्रकारे समाजातील सर्व लोकांशी चर्चा करून आम्ही पुढे जाणार, असं जाहिरनाम्यात स्पष्ठ म्हटले आहे. देशाच्या संविधानात उल्लेख आहे. त्यांच्या अधिकाराविषयी बोलले आहे. देशाच्या संविधानात बहुसंख्यांकाचा उल्लेख करण्याची गोष्ट नाहीये. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जाहिरनाम्यात शेतकरी आहे, सैनिक आहे, आणि जो काही कार्यक्रम आहे, तो सर्वांसाठी आहे. पण, देशाच्या घटनेतच अल्पसंख्यांकांसाठी वेगळ्या तरतूदी केलेल्या आहेत. त्यांच्यासाठी कार्यक्रम तयार करणे, ही आमची जबाबदारी आहे, असं आम्ही मानतो. त्यासाठी त्याचा उल्लेख केला आहे.

**प्रश्न – पंतप्रधानपदाच्या उमेदवाराची विरोधी पक्षांनी घोषणा केली नाही. याबाबत आपली काय भूमिका आहे.**

**डी. पी. त्रिपाठी :** 1971 पासून देशात विरोधी पक्षांनी कधीही पंतप्रधानपदाच्या उमेदवाराची घोषणा केलेली नाही. 1977 मध्ये काय झाले. त्यावेळी तर जनता पार्टीच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झाली होती. कोणीही पंतप्रधानपदाचा उमेदवार नव्हता. पण, निवडणुकीचा निकाल काय लागला. आपण बघा, 2004 मध्ये काय झाले. युपीए नव्हता. मनमोहनसिंग तर त्यावेळी नेता ठरले नव्हते. ते निवडणुकीनंतरच ठरले ना. ते सरकार 10 वर्षे चालले आणि त्यांनी देशासाठी फार कामे केली. त्यामुळे हे चालत असते. पण अनेक नेत्यांनी सांगितले की, देशाला जातीयवादी आणि विभाजनवादी सरकारच्या तावडीन सोडायचे आहे. हेच आमचे ध्येय आहे. पंतप्रधानपदाचा प्रश्न निवडणुकीनंतर सोडवला जाईल. जो नेहमी तशाच पद्धतीने सोडवला जातो. ती काय एवढी बिकट स्थिती नाही की जो चिंतेचा विषय आहे. आणि जे लोक म्हणतात की, आमच्याकडे एक नाव आहे, त्यांच्याकडे काय आहे. त्यामुळे मी त्यांना एवढेच सांगेल की, आपल्याकडे फक्त एक आहे, पण आमच्याकडे अनेक आहेत. त्यामुळे त्याची चिंता तुम्ही करू नका. आम्ही तो प्रश्न नक्कीच सोडवू.



Best

Compliments

# संयुक्त पुरोगामी महाआघाडीची



# भाजप-संघाकडून धर्मनिरपेक्ष मतांच्या विभाजनासाठी प्रयत्न

## अशोक चव्हाण

राज्यातल्या समविचारी विविध पक्षांचे, विविध संघटनांचे सर्व प्रतिनिधी आणि सर्व उपस्थित पदाधिकारी आणि पत्रकार मित्रांनो. आपल्याला विधित आहेच, की राज्यामध्ये आणि देशामध्ये सार्वत्रिक लोकसभेच्या निवडणुका होऊ घातलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर या महाआघाडीमध्ये सामील झालेल्या सर्व पक्षांचे याठिकाणी मी हृदयातून, अंत:करणातून हार्दिक स्वागत करतो. आज दलित, अल्पसंख्याक, आदिवासी, शेतकरी, कामगार, तरुण, महिला, विद्यार्थी, वंचित, पीडित या सर्वांना न्याय देण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या, राजर्षि शाहू महाराजांच्या, महात्मा फुलेजींच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरजींच्या विचारांनुसार मार्गक्रमण करत असताना सर्वांना न्याय मिळाला पाहिजे. समता, बंधुत्व, स्वातंत्र्य याला सर्वांनाच न्याय देता आला पाहिजे, आणि त्या

# पत्रकार परिषद, मुंबई




**राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या पक्षांनी अनेक घटकपक्षांना साथीला घेत संयुक्त पुरोगामी आघाडीच्या माध्यमातून लोकसभा निवडणुकीला एकत्रितपणे सामोरे जाण्याचा निर्णय घेतली आणि या निर्णयाची माहिती देण्यासाठी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेचा वृत्तांत....**

भावनेतून संविधानाने देशाला दिलेल्या हक्कावर या पाच वर्षांत निर्माण झालेल्या धोक्यापासून संरक्षण करून त्याची पुन:र्स्थापना करण्याची आमची सर्वांनी मनोकथा आहे आणि म्हणून आम्ही सर्वजण एकत्र येवून एक शपथ घेत आहोत.

आमचा प्रयत्न हा होता, की या विचारांना पुढं घेऊन जाण्यासाठी अजूनही काही पक्षांनी या महाआघाडीत सहभागी व्हावे. परंतु, भाजप आणि संघ परिवाराकडून साम, दाम, दंड-भेदाचं कुटील राजकारण आज केले जात आहे. काही पक्ष त्याला बळी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि त्याच उपयोग जनतेच्या विरोधात भाजप-संघाकडून धर्मनिरपेक्ष मतांच्या विभाजनासाठी केला जात आहे, असं आमचं ठाम मत आहे. भाजप-शिवसेना या धर्मांध पक्षांसोबत त्यांनाही जनता या निवडणुकीत धडा शिकवल्याशिवाय रहाणार नाही. या दोन्ही

पक्षांनी मागच्या निवडणुकीत दिलेल्या एकाही आश्वासनाची पूर्तता केलेली नाही. खोटी आश्वासने, खोट्या घोषणा करून जनतेचा विश्वासघात, आज जे एनडीएचं शासन, मग ते केंद्रातलं असो किंवा महाराष्ट्रातलं शिवसेना-भाजपचं शासन असो, यांनी या राजकीय व्यवस्था संपूर्णपणे उद्ध्वस्त करण्याचं काम यांनी गेल्या पाच वर्षात केलेलं आहे. आणि म्हणून या जुमलेबाजांच्या या एकंदरित राज्यात आणि देशामध्ये जी काही जुमलेबाजी सुरू आहे, त्याला कंटाळून आज सामान्य लोकांमध्ये फार मोठी चीड निर्माण झाली आहे.

देशातल्या मतदारांच्या मनामध्ये एक आक्रोश आहे, एक चीड आहे. आणि सर्वांच्या मनात एकच भावना आहे, की मताचं विभाजन टाळा, सर्वांनी एकत्र या आणि आज सत्तेमध्ये असलेल्या भाजप-सेनेच्या एनडीएच्या सरकारला आज सत्तेपासून खाली खेचल्याशिवाय दुसरा पर्याय राहिला, तरच या देशातल्या जनतेला न्याय मिळू शकेल. आणि म्हणून जनतेचा हा सगळा कौल लक्षात घेता, आम्ही सर्वांनी एकत्र येऊन ही महाआघाडी स्थापन



करण्याचा निर्णय या राज्यामध्ये घेतलेला आहे.

गेल्या पाच वर्षामध्ये शिवसेना-भाजपच्या या सरकारने जनतेचे प्रचंड हाल केलेले आहेत. सामाजिक सलोखा बिघडवून जातीयवाद पसरवण्याचं काम या दोन्ही पक्षांच्या सरकारनी केलेलं आहे. समाजा-समाजात आणि जाती-जातीत भांडणं लावण्याचं काम, समाजामध्ये द्वेषाचं आणि तिरस्काराचा प्रसार करण्याचं काम यांनी गेल्या पाच वर्षामध्ये मोठ्या प्रमाणावर केलेलं आहे. राजकीय फायद्यासाठी भीमा-कोरेगावसारख्या दंगली या सत्ताधाऱ्यांनी घडवून आणल्या. संभाजी भिडे व मिलिंद एकबोटेसारख्यांना खुली सूट दिली आणि दुसरीकडे हजारो दलित बांधवांना, महिलांना, वृद्धांना मात्र मध्यरात्री कोम्बिंग





ऑपरेशन करून अटक करण्याचं कामसुद्धा राज्यात झालेलं आहे.

देशाची आणि राज्याची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करण्याचं काम या सत्ताधाऱ्यांनी केलेलं आहे. उद्योगधंदे मोडीत काढून बेरोजगारांची फौज उभी करण्याचं हे जे पाप आहे, जे भाजप-शिवसेना सरकारने केलेलं आहे. राज्यातली कृषि व्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून, शेतकऱ्याला मरणाच्या दारात पोहोचवण्याचं काम या सरकारने केलेलं आहे. या सरकारच्या काळात महाराष्ट्रभर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी उच्चांक गाठलेला आहे. ऑनलाईनच्या नावाखाली शेतकऱ्यांचा छळ या सरकारने चालविला आहे आणि कर्जमाफीची घोषणा करून दोन वर्षे झाली असतानासुद्धा अद्याप शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा संपूर्ण फायदा हा राज्यातल्या शेतकऱ्यांना मिळालेला नाही. या निवडणुकीत मतं मागायला जाताना शिवसेना-भाजप या दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी 34 हजार कोटींची कर्जमाफीची दिलेल्या 89 लाख शेतकऱ्यांच्या नावाची यादी त्यांनी आधी घेऊन जावं अशी आमची अपेक्षा या सरकार मधल्या नेत्यांकडून आहे. कर्जमाफीच्या घोषणेनंतर ज्या शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देऊन फोटो काढले, त्यांना अद्याप कर्जमाफी मिळालेली नाही. या कर्जमाफीची या सरकारने करून ठेवलेला खेळ आज शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेला आहे.

मराठा, धनगर आणि मुस्लिम समाजाची फसवणूक या सरकारने केलेली आहे. मराठा समाजाने लाखोंचे मोर्चे



काढल्यानंतर आरक्षणाचा निर्णय घेतला. पण त्यालाही कोर्टात आव्हान दिले गेल्यामुळे मराठा आरक्षण कोट्यातून नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देऊ नये, अशा प्रकारचा अजब आदेश या सरकारने आज काढलेला आहे. सत्तेत आल्यावर पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला आरक्षण देऊ,

अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. आता त्यांच्या सरकारची शेवटची कॅबिनेट झाली असतानासुद्धा हा निर्णय अद्याप मार्गी लागलेला नाही. आदिवासींच्या सवलती लागू करू, असे गाजर दाखवून धनगर बांधवांची घोर फसवणूक करण्याचं काम शिवसेना-भाजपच्या सरकारने केलेलं आहे. मुस्लिम समाजाला शैक्षणिक आरक्षण द्यायला उच्च न्यायालयाने हिरवा कंदील दिला असतानासुद्धा सरकारने मात्र जाणीवपूर्वक मुस्लिम समाजाला आरक्षण दिलेलं नाही.



दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समाजाला कोणताही लाभ मिळू नये, असे या सरकारचे धोरण राहिलेले आहे. त्यासाठीच्या विविध कल्याणकारी योजनांच्या निधीमध्ये फार मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आली आहे आणि त्याच्यामुळे बऱ्याचशा ज्या कल्याणकारी योजना आहेत, त्या अनेक योजना बंद पडलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही. महिलांवरील अत्याचार दूर करू, अशा वल्गना करणाऱ्या राज्यात महिलांवरील अत्याचारांत दुपटीने वाढ झाली आहे.

त्यामुळे असे असंख्य प्रश्न आज राज्यामध्ये समोर असताना याच्या विरोधामध्ये आज शेतकरी, कष्टकरी, कामगार, युवा, सुशिक्षित बेरोजगार, महिला, विद्यार्थी, दलित आणि आदिवासी, अल्पसंख्याक, विचारवंत, साहित्यिक, कलाकार इत्यादी सर्व रस्त्यावर उतरून आज आक्रोश व्यक्त करत आहेत. शेतकऱ्यांचा अभूतपूर्व संप, दलित समाजाची आंदोलने, आदिवासी शेतकऱ्यांचा लाँग मार्च, विचारवंतांची आंदोलने, आरक्षणाच्या मागणीसाठी निघालेले विराट मोर्चे अशा घटना या देशाच्या इतिहासामध्ये कधीही पूर्वी घडलेल्या नव्हत्या. अशा प्रकारच्या या घटना गेल्या पाच वर्षामध्ये आपल्याला पहायला मिळतात.

भ्रष्टाचाराची परिसीमा या दोन्ही पक्षांच्या सरकारने गाठलेली आहे. राफेलसारख्या घोटाळ्यांमध्ये स्वत: प्रधानसेवक सामील असताना या चौकीदाराच्या निगरानीमध्ये नीरव मोदी, विजय माल्ल्या, मेहुल चोक्सी, ललित मोदीसारखे सगळेच घोटाळेबाज देशातल्या जनतेला लुटून परदेशात मजा मारत आहेत, हे सुद्धा उदाहरण आपल्यासमोरच आहे. राज्यातील 21 मंत्र्यांचे भ्रष्टाचार आम्ही बाहेर काढले. परंतु, या सर्व घोटाळ्यांवर पांघरून घालून मुख्यमंत्र्यांनी कोणत्याही चौकशीविना या सर्वांना क्लिनचीट देण्याचं काम केलेलं आहे. गेल्या पाच वर्षांत भ्रष्टाचाराच्या माध्यमातून प्रचंड मोठी लूट करून भाजपचे अठराशे कोटीपेक्षा जास्त किंमतीचे मुख्यालय आज दिल्लीमध्ये शानदारपणे उभं ठाकलेलं आहे. त्यामुळे देशात साम-दाम-दंड-भेद याचा खुलेपणानं वापर या केंद्रातलं असो किंवा राज्यातल्या सरकारकडून खुलेआम सुरू आहे. अशा या वातावरणामध्ये आज या राज्यातल्या आणि देशातल्या निवडणुका कशा पद्धतीने होणार आहेत ही खरी चिंतेची बाब आम्हा सर्वांना आहे.

लोकशाहीचे सर्व स्तंभ उखडून टाकण्याचं एकंदरित या सरकारची भूमिका आहे आणि त्याच भूमिकेतून या सरकारमधले जे घटक पक्ष आहेत, हे कामाला लागलेले आहेत. माध्यमांवरही प्रचंड दबाव आहे. यंत्रणेचा संपूर्णपणे गैरवापर आहे आणि सर्व संविधानिक संस्थांवर घाला घालण्याचं काम या सरकारने केलेलं आहे. आणि म्हणून या सगळ्या गोष्टींचा मुकाबला करण्याकरता, संविधानाचं रक्षण करण्याकरता आणि आगामी काळामध्ये जनतेला न्याय देण्याकरता आम्ही सर्वांनी एकत्र येण्याची भूमिका आज याठिकाणी घेतलेली आहे. आज या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून या पुरोगामी महाआघाडीची घोषणा करत आहोत आणि ही घोषणा करत असताना त्याचं अनुमोदन देण्याकरता मी याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना विनंती करेन, की त्यांनी याठिकाणी दोन शब्द व्यक्त करावेत.






# लोकशाही टिकवून सरकार उलथविण्यासाठी आपण एकत्र

## जयंत पाटील

संयुक्त पुरोगामी आघाडीची ही घोषणा करण्यासाठी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माननीय अशोक चव्हाण यांनी आपलं मनोगत व्यक्त केलेलं आहे. मी या सगळ्या मुद्यांना पाठिंबा तर देतोच, पण मला आज अतिशय आनंद आहे, की महाराष्ट्रात या देशातलं सरकार उलथवून लावणं, या देशातली लोकशाही टिकवण्यासाठी आपण एकत्रित आलो पाहिजे ही भावना असलेली सगळे पक्ष आज आमच्या या आघाडीत सहभागी झालेले आहेत. हे करत असताना एका विचाराने या देशातली घटना बदलली जाणार नाही, या देशातल्या महागाईने तसेच अनेक वेगवेगळ्या कारणांनी त्रस्त झालेल्या जनतेला पुन्हा एकदा चांगले दिवस आणण्याची गरज आहे आणि त्या भूमिकेला पाठिंबा देऊन आम्ही सगळ्यांनी ही आघाडी उभी केलेली आहे. आम्ही अनेकांशी चर्चा केली. अनेकांना यामध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला आणि महाराष्ट्रामध्ये एक चांगलं वातावरण यानिमित्तानं या आघाडीला पाठिंबा मिळण्याचं काम होत आहे. हे करत असताना केंद्र सरकारची चुकीची धोरणं, राज्य सरकारची चुकीची धोरणं, त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजुर, मध्यमवर्गिय, शहरात रहाणाऱ्या नागरिकाला, ग्रामीण भागातल्या नागरिकांना, आज दुष्काळाला तोंड देणारी जनता, एका बाजूनं मोठ्या त्रस्त वातावरणात जगते आहे. या सगळ्यांचाच परामर्श घेऊन, आम्ही अनेक मुद्यांवर चर्चा करून बऱ्याचशा मुद्यांवर एकमत केलेलं आहे. मला खात्री आहे, की महाराष्ट्रातली जनता या आघाडीला पूर्णपणानं पाठिंबा देईल.







दुसऱ्या बाजूला आज समोरच्या बाजूनी देशाचे पंतप्रधान हे गुपचुप पाकिस्तानच्या पंतप्रधानाला शुभेच्छा देतात आणि पाकिस्तानचा विरोध करण्यासंदर्भातली भावना या ठिकाणी महाराष्ट्रात, भारतामध्ये भावना व्यक्त करतात. अशा प्रकारची दुटप्पीपणाची भावना या देशातल्या मतदारांना चुकीच्या दिशेनं नेण्याचा प्रयत्न करणं, खासगीत वेगळं वागायचं आणि जाहीरपणे वेगळं वागायचं ही भाजपची दुटप्पीपणाची भावना आपल्या सगळ्यांच्यासमोर आलेली आहे.

असे अनेक मुद्दे आहेत. येणाऱ्या निवडणुकीत या सगळ्यांचा परामर्श निश्चितपणानं आम्ही सर्वजण घेऊ. पण आज मात्र या राज्यामध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटना आमच्याबरोबर आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये सरकार आल्यावर या महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या शेतकऱ्यांना त्यांच्या कष्ट केलेल्या, जी काही गुंतवणूक केली असेल, त्याच्या दीडपट उत्पन्न मिळवून देण्याचं आश्वासन एकेकाळी मिळालेलं होतं. पण आजही ते फलद्रूप झालेलं नाही. आणि त्यामुळं सत्तेत आल्यानंतर हा आमचा प्राधान्य असेल, की खरंच देशातल्या जनतेला त्यांच्या उत्पादन खर्चाच्या दीडपट रक्कम पुन्हा मिळावी आणि त्यांची शेती ही किफायतशीर व्हावी हा प्रयत्न, हेदेखील आमचं महाराष्ट्रात आणि देशामध्ये प्राधान्य असणार आहे.

अनेक मुद्दे आहेत, ज्यांची तत्त्वांची, विचारांची अनेक दिवस चर्चा आम्ही सगळ्यांनी केलेली आहे. याठिकाणी भाई जयंत पाटील आहेत. हितेंद्र ठाकूर साहेब आलेले आहेत. राजू शेट्टी साहेब, कवाडे साहेब. सगळ्यांचीच नावे घेऊन आपला वेळ घेणार नाही. पण या सर्वांचा सहभाग असणारी ही आघाडी ही निश्चितपणानं महाराष्ट्रामध्ये चांगल्या पद्धतीनं येणाऱ्या काळामध्ये आपल्या सर्वांच्या समोर चांगलं प्रदर्शन शक्तीचं होईल आणि महाराष्ट्रात आम्हाला जास्तीत जास्त जागा आपणही सगळ्यांनी एकत्रित येऊन ताकदीनं लढवण्याचं ठरवल्यामुळं मिळतील हा ठाम विश्वास आम्हा सगळ्यांना आहे. पुन्हा एकदा या आघाडीमध्ये सहभागी झालेल्या सर्वांचं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीनं मी स्वागत करतो.

# भाजप-सेनेचे राजकारण फक्त फोडाफोडीचे, बाहेरून उमेदवार आयात करण्याचे

## अजित पवार

उपस्थित बंधू-भगिनींनो, संयुक्त पुरोगामी महाआघाडीच्यावतीनं मी आपणा सर्वांचं मनापासून स्वागत करतो आणि एक गोष्ट या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून तमाम माझ्या महाराष्ट्रातल्या बांधवांना मी सांगू इच्छितो, की ही महाआघाडी करत असताना भाजप-शिवसेनेसारख्या जातीयवादी पक्षांना बाजूला ठेवण्याच्याकरता आपण आपले मनातले जे काही विचार असतील ते थोडेसे बाजूला ठेवायचे. 48 जागांपैकी इथं अशोकराव आहेत, जयंतराव आहेत, इथं भुजबळ साहेब आहेत, इथं हर्षवर्धनजी आहेत, आम्ही सगळ्यांनी ठरवलं, की वेळ पडली तर दहा जागा मित्र पक्षांना द्याव्या लागल्या तरी चालतील. 38 जागाच काँग्रेस-राष्ट्रवादीने वाटून घ्यायच्या आणि त्याच्यातनं सर्वांना बरोबर घ्यायचं आणि जातीयवादी विचारांना कुठं तरी थांबवायचं आणि शाहू-फुले-आंबेडकरांचा विचार खऱ्या अर्थानी पुढं न्यायचा.



परंतु, या सगळ्या गोष्टी करत असताना आपण महाराष्ट्रानी पाहिलं, की अनेकदा चर्चा होत असताना काहींनी एवढी टोकाची भूमिका घेतली, की काही काहींना तर आम्ही सहा जागा देण्याची भूमिका त्याठिकाणी घेतली असताना काहींनी त्याच्यामध्ये कुठला रस दाखवला नाही. काही ना काही कारणं सांगून ही महाआघाडी कशी होणार नाही, हाच प्रयत्न त्यांचा होता की काय अशा प्रकारची शंका घ्यायला निश्चितपणे जागा आहे. वाव आहे. आणि त्याच्यामुळंच



आपल्या मागण्यांसाठी दिल्लीत मोर्चा काढलेल्या शेतकऱ्यांवर केंद्र सरकारने पाण्याचे फवारे निर्दयपणे मारून त्यांना दिल्ली शहराच्या सीमेवरच रोखले.

आमचं स्पष्ट मत झालंय, की महाआघाडीमध्ये जे कुणी आलेले नाहीत, ती एक प्रकारची भारतीय जनता पक्षाची बी टीम म्हणून आज राज्यामध्ये काम करू पहातेय आणि यांना इनडायरेक्ट भाजपा-शिवसेनेलाच फायदा करून द्यायचा होता म्हणूनच त्यांनी निव्वळ चर्चा करण्याच्याबद्दलचा एक बागलबुवा उभा केला की काय अशा प्रकारची शंका ही निश्चितपणे निर्माण होतेय.

हे सगळं होत असताना तमाम बाकीच्या आंबेडकरवादी विचार आहे, बाकीचे जे काही सहकारी आहेत, त्यांना मात्र ही गोष्ट लक्षात आली. कारण या सगळ्या गोष्टी महाराष्ट्रामध्ये घडत असताना आम्ही प्रत्येकजण विचार करायचो, बारकाईनं विचार करायचो, की असं का घडतंय. त्याच्यामुळं काहीजण तर आम्हाला सांगायचे, की हे तुमच्यामध्ये सगळेजण येणारच नाहीत. मग एवढा विश्वास काहींना का वाटत होता, की येणारच नाहीत. त्याच्यामुळं मी आत्ता जे काही मत व्यक्त केलेले आहे, त्याला कुठेतरी जागा राहतेय.

दुसरी एक गोष्ट मला महाराष्ट्रातल्या जनतेच्या लक्षामध्ये आणून द्यायची आहे. 48 जागा भाजपा-शिवसेनेच्या अजून डिक्लेर झालेल्या नाहीत. परंतु, ज्यावेळेस उमेदवार डिक्लेर होतील, तुम्हाला आश्चर्य वाटेल, पाच वर्षे यांचं केंद्रामध्ये सरकार आहे. राज्यातील सरकारलाही पाच-सहा महिन्यांनी पाच वर्षे होतील. इतके दिवस सरकारमध्ये असतानादेखील यांचा एक प्रकारचा तो कमीपणा आहे, की 48 जागांपैकी 25 टक्के जागा पूर्वाश्रमीचे त्याच्यातले काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारांच्या लोकांना घेऊन त्यांना उमेदवारी द्यावी लागली. जर एवढं चांगलं काम त्यांनी पाच वर्षामध्ये केलं होतं, तर त्यांना इतर पक्षातनं उमेदवार घेण्याचं कारण काय होतं, याचंही उत्तर भाजपा-शिवसेनेनं यानिमित्तानं दिलं पाहिजे. नुसतं फोडाफोडीचं राजकारण जे कधी महाराष्ट्रामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर पहायला मिळालेलं नव्हतं. सगळ्या वेगवेगळ्या आयुधांचा वापर करायचा, सगळ्या काही गोष्टी वापरायच्या आणि त्याच्यातनं कुणा कुणाच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावायचा आणि त्याच्यातनं स्वत:चा स्वार्थ साधायचा. फक्त सत्ता आणि सत्तेतून पैसा, पैशातून सत्ता एवढा एककलमी कार्यक्रम यांचा चाललेला आहे. म्हणूनच आम्ही ही संयुक्त पुरोगामी महाआघाडी तयार केलेली आहे. याला तमाम माझ्या महाराष्ट्रातल्या जनतेनी आशिर्वाद द्यावेत, मतदारांनी भरभरून पाठिंबा द्यावा, एवढीच अपेक्षा संयुक्त पत्रकार परिषदेच्यावतीनं व्यक्त करतो. धन्यवाद!

# तणनाशक फवारून कमळाचं पिक समूळ नष्ट करा

**राजू शेट्टी**

संयुक्त पुरोगामी महाआघाडीच्या या पत्रकार परिषदेच्या निमित्तानं संपूर्ण महाराष्ट्रातील एक भक्कम अशी आघाडी करण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे. कारण केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये असणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारनं सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी गोरगरीब, विद्यार्थी, बेरोजगार या सगळ्यांचाच विश्वासघात केलेला आहे. अच्छे दिनचा भूलभुलैय्या दाखवला, परंतु लुच्चे लोकांचे दिवस आम्हाला बघायला मिळाले. आणि म्हणून महाराष्ट्रामध्ये चळवळीमध्ये असणारे, सतत रस्त्यावरती संघर्ष करणारे आम्ही सगळी मंडळी या सरकारला केंद्रातून आणि राज्यातून हद्दपार करण्याचा निर्णय घेऊन या आघाडीमध्ये सामील झालो आहोत.

त्यांनी शेतकऱ्यांना फसवलं, कामगारांना फसवलं. सर्वसामान्यांना फसवलं. एवढंच नव्हे, तर सामाजिक आणि धार्मिक ऐक्यसुद्धा धोक्यात आणलेलं आहे. खरं तर हा महाराष्ट्र पुरोगामी महाराष्ट्र आहे. फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारानं चालणारा हा महाराष्ट्र आहे. संतांचा आणि समाजसुधारकांचा हा महाराष्ट्र आहे. पण या महाराष्ट्रामध्ये जाती-जातीमध्ये, धर्मा-धर्मामध्ये तेढ निर्माण करून रक्तपात करायचा आणि आपली राजकारणाची पोळी भाजायची असा प्रकारचं हिडीस कृत्य ही मंडळी करतायंत. त्यातूनच ही आघाडी निर्माण झालेली आहे.

अशा परिस्थितीमध्ये कालच केंद्र सरकारनं एक निर्णय घेतलेला आहे, की मंडल आयोगाच्या धोरणाचा पुनर्विचार करण्यासाठी त्यांनी एक समिती नेमलेली आहे. म्हणजे आता ज्या जाती-जमातींचा या यादीमध्ये समावेश आहे, त्यांच्या मनामध्ये भीती निर्माण करायची, आधीच सामाजिक ऐक्य धोक्यात आलं असताना अशा प्रकारे आपला ठेवणीतला अजेंडा बाहेर काढून एकाएकाचा बदला घ्यायचा अशा प्रकारची परिस्थिती या लोकांनी निर्माण केलेली आहे. एवढंच नव्हे, तर भारतीय जनता पक्षाच्या अनेक वाचाळवीर नेत्यांनी आम्ही संविधान बदलू, आम्हाला त्यासाठी लोकांनी मतं दिलेली आहेत, अशा प्रकारच्यासुद्धा वल्गना केल्या. म्हणजे आज संविधान धोक्यात आलेलं आहे.

देशातल्या ज्या घटनात्मक संस्था आहेत, की ज्याच्यामुळं हा देश सुरळीत चाललेला होता, मग ते सुप्रीम कोर्ट असेल, आरबीआय असेल, सीबीआय असेल अशा संस्थासुद्धा या लोकांनी धोक्यात आणलेल्या आहेत आणि अशा परिस्थितीमध्ये माझ्यासारख्या शेतकरी नेत्याला खऱ्या अर्थानं तणनाशक फवारून हे कमळाचं पीक समूळ नष्ट करण्याशिवाय पर्याय नाही, अशा प्रकारचा विचार निर्माण झाला आणि म्हणून आधी लोकशाही वाचली पाहिजे आणि त्यानंतर शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांचं राज्य पुन:र्स्थापित झालं पाहिजे या हेतूनं स्वाभिमानी शेतकरी संघटना, स्वाभिमानी पक्षानं या महाआघाडीमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतलेला आहे.



# कर्जमाफी देताना सरकारचा हात थरथरला

## जयंत पाटील (शेकाप)

महाआघाडीची खरी सुरूवात दोन वर्षांपूर्वी विधिमंडळाचं कामकाज चालू असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी पाहिजे म्हणून विधिमंडळाच्या खालच्या सभागृहात चर्चा सुरू असताना गदारोळ झाला असताना त्याठिकाणी जवळजवळ 40 विधिमंडळाच्या सदस्यांना त्याठिकाणी सभासदत्व रद्द केलं आणि त्याच ठिकाणी सर्व विरोधी पक्षांची बैठक होऊन विधिमंडळाच्या अधिवेशनावर बहिष्कार टाकून, शेतकऱ्यांच्या दारामध्ये विधिमंडळ गेलं आणि नागपूरपासून एक संघर्ष यात्रा काढण्यात आली आणि त्याठिकाणी या आघाडीची मुहुर्तमेढ रोवली गेली.

आज मी आघाडीमध्ये सामील होत असताना मला अत्यंत आनंद होत आहे, की राजू शेट्टींसारखे पुरोगामी विचाराचे नेते, जे शेतकऱ्यांसाठी सातत्यानं लढतात, ते सामील झाले. माझे मित्र हितेंद्र ठाकूर हे आघाडीमध्ये सामील झाले. रिपब्लिकन पक्षाच्या सर्व विविध संघटना, विविध पक्ष, गट हे याठिकाणी बहुसंख्येने आज सामील झाले, त्यामुळे माझ्यासारख्या पुरोगामी विचाराच्या कार्यकर्त्याला एक आनंद होत आहे.



निश्चितपणे राज्यामध्ये आणि देशामध्ये प्रामुख्यानं या राज्यकर्त्यांनी जे आश्वासित केलं होतं, की कोणत्याही परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना योग्य भाव दिला जाईल. कामगारांचे हक्क अबाधित राहतील, त्यांना न्याय दिला जाईल, छोट्या व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात याठिकाणी झालेली हतबलता, अशा सर्वांच्या प्रश्नांत मोदी सरकार आणि भाजपा-शिवसेनेच्या सरकारने केलेली आहे. त्यामुळं महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात असंतोष आहे. आज ज्या विविध पक्षांची उपस्थिती याठिकाणी दिसतेय, ते बघितली असताना महाराष्ट्रातल्या तमाम शेतकरी, कामगार आणि छोट्या व्यापाऱ्यांचा पाठिंबा या आघाडीला भक्कम मिळेल.

आमचा एकच पक्ष आहे, हे आम्ही त्याठिकाणी सांगितलं, की शेतकरी कामगार पक्षाने प्रत्येक लोकसभा निवडणूक लढवली. पण यावेळेला मतांचं विभाजन होऊ नये, सर्व उमेदवार निवडून यावेत म्हणून आम्ही 52 सालानंतर पहिल्यांदा ही आघाडी भक्कम रहावी आणि आमच्यासारख्या छोट्या पक्षांनी जास्त मागणी न करता आम्ही कुठलीही जागा या आघाडीत मागितलेली नाहीये. आज आमची दोन मतदारसंघांमध्ये चांगली मतं आहेत, ही मतं निर्णायक आहेत. दर खेपेला आम्ही आलटून पालटून चांगल्या मतांनी निवडून आलेलो आहोत आणि म्हणून मला वाटतं, विविध जे छोटे पक्ष आले आहेत, त्यांनाही माझी विनंती आहे, की जागेपेक्षा, पदापेक्षा या देशातली, या राज्यातली लोकशाही, या देशाचं संविधान याठिकाणी प्रामुख्यानं जपलं पाहिजे, राखलं पाहिजे, त्याचं संरक्षण केलं पाहिजे ही भूमिका घेऊन आपण निवडणुकीच्या कामाला लागावं आणि महाराष्ट्रातल्या तमाम मतदारांना मी विनंती करतो, याठिकाणी या आघाडीला भक्कम अशी साथ देऊन लोकशाहीचं रक्षण करावं अशी माझी विनंती आहे.

# मनुवादी व पुंजीवादी सरकारला हद्दपार करायचं

## जोगेंद्र कवाडे

संयुक्त पुरोगामी महाआघाडीच्या माध्यमातून विविध पक्ष तसेच रिपब्लिकनचे सगळे संघटना आणि गट या महाआघाडीच्या आकाशाखाली एकत्र आले ही एक मोठी उपलब्धी आमच्यासाठी आहे असं मी समजतो. देशामध्ये जातीच्या आणि धर्माच्या नावाखाली उन्माद सुरू आहे आणि या धार्मिक आणि जातीय उन्मादाचं भांडवल करून या देशाची सत्ता काबीज केली सेना-बीजेपीनी आणि आज पुन्हा एकदा काबीज करण्याचा त्यांचा इरादा आहे. हा त्यांचा इरादा हाणून पाडून या देशामध्ये संविधानानं प्रदान केलेलं समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय याची प्रस्थापना व्हावी. शिवबा, फुले, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचं राज्य पुन्हा एकदा या राज्यात आणि देशात निर्माण व्हावं या पवित्र हेतूनं आम्ही सर्वजण एकत्र आलेलो आहोत.

मला असा विश्वास आहे, की आमच्या आघाडीकडे, मित्र पक्षांकडे, काँग्रेसकडे लोकसभेच्या दोन जागा मागितल्या होत्या. पण त्या आम्हाला मिळाल्या नाहीत. असं जरी असलं तर व्यापक जनहिताच्या दृष्टिकोनातून, जसं शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी सांगितलं, त्याच पद्धतीनं कोणत्याही परिस्थितीमध्ये या आरएसएसच्या रिमोट कंट्रोलवर चालणारं भाजपाचं मनुवादी आणि पुंजीवादी सरकारला हद्दपार करायचं आणि महाराष्ट्रापासून देशामध्ये एक परिवर्तनाची लाट निर्माण करण्यासाठी ही महाआघाडी निर्माण झालेली आहे.

मला असा विश्वास वाटतो, की राज्यातला, देशातला कोणताही समाज समाधानी नाहीये. असंतुष्ट आहे. असंतोष आहे. हा खदखदणारा असंतोष मतदानाच्या दिवशी उफाळून येईल आणि निश्चितपणे या देशाच्या जनतेची, वेगवेगळ्या समाजाची फसवणूक करणाऱ्या भाजप, सेना, आरएसएस यांचं समांतर सरकार जे चाललेलं आहे, याला या देशाच्या मातीमध्ये दफन केल्याशिवाय रहाणार नाही, या विश्वासाने आम्ही सर्वजण एकत्र आलो आहोत. निश्चितपणे जो निकाल लागेल, तो निकालसुद्धा महाराष्ट्रातून जास्तीत जास्त आमच्या महाआघाडीचे उमेदवार निवडून येतील, असा विश्वास व्यक्त करतो. महाराष्ट्रातील जनतादेखील शिवबा, शाहू, फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला मानणारी आहे. निश्चितपणे महाआघाडीच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहतील आणि एक नवी परिवर्तनाची दिशा देशातील, राज्यातील जनता महाआघाडीला मिळवून देईल, असा विश्वास वाटतो. धन्यवाद!





# सेना-भाजपकडून लोकांची प्रचंड दिशाभूल

## रवी राणा यांचा आरोप

आज या आघाडीचं महत्त्व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये संपूर्ण जनतेचं शेतकरी, मजूर, कामगार, शोषित, दलित सगळ्या समाजाचं लक्ष लागलेलं आहे, की या आघाडीने येणाऱ्या काळामध्ये खऱ्या अर्थानं एक मोठी क्रांती या महाराष्ट्रामध्ये, देशामध्ये होणार आहे. कारण की आज आघाडी करणं ज्या अपेक्षा आहेत, त्या शिवसेना-भाजपकडून पूर्ण केल्या गेल्या नाहीत, जे स्वप्न दाखवले, लोकांची जी दिशाभूल केली, अशा शिवसेना-भाजपला धडा शिकवण्यासाठी या आघाडीची निर्मिती झालेली आहे. आम्हाला विश्वास आहे, की या आघाडीच्या माध्यमातून ज्याप्रमाणे शरदचंद्रजी पवार साहेब यांनी या देशासाठी, शेतकऱ्यांसाठी ज्या ताकदीनं काम केलं, त्याच पद्धतीने या आघाडीला सुद्धा खऱ्या अर्थानं ताकद शरदचंद्रजी पवार साहेब, सोनियाजी गांधी यांच्या माध्यमातून मिळणार आहे. म्हणून आज शिवसेनासारखा लाचार पक्ष, या शिवसेनेच्या लाचारीमुळं महाराष्ट्राचं वाटोळं झालं, ज्या शिवसेनेनी लाचारी भोगून भाजपशी केलेली युती ही लाचार युती आहे आणि भाजप-शिवसेनेनी एकमेकांवर शिवीगाळ करून पुन्हा सत्तेसाठी एकत्र आले, अशी ही शिवसेना बाळासाहेब ठाकरेंची सेना नाही, तर उद्धव ठाकरेंची लाचार सेना आहे. आमच्या आघाडीला खऱ्या अर्थानं भक्कम यश मिळेल. भक्कम ताकदीनं आम्ही मैदानात उतरलेलो आहे आणि खऱ्या अर्थानं शेतकऱ्यांचं स्वप्न, शेतमजुरांचे स्वप्न आणि संपूर्ण मागासवर्गियांचं स्वप्न पूर्ण करू, हेच आघाडीचं मिशन आहे. हेच आघाडीचं येणारं युद्ध आहे.

---

केंद्र आणि राज्य शासनाच्या धोरणामुळे शेतकऱ्यांची, आदिवासींची, दलितांची, मराठ्यांची आणि अन्य घटकांची, त्याचबरोबर लहान व्यापारी असतील, लहान उद्योजक असतील त्यांची परिस्थिती किंवा कामगार वर्ग, ज्यांच्या नोकऱ्या जाण्याची पाळी आज आली असताना सगळ्या वक्त्यांनी जी मतं मांडली ती अगदी योग्य मांडली. त्याच हिशोबानी सगळे समविचारी पक्ष एकत्र आले आणि निश्चितपणे येत्या निवडणुकीमध्ये एकमेकाला सहकार्य करू. महाराष्ट्रामध्ये 48 जागांपैकी जास्तीत जास्त जागा कशा निवडून येतील, याच दृष्टिनं आम्ही सर्वजण प्रयत्न करू. धन्यवाद!

# सरकारने जनतेचे केले वाटोळे

## हितेंद्र ठाकूर



# प्रश्नोत्तरे

**प्रश्न : महाआघाडीमध्ये किती पक्ष सहभागी झाले आहेत?**

**अशोक चव्हाण :** संघटना आणि राजकीय पक्ष धरून सध्या ही संख्या 56च्या आसपास आहे. आपण जागावाटपासंदर्भात काही प्रश्न उपस्थित केले होते. आपल्याला कल्पना आहे, की काँग्रेस पक्ष 26 जागा लढवत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस 22 जागा लढवत आहे. त्यातील प्रत्येकी दोन जागा या मित्रपक्षांना सोडलेल्या आहेत. बहुजन विकास आघाडीला पालघरची जागा काँग्रेसच्यावतीने देण्यात आलेली आहे. हातकणंगले मतदारसंघाची जागा राष्ट्रवादी काँग्रेसने स्वाभिमानी शेतकरी संघटनेला दिलेली आहे. त्याचबरोबर रवी राणा यांचा युवा स्वाभिमान पक्ष आहे, त्यांना अमरावतीची जागा राष्ट्रवादीने देऊ केलेली आहे. राजू शेट्टींना काँग्रेसतर्फे आणखी एक जागा म्हणजे दोन जागा त्यांच्या पक्षाला देण्यात येणार आहेत.



**प्रश्न : एका बाजूला 56 पक्षांची तुमची आघाडी आहे आणि दुसऱ्या बाजूला 56 इंच छाती आहे. हे आव्हान तुम्ही कसे पेलणार आहात.**

**अशोक चव्हाण :** प्रश्न अतिशय चांगला आहे. म्हणजे 56 इंचला 56 पक्ष, मला वाटतं, की आमची संयुक्त आघाडी इतकी भक्कम आहे, ही सगळी आव्हानं पेलण्याइतपत ताकद आहे. ही संयुक्त आघाडी आहे आणि खऱ्या अर्थानं गरीबांचं परिवर्तन करणारी, कष्टकरी, कामगार, शेतकरी, तरुण आणि सर्वात महत्त्वाचं संविधानाला मानणारी आघाडी आहे. दलित, अल्पसंख्याक यांना एकत्र घेऊन सर्वांसाठी रक्षण करणारी ही आघाडी आहे. त्यामुळे 56 इंचची छाती असो किंवा त्याच्यापेक्षा मोठी असो ही चिंता आम्हाला नाहीये.

**प्रश्न : मघाशी दादा म्हणाले, की रिपब्लिकनच्या एका पक्षाला सहा जागा सोडण्याची आघाडीची तयारी होती. मग इतके सगळे रिपब्लिकन पक्ष बरोबर असताना त्यांना एखाद-दुसरी जागा का सोडली गेली नाही.**

**अशोक चव्हाण :** नाही, नाही. मुद्दा तो नाहीये. कारण, ज्या ज्या पक्षांनी आमच्याकडे मागणी केली, प्रश्न कसा आहे, की शेवटी आघाडीमध्ये जे काही पक्ष आहेत, त्या सर्वांनीच जागांची मागणी केलेली नाही हे मुद्दाम सांगितले पाहिजे. आज इथे विविध संघटना आणि राजकीय पक्ष असे 56 पक्ष एकत्रित आले आहेत, पण सर्वांनीच काही जागेची मागणी केलेली नाही. सर्वांनी सांगितलं, की आमचं एकमेव धोरण आहे, की भाजप-सेना सरकारला खाली खेचलं पाहिजे. मतांचं विभाजन टाळलं गेलं पाहिजे. त्यासाठी आमची जी काही छोटी मोठी ताकद असेल ती ताकद आम्ही पूर्णपणे लाऊ आणि तुमच्यासोबत येऊन या सरकारला पराभूत केलं पाहिजे हे आमचं ध्येय आहे.



**प्रश्न : विधानसभेतलं विरोधी पक्षनेतेपद हे काँग्रेसकडे आहे. असं असताना आपल्या पक्षाचे जे विरोधी पक्षनेते आहेत, राधाकृष्ण विखे पाटील यांचं आपण समाधान का करू शकला नाही. आणि राजू शेट्टींचा सांगली मतदारसंघावर दावा आहे. तर आपण सांगली सोडणार का?**

**अशोक चव्हाण :** दोन वेगळेवेगळे प्रश्न आहेत. एकतर राधाकृष्ण विखे पाटील यांची त्यांच्या मुलासाठी जागेची मागणी होती. ती जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यामध्ये आहे आणि तिथे काही निर्णय होऊ शकला नाही. आम्ही प्रयत्न केला, पण त्यातून मार्ग निघू शकला नाही. शेवटी कसं आहे, सर्वांच्याच सोयीच्या सर्व जागा होऊ शकत नाहीत. काही जागा आमच्याकडे आहेत, काही जागा त्यांच्याकडे आहेत. प्रयत्न दोन्हींकडून झाला. अनेकवेळा वाटाघाटीचा प्रयत्न झाला, त्यातून शेवटपर्यंत

काही मार्ग निघू शकला नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तो विषय संपलेला आहे आता. राहिला प्रश्न राजू शेट्टींच्या सांगली मतदारसंघावरील दाव्यासंदर्भात, तर ती चर्चा सुरू आहे. कसं आहे, की निर्णय घेत असताना स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्याची त्यांची इच्छा आहे, आमची इच्छा आहे. त्यामुळे तो प्रयत्न आमचा सुरू आहे. पण दोन जागा निश्चित ठरलेल्या आहेत.

**प्रश्न : अशोकराव, आपले विरोधी पक्ष नेते नगरमध्ये भाजपचा प्रचार करत फिरतायंत, त्याच्या बातम्या छापून आल्या. ते असं सांगतात, की माझ्याभोवती मीडिया आहे. मी ओपनली बोलणार नाही. पण मी तुम्हाला भेटायला आलो आहे, याच्यातच काय ते समजून घ्या. काँग्रेससारख्या प्रमुख पक्षाचा विरोधी पक्षनेता, तो जर भाजप पक्षाचा प्रचार करत फिरत असेल आणि पक्ष त्याच्यावर काहीच भूमिका घेणार नसेल, तर तुम्ही कुठल्या चेहऱ्यानी मतदारसंघात निवडणुकीला सामोरे जाल.**

**अशोक चव्हाण :** एकतर ते दुसऱ्या कुठल्या पक्षाचा प्रचार करतील यावर माझा विश्वास नाही, ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट म्हणजे बातम्या छापून येऊ द्या, त्याची सत्यता जाणून घेईन ना मी आणि वस्तुस्थिती असेल त्याप्रमाणे निर्णय घेता येईल. हा विषय काही फार मोठा नाहीये. जी काही माहिती येईल, त्याची सत्यता पडताळून आम्ही निर्णय घेऊ.

**प्रश्न : तुमची एक ऑडिओ टेप व्हायरल झाली आहे आणि त्यामध्ये तुम्ही माझे कोणी ऐकत नाही, असे म्हणत आहात. मीच राजीनामा देण्याच्या मन:स्थितीत आहे, असे तुम्ही म्हणत आहात.**

**अशोक चव्हाण :** मी अद्याप ती ऑडिओ टेप ऐकलेली नाही. त्यामध्ये नेमके काय आहे, हे मला माहित नाही. चंद्रपूरच्या जागेसंदर्भात थोडी समस्या होती आणि त्यासंदर्भात पक्ष कार्यकर्त्यांचे समाधान करणं हे काँग्रेस अध्यक्ष म्हणून माझं काम आहे. त्यानुसार आम्ही तेथील समस्या सोडवत आहोत. माझ्या कार्यकर्त्यांच्या ज्या भावना आहेत, त्या समजून घेणं माझं काम आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये काही प्रश्न निर्माण झाले ही वस्तुस्थिती आहे. मी काय ती ऑडिओ क्लिप ऐकलेली नाही. पण मला जरूर सांगितलं पाहिजे, दोन लोकांमधलं संभाषण हे खासगी संभाषण आहे. परंतु, माझा मुद्दा एवढाच आहे, की तिथल्या लोकांच्या भावना काय आहेत, प्रश्न काय निर्माण झालेत आणि काय मार्ग



काढता येईल याकडं आमचा प्रयत्न सुरू आहे.

**प्रश्न : अशोकजी, भाजपचा मुकाबला करण्याची इथे भाषा करतांय, परंतु, तुमच्या पक्षातच आता तिकीट वाटपात बंडखोरी समोर येतेय. चंद्रपुरमध्ये नाराजी आहे आणि त्याचबरोबर आता औरंगाबादमध्ये तुमचे आमदार अब्दुल सत्तार यांनी अपक्ष निवडणूक लढवायची घोषणा केलीय.**

**अशोक चव्हाण :** असं आहे, की निवडणुकीच्या काळामध्ये कमी जास्त प्रमाणामध्ये बऱ्याच जिल्ह्यांमध्ये थोडा असा प्रॉब्लेम निर्माण होऊ शकतो. मला वाटतं, की या दोन चार दिवसांमध्ये बरेचसे विषय सेटल होतील. अनेक ठिकाणी, अनेक जिल्ह्यांमध्ये पक्षांतर्गत आणि इतर पक्षांसोबत सुद्धा स्थानिक पातळीवर काही विषय असतात. त्याची काळजी घ्यावी लागते. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आम्हा दोघांच्याकडून आमचे प्रतिनिधी प्रत्येक जिल्ह्यात पाठवणार आहोत. जिथे जिथे असे प्रश्न निर्माण झाले आहेत, ते सेटल करण्याचा आमचा प्रयत्न राहील. प्रत्येक इलेक्शनला असे विषय येत असतात.

**प्रश्न : जयंतराव, माढ्यामध्ये विजयदादा तुमच्या पक्षाचा प्रचार करणार का?**

**जयंत पाटील :** आम्ही उलट विजयदादांनाच उमेदवारी दिलेली होती. पण त्यांनी उभं रहाण्यास प्रांजळपणानं नकार दिला. त्यानंतर त्या मतदारसंघातल्या सर्वांना विश्वासात घेऊन संजयमामा शिंदे हे अतिशय तरूण, तडफदार आणि अतिशय उत्तम असे उमेदवार आम्ही निवडलेले आहेत. कालच त्यांच्या उमेदवारीची घोषणा झाली. मला वाटतं, की जे आमच्या पक्षात आहेत, ते सगळेच त्यांचा प्रचार करतील.

**प्रश्न : मागील निवडणुकीत मोदीजी चायवाला बनले होते, यावेळी चौकीदार बनले आहेत. याकडे तुम्ही कसे पाहता.**

**अशोक चव्हाण :** देशाच्या चौकीदारासंबंधी लोकांची काय भूमिका आहे किंवा लोकांचे काय म्हणणे आहे हे संपूर्ण देश बोलत आहे. चाय की चर्चा चौकीदारापर्यंत पोहोचली आहे. देशाचा चौकीदार काय करत आहे हे सगळ्या देशाला माहित आहे. देशाच्या एका चौकीदारामुळे बाकी चौकीदार बदनाम होऊ नयेत हीच आमची अपेक्षा आहे.





लालकृष्ण अडवानी(वय 91 पूर्ण 92 चालू), मुरली मनोहर जोशी (वय 85), शांताकुमार (वय 84), कलराज मिश्र (वय 76), भगतसिंग कोशियारी(वय 76) भाजपचे हे वयोवृध्द व अनुभवी नेते. मावळत्या लोकसभेचे ते सदस्य होते. आता होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी त्यांना उमेदवारी नाकारण्याचा निर्णय भाजप नेतृत्वाने केला आहे. पंच्याहत्तरी पार केल्याचे कारण त्यासाठी देण्यात आले आहे. हे नेते अद्याप सक्रिय आहेत आणि तल्लखही आहेत. अडवानी, शांताकुमार किंवा जोशी, कोशियारी हे अजुनही बिनाकाठीचे किंवा विनाआधारे हिंडतात ही बाब विशेषत्वाने नमूद करावी लागेल. तरीही त्यांना सक्तीने निवृत्त करण्यात आले आहे. नव्यांना संधी मिळाली पाहिजे आणि जुन्या-जाणत्या मंडळींनी स्वतः होऊनच आपल्या सक्रियतेला विराम देणे अपेक्षित असते. परंतु राजकारण हे असे क्षेत्र आहे की त्यामध्ये निवृत्ती नसते. कुणी स्वेच्छेने व आपापल्या कारणास्तव निवृत्ती घेण्याची उदाहरणे सापडतात. परंतु ती क्वचित व विरळ किंवा अपवादानेच सापडतात. त्यामुळेच एखाद्या पक्षनेतृत्वाने जाणीवपूर्वक आपल्याच पक्षातील काही मोजक्या नेत्यांना वयाचा निकष लावून निवृत्त करण्याचा हा प्रकार चर्चेत आल्याखेरीज रहात नाही. त्यातून वयोवृध्दांची निवृत्तीबद्दलची प्रतिकूलता, नाराजी व त्यांच्यावरील सक्तीची प्रतिक्रिया या बाबी वादग्रस्त ठरल्याखेरीज रहात नाहीत. म्हणूनच वरील नेत्यांना निवृत्त केल्याने सध्या त्याचबाबत राजकीय वर्तुळात भरपूर चर्चा सुरु आहे.

मुरली मनोहर जोशी वर्तमान लोकसभेत कानपूरचे प्रतिनिधित्व करीत होते. त्याआधी 2014 पर्यंत त्यांनी वाराणसीचे प्रतिनिधित्व केले होते. परंतु नरेंद्र मोदी यांनी वाराणसीहून लोकसभेची निवडणूक लढविण्याचा निर्णय केल्यानंतर त्यांची बदली कानपूरला करण्यात आली होती. जोशी तेव्हाच नाराज झाले होते. कारण त्यांच्या परस्पर, त्यांना विश्वासात न घेता त्यांची थेट कानपूरला बदली करण्यात आली होती. त्यामुळे मागील संसद अधिवेशनात त्यांना अनौपचारिकपणे येत्या निवडणुकीत कुठून उभे राहणार असे विचारले असता त्यांनी काहीशा उपहासाने, 'पक्ष सांगेल तेथून अन्यथा बाहेर !' असे उत्तर दिले होते. त्यामुळेच त्यांना या निवडणुकीसाठी उमेदवारी नाकारण्याचे पक्षाने ठरविले त्यावेळी पक्षाचे संघटनात्मक बाबींचे प्रमुख सरचिटणीस रामलाल त्यांना भेटण्यास गेले आणि त्यांनी जोशी यांना पक्षाचा निर्णय सांगितला. त्यानंतर जोशींनी कानपूरच्या मतदारांच्या नावाने एक दोन ओळीचे पत्र प्रसिध्दीस दिले. त्यामध्ये त्यांनी पक्षातर्फे



# भाजपमधून वयोवृध्दांना बाहेरचा रस्ता!

**अवलोकितेश्वर**

सरचिटणीस रामलाल आपल्याला भेटले आणि त्यांनी कानपूर अन्य कोठूनही आपण लोकसभा निवडणूक लढवू नये असे आपणास सांगितले असल्याचे नमूद केले. हे पत्र प्रसिध्दीस देऊन त्यांनी पक्षनेतृत्वाला एकप्रकारे आपली नाराजीच कळविली. कानोकानी समजलेल्या माहितीनुसार जोशी यांनी पक्षाचा हा निर्णय पक्षाध्यक्षांनी स्वतःच आपल्याला सांगितला का नाही? ते आपल्याशी थेट बोलू शकत नाहीत काय ? त्यात त्यांना कोणती अडचण होती ? असे प्रश्न रामलाल यांना विचारले आणि त्यावर बिचारे रामलाल यांना गप्प बसावे लागले. बहुधा या सर्व प्रकाराची पूर्वकल्पना इतर पंच्याहत्तरी पार केलेल्या नेत्यांना आलेली असावी कारण त्यांनी असे काही होण्यापूर्वीच आपण होऊनच ते आगामी लोकसभा निवडणूक लढवू इच्छित नसल्याचे जाहीर करुन टाकले होते आणि स्वतःची व एकप्रकारे पक्षनेतृत्वाचीही सुटका करुन टाकली.

कोणत्याही पक्षात नवीन नेतृत्व आल्यानंतर 'नवे विरुध्द जुने' हा संघर्ष अटळ असतो. त्याला कोणताच पक्ष अपवाद नसतो. नवे नेतृत्व प्रस्थापित होईपर्यंत हा संघर्ष चालू राहतो. इंदिरा गांधी यांच्याकडे काँग्रेसचे नेतृत्व आल्यानंतर हे घडले होते. त्यानंतर राजीव गांधी यांच्या काळातही कमलापती त्रिपाठी या उत्तर प्रदेशातल्या वजनदार नेत्याने बंडखोरी केलेलीच होती. आता राहूल गांधी यांच्या काळातही त्याची पुनरावृत्ती होत आहे. त्यामुळे भाजपमध्येही मोदी व अमित शहा यांच्या उदयानंतर जुन्या वयोवृध्द नेत्यांना बाजूला करण्याच्या निर्णयाच्या सर्वदूर आणि व्यापक प्रतिक्रिया या होणारच आहेत. त्यातून हा पक्ष स्वतःला कसा सावरतो आणि वयोवृध्द नेते यापुढील काळात कसे आचरण करतील याकडे बारकाईने लक्ष ठेवावे लागणार आहे.

या सर्व नेत्यांमधील सर्वात वयोवृध्द असलेल्या लालकृष्ण अडवानी यांच्या राजकीय कारकिर्दीचा यानिमित्ताने आढावा घ्यावा लागेल कारण त्यातून वर्तमान भाजपचे स्वरुप स्पष्ट होऊ शकेल. अटलबिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात लालकृष्ण अडवानी हे आक्रमक भूमिका घेणारे नेते म्हणून ओळखले जात. पाकिस्तानच्या हद्दीत घुसून दहशतवाद्यांचा मुकाबला करण्याची भाषा(हॉट परसूट) त्यांनीच केलेली होती. सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादाचा बीमोड करण्यासाठीही त्यांनी कठोर पावले उचलली होती. त्याचबरोबर पक्षसंघटनेची सारी सूत्रे ते हलवीत असत.


गुजरातमध्ये नरेंद्र मोदी यांना संधी देण्यामागे त्यांचीच निर्णायक भूमिका होती. गुजरात दंग्यानंतरही वाजपेयी यांच्या

# मोदींनी दुर्लक्षिले अडवाणींना




रागाला न जुमानता मोदींना वाचविण्याचे श्रेय अडवानी यांनाच जाते. त्यामुळेच मोदी हे अडवानी यांचे शिष्योत्तम असल्याची प्रतिमा त्या काळात रंगवली गेली. लालकृष्ण अडवानी यांनी पोलादी गृहमंत्री म्हणून सरदार पटेलांनंतर स्वतःची प्रतिमा तयार केली होती तर मोदींना त्या काळात 'छोटे सरदार' म्हणून ओळखले जाऊ लागले होते. त्यामुळेच या गुरु-शिष्यांमध्ये नंतरच्या काळात झालेला बेबनाव हा चर्चेचा विषय ठरला. शिष्याने गुरुला एकाकी पाडण्याचे केलेले प्रकार वादग्रस्तही ठरले. त्यामुळेच या टप्प्यावर अडवानींची विशेष दखल घेणे आवश्यक ठरेल.

लालकृष्ण अडवानी यांना गांधीनगरमधून उमेदवारी जाहीर झाली नाही. त्यांच्या संसदीय राजकारणाच्या सक्रियतेला मिळालेला हा विराम आहे. राजकारणातील व्यक्ती कधी निवृत्त होत नसते. त्यामुळे त्यांच्या राजकारणाला हा पूर्णविराम मिळाला असे मानता येणार नाही. जोपर्यंत शक्य होईल तोपर्यंत अडवानी हे राजकीयदृष्ट्या जागरूक राहतील ही बाब निःसंशय आहे. अडवानी अद्याप तल्लख आहेत ही बाब विसरुन चालणार नाही. अडवानी यांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली की त्यांचे 'तिकिट कापण्यात' आले यावर उलटसुलट चर्चा सुरु आहे. त्याबाबतची वस्तुस्थिती अडवानी यांनाच ज्ञात आहे. परंतु त्यांच्या निकटवर्तीयांकडून मिळालेल्या माहितीनुसार निवडणुकीसाठी उमेदवारांच्या निवडीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर भाजपच्या वर्तमान 'हायकमांड'चे एक दूत त्यांच्याकडे गेले होते. त्या दूतांनी अडवानी यांना थेट त्यांना उमेदवारी नाकारण्याचा प्रस्ताव करण्याऐवजी त्यांच्या कन्या प्रतिभा अडवानी यांना गांधीनगरहून उमेदवारी देण्याचा प्रस्ताव पुढे केल्याचे समजले. त्यावर अडवानी यांनी ही कल्पना कुणाची असा सवाल केल्यानंतर, 'अध्यक्षजी' असे उत्तर त्या दूतांनी दिले. त्यावर अडवानी यांनी म्हणे, 'कौन अध्यक्ष जी?' असा प्रतिसावल केल्याची माहिती समजते. त्यानंतर त्यांनी घराणेशाहीच्या विरोधातील त्यांच्या आयुष्यभराच्या लढ्याचे कारण पुढे करुन प्रस्ताव


आपली कन्या प्रतिभा हिच्या समवेत लालकृष्ण अडवानी

नाकारला. अशा प्रस्तावावर या वयोवृध्द नेत्याची प्रतिक्रिया काय असू शकेल याचा अंदाज भाजपच्या वर्तमान नेतृत्वाला नसेल असे समजणे हा वेडगळपणा ठरेल. त्यामुळे थेट उमेदवारी नाकारण्याचा वाईटपणा पत्करण्याऐवजी त्यांच्या कन्येला उमेदवारी देण्याचा हा डाव खेळण्यात आला असे अनुमान यावरुन काढल्यास ते फारसे अनाठायी ठरणार नाही. अडवानी यांचे वय 91 वर्षे आहे. आता आपल्या संसदीय कारकिर्दीच्या विरामबिंदूपाशी आपण




लालकृष्ण अडवानी हे नाव जोडले गेले आहे. अडवानी आणि भाजप यांना वेगवेगळे करता येणार नाही इतके ते परस्पर-निगडित आहेत. फार जुन्या इतिहासात जाण्याची आवश्यकता नाही. भाजपला संभाव्य सत्तापक्षाच्या स्पर्धेत आणण्याची कामगिरी अडवानी आणि अटलबिहारी वाजपेयी या दोन नेत्यांनी केली. 1977 मध्ये तत्कालीन भारतीय जनसंघाच्या नेत्यांनी 'काँग्रेसविरोधी' पक्षांच्या बरोबरीत जनता पक्षात सामील होऊन केंद्रीय किंवा राष्ट्रीय सत्तेची फळे सर्वप्रथम चाखली होती. जनता पक्षाच्या विघटनानंतर भारतीय जनता पक्षाची स्थापना करण्यात येऊन स्वतंत्र वाटचालीचा निर्णय करण्यात आला. तेव्हापासून लालकृष्ण अडवानी यांच्या कर्तृत्वाला खऱ्या अर्थाने वाव मिळाला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. एप्रिल 1980 मध्ये जनता पक्षापासून विभक्त होऊन भारतीय जनता पक्षाची स्थापना करण्यात आली. नंतरचा काळ फारसा सुखावह नव्हता कारण ना संसदेत ना संसदेबाहेर या पक्षाला कुणी फारसे विचारीत नव्हते. परंतु वाजपेयी, अडवानी, जसवंतसिंग यांच्यासारखी मंडळी संसद गाजवत होती आणि आपली छाप पाडत होती.



पोहोचल्याची बाब त्यांच्या मनात आली नसेल ही बाब शक्य वाटत नाही. त्यामुळेच भाजपच्या वर्तमान नेतृत्वाने अधिक परिपक्वतेने परिस्थिती हाताळून अडवानी यांच्या संसदीय निवृत्तीचा निर्णय केला असता तर त्याची चर्चा झाली नसती. त्याऐवजी पक्षाने परस्पर गांधीनगरहून पक्षाध्यक्ष अमित शहा यांच्या उमेदवारीची घोषणा करुन अडवानी यांचा 'पत्ता कापला' असा जो संकेत दिला तो अनुचित होता त्यामुळे त्याबद्दल उलटसुलट चर्चा, मत-मतांतरे प्रदर्शित होऊ लागली. ही कटुता टाळणे शक्य होते. ती का टाळली गेली नाही हे एक भलेमोठे प्रश्नचिन्ह कायम राहील!

भाजपचा उदय, विकास, वाढ-विस्तार या प्रत्येक टप्प्याला





येऊ लागले तशी त्यांनी माघार घेण्यास सुरुवात केली. विश्व हिंदू परिषदेने अयोध्येत बाबरी मशीदीच्या जागी राम मंदिर उभारण्यासाठी चळवळ सुरु केलेलीच होती. ही संधी अडवानी यांनी अचूक हेरली. हा मुद्दा भाजपच्या संभाव्य सत्ता-सोपानाची पहिली पायरी राहील हे त्यांनी ओळखले आणि त्यांनी विश्व हिंदू परिषद, रा.स्व.संघापाठोपाठ त्यात उडी मारण्याचा निर्णय केला.

पक्षवाढ व विस्ताराच्या दृष्टीने प्रयत्न चालू असतानाच 1984 मध्ये इंदिरा गांधी यांच्या हत्येची घटना घडली. राष्ट्रीय एकात्मता टिकविण्याच्या घोषणेवर काँग्रेस पक्षाला लोकांनी ऐतिहासिक व अभूतपूर्व असा कौल दिला. या लाटेत पालापाचोळ्यासारखी अवस्था झालेल्या विरोधी पक्षांमध्ये भाजपचाही समावेश होता. भाजपचे केवळ दोनच खासदार लोकसभेत होते. वाजपेयी पराभूत झाले होते. एकंदरीतच निराशाजनक स्थिती होती. परंतु राजकारणाची गतिमानता व चैतन्यशीलता ही विलक्षण असते. नंतरच्या तीन वर्षात देशातील राजकीय वातावरण बदलले.

या काळात भाजपने गांधीवादी समाजवादाकडून आपल्या मूलभूत अशा हिंदुत्व विचारसरणीकडे वळण्याचा निर्णय केला होता. याचे जनकत्व अडवानी यांच्याकडे जाते. राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांना त्यांच्या सल्लागारांनी सौम्य हिंदुत्वाची कास धरुन हिंदू समाजाचा व्यापक पाठिंबा मिळविण्याचा सल्ला दिला. राजकारणात नवखे असलेल्या राजीव गांधींना एवढ्या सहज मार्गाने नेतृत्व प्रस्थापित करण्याची संधी मिळताना पाहून त्यातील धोके लक्षात आले नाहीत. अयोध्येतील वादग्रस्त वास्तूची कुलुपे उघडण्याचा निर्णय त्यांनी केला. परंतु त्यानंतर त्यातील धोके त्यांच्या जसे लक्षात


पालमपूर(हिमाचल प्रदेश) येथे भाजप कार्यकारिणीची बैठक झाली व भाजपने रामजन्मभूमि आंदोलनाला पाठिंबा देण्याची भूमिका जाहीर केली. हा मुद्दा भाजपला सत्तेपर्यंत नेऊ शकतो हे हेरण्याचे श्रेय अडवानींना जाते. या मुद्यावर विश्व हिंदू परिषद व रा.स्व.संघाने आंदोलन सुरु केलेले होते. परंतु राजकीय पक्ष या नात्याने त्याला निवडणुकीचा मुद्दा बनविण्याची भूमिका अडवानी यांनी जून-1989च्या पालमपूर येथील कार्यकारिणीच्या बैठकीत पक्षाच्या गळी उतरवली. तोपर्यंत या मुद्यावर विश्व हिंदू परिषद व संघाने रान उठविलेले होते. राजकीय पक्ष या नात्याने भाजपने त्या मुद्याला दत्तक घेतले. यानंतर अडवानी यांनी मागे वळून पाहिलेच नाही असे म्हटल्यास वावगे होणार नाही. पालमपूर येथील कार्यकारिणीने राममंदिराच्या मुद्या पाठिंबा देण्याबरोबरच अयोध्येत वादग्रस्त स्थानी भव्य राम मंदिराची उभारणी करण्याच्या संकल्पनेचा पुरस्कार केला. एका



बाजूला भ्रष्टाचाराचा मुद्दा(बोफोर्स दलाली) तर दुसऱ्या बाजुला राममंदिर अशा दोन मुद्यांवर भाजपने राजकारण केंद्रित केले होते.


अडवानी यांनी आक्रमक हिंदुत्वाची भूमिका घेणे आणि वाजपेयी यांनी उदारमतवादाचा आधार घ्यावयाचा आणि आक्रमकतेची धार कमी करुन भाजपची इतर राजकीय पक्षांमधील स्वीकार्यता वाढवायची ही या नेत्यांची रणनीती यशस्वी होत गेली. बोफोर्स तोफ व्यवहारातील कथित दलालीच्या प्रकरणाने राजीव गांधी यांच्या स्वच्छ प्रतिमेला तडे गेले होते. त्यांचे विश्वासू सहकारी विश्वनाथ प्रतापसिंग यांनी केलेल्या बंडामुळे या मुद्याला वेगळे राजकीय परिमाण लाभले.

पक्षांच्या बरोबरीने केला. राजीव गांधी यांच्या विरोधातील राजकीय वातावरण आणि हिंदुत्व (अयोध्यारुपी) यांच्या आधाराने अडवानी यांच्या नेतृत्वाखालील भाजपने 1989मध्ये 85 जागा मिळविल्या. यानंतर सातत्याने भाजपच्या संख्याबळात चढत्या क्रमाने वाढ होत गेली. या काळात अडवानी यांनी भाजपचा संघटनात्मक आणि वैचारिक विस्तार करण्यासाठी विविध प्रयत्न केले व त्यास प्रतिसाद मिळत गेला. एका बाजुला हिंदुत्वाची भूमिका घेतानाच भाजप हा इतर पक्षापेक्षा वेगळा कसा आहे हे जनतेसमोर मांडताना त्यांनी सांस्कृतिक राष्ट्रवाद, स्वराज्य, सुशासन यासारख्या मुद्यांना प्राधान्य दिले. विशेषतः अडवानी



राममंदिराचा मुद्दा काहीसा बाजूला गेला आणि भ्रष्टाचाराचा मुद्दा आघाडीवर आला. परंतु तेथेही तात्पुरत्या काळासाठी का होईना भाजपची धुरा सांभाळणाऱ्या अडवानी यांनी इतर विरोधी पक्षांची साथ देण्याची भूमिका घेतली. विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या सरकारला बाहेरुन पाठिंबा देण्याचा निर्णय त्यांनी डाव्या

यांनी 'सुशासन' आणि सांस्कृतिक राष्ट्रवादावर विशेष भर दिला. यातूनच त्यांच्या काळात 'सब को परखा हमको परखे' 'भाजप–पार्टी वुइथ डिफरन्स' अशा घोषणांची निर्मिती झाली होती. अडवानी यांनी 1989 पर्यंत 'राजकीय अस्पृश्यता' न पाळण्याची भूमिका घेतली होती. तोपर्यंत भाजपने इतर विरोधी पक्षांच्या



बरोबर राहून किंवा 'पाठकुळी राजकारण' (पिग्गिबॅकिंग) यशस्वीपणे करुन भाजपचा विविध राज्यांमध्ये विस्तार केला. 1989 मध्ये पक्षाला 85 जागा मिळाल्यानंतर हे राजकारण सफल होताना आढळून आले. त्यात विश्वनाथ प्रतापसिंगांनी त्यांच्या पक्षातील देवीलाल व इतरांना शह देण्यासाठी मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करुन 'ओबीसी' राजकारणाचे एक नवे पर्व देशात सुरु केले. त्याचाही लाभ अडवानींच्या



पी. व्ही. नरसिंहराव
अटलबिहारी वाजपेयी
व इंद्रकुमार गुजराल
हास्यात रमलेले.

नेतृत्वाखालील भाजपने घेतला आणि 'मंडल विरुध्द कमंडल' राजकारणाची सुरुवात केली. विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या मंडल राजकारणाला शह देण्यासाठी अडवानी यांनी सोमनाथ ते अयोध्या रथयात्रा सुरु केली. या रथयात्रेने अडवानी हे भाजपचे 'शिखर-पुरुष' म्हणून ओळखले जाऊ लागले. मंडल विरुध्द कमंडल किंवा सामाजिक न्याय शक्ति विरुध्द हिंदुत्वावादी शक्तींच्या संघर्षशील राजकारणाचा हा प्रारंभ होता. अडवानी व अन्य नेत्यांची रथयात्रा अडविणे आणि त्यांना अटक करणे ही त्या संघर्षाची ठिणगी होती.

आता भाजपमध्ये एक नवा आत्मविश्वास तयार होऊ लागला होता. 1991 मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर भाजप हा प्रमुख विरोधी पक्ष (120 जागा) म्हणून लोकसभेत स्थापित झाला. वाजपेयी, अडवानी, जसवंतसिंग, मुरली मनोहर जोशी ही मंडळी प्रथम रांगेत बसू लागली. आता एकच लक्ष्य उरले होते आणि ते म्हणजे 'सत्तापक्ष' होण्याचे, या देशाची सत्ता प्राप्त करण्याचे ! 1991मध्ये उत्तर प्रदेशात विधानसभा निवडणुकीत भाजपला प्रथमच सत्ता मिळाली.

कल्याणसिंग या ओबीसी नेत्याला मुख्यमंत्री करण्यात आले. याखेरीज मध्य प्रदेश व राजस्थानातही पक्षाला सत्ता मिळाल्याने आता भाजपने आपले सर्व प्रयत्न केंद्रातली सत्ता हस्तगत करण्यावर केंद्रित केले होते. सत्ता समोर दिसू लागली होती. 1996 मध्ये त्रिशंकू लोकसभा अस्तित्वात आली. भाजप हा सर्वाधिक संख्याबळ(161) असलेला पक्ष होता. केंद्रात एकदा तरी सत्तारूढ व्हायचे या एकमेव हेतुने भाजपने सरकारस्थापनेचा दावा सांगितला. तोपर्यंत अन्य विरोधी पक्षांमध्ये सरकारस्थापनेबाबत चर्चा झालेली नव्हती. वाजपेयींच्या नेतृत्वाखाली हे सरकार स्थापन झाले पण केवळ तेरा दिवसात ते पडले.

अडवानी यांनी भाजपला केंद्रीय सत्तेपर्यंत पोहोचविले खरे पण त्या सत्तेचे नेतृत्व त्यांना मिळाले नाही. असे का ? माखनलाल फोतेदार यांच्या पुस्तकात याबाबतचा एक संदर्भ सापडतो व तो खरा मानायचा झाल्यास अडवानी हे तत्कालीन दरबारी राजकारणाचे बळी ठरले असावेत असे अनुमान काढावे लागेल. नरसिंह राव हे पंतप्रधान असताना त्यांनी त्यांच्या कारकिर्दीच्या अखेरीला त्यांच्याच पक्षातील प्रतिस्पर्ध्यांचा काटा काढण्याचे




चौधरी देवीलाल

शर्मा कृष्णलाल

प्रयत्न सुरु केले. जैन हवाला डायरी प्रकरण हा त्याचाच एक भाग होता व त्या आधारे त्यांनी अनेकांना वाटेला लावण्याचे प्रयत्न केले. या डायरीत अडवानी यांच्या नावाचा उल्लेख होता आणि त्यामुळे अडवानी यांनी लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्या घटनेपासून अडवानी राव यांच्यावर विलक्षण नाराज होते आणि कसेही करुन राव यांना सत्तेवरुन हटवायचे त्यांच्या मनाने घेतले. फोतेदार यांच्या म्हणण्यानुसार एका ब्राह्मण नेत्याला दुसऱ्या पर्यायी ब्राह्मण नेत्याचे नाव पुढे करुनच हटविता येईल हा सिध्दांत त्यांनी भाजपनेते कृष्णलाल शर्मा यांना सांगितला किंवा त्यांच्या गळी उतरविला. शर्मा यांनी अडवानी यांची समजूत पटविली आणि 1995 मध्ये अडवानी यांनी वाजपेयी हे भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार असतील असे जाहीर केले. त्यानंतर 1996, 1998 व सरतेशेवटी 1999 मध्येही वाजपेयी हेच पंतप्रधान झाले. अडवानी यांनी उप-पंतप्रधानपदापर्यंत मजल मारली.

2004 व 2009 या दोन निवडणुका पूर्णतया अडवानी यांच्या नेतृत्वाखालच्या होत्या. परंतु 1999 पर्यंत अडवानी यांनी पक्षाचे प्रमुख रणनीतीकार या नात्याने मिळविलेल्या यशाने त्यांना 2004 व नंतर 2009 मध्ये हुलकावणी दिली. 1999 मध्ये पक्षाने 182 जागा मिळविण्याची मजल गाठली. 2004 मध्ये 138 व 2009 मध्ये 116 पर्यंत संख्याबळ घसरले आणि अडवानी यांच्या नेतृत्वालाही उतरती कळा लागली. अडवानी थांबण्यास तयार नव्हते. तोपर्यंत पक्षात नव-नेतृत्वाचे वारे वाहू लागले होते. अडवानींना या बदलत्या हवेची जाणीव झाली होती परंतु कळूनही ते उमजू शकले नसावेत. वाजपेयींच्या अनुपस्थितीत आता तरी पंतप्रधानपद आपल्याला मिळेल किंवा पक्ष आपल्याला साथ देईल या आशेवर ते राहिले आणि ती आशाही फोल ठरली. पंतप्रधानपद गेले किमान राष्ट्रपतिपद तरी मिळेल ही आशाही त्यांनी बाळगली व तेथेही त्यांच्या पदरी निराशा आली. वाजपेयींच्या नेतृत्वाची चमक उतरु लागल्यानंतर त्यांची जागा घेण्याच्या दृष्टीने आणि आपणही उदारमतवादी किंवा अन्य विचारांची दखल घेणारे नेते असल्याचे दाखविण्यासाठी अडवानी यांनी पाकिस्तानच्या भेटीत महमंद अलि जिन्हा यांची तारीफ करताना त्यांना धर्मनिरपेक्षतेचे प्रमाणपत्र दिले. ते कुणालाच रुचले नाही. रा.स्व.संघाने तर ते फेटाळून लावले. अडवानी यांना हे विधान विलक्षण भोवले. त्या आघातातून ते स्वतःला सावरु शकले नाहीत.

संसदेतली ही शेवटची पाच वर्षे अडवानी यांनी अनुल्लेख व उपेक्षा सहन करीत घालवली. ते दृष्य पाहणे कधीकधी असह्य असायचे. पण या शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्यांनी ते सर्व सहन केले. आज स्वतःला उत्तुंग समजणारी त्यांच्या पक्षातली नेतेमंडळी एक मूलभूत गोष्ट विसरत आहेत. ते अडवानी यांच्या खांद्यावर उभे आहेत म्हणून त्यांचे खुजेपण झाकले गेले आहे. अडवानींची दखल घेतल्याखेरीज भारतीय जनता पक्षाची वाटचाल पूर्ण होणार नाही. भारतीय राजकारणातही अडवानी हे एक अध्याय म्हणून कायम राहतील!



फोतेदार माखनलाल जसवंत सिंग कल्याण सिंग



# सत्तेत राहण्यासाठी धडपड


**आकाश**
नवी दिल्ली

27 मार्च 2019 हा दिवस 'विश्व रंगमंच दिवस' म्हणून साजरा केला गेला. रंगमंच म्हटल्यावर नाटक आणि अभिनय हे ओघाने आलेच ! तर या दिवशी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास सर्व वृत्तवाहिन्यांवर पाट्या झळकू लागल्या--- पावणेबारा ते बारा वाजण्याच्या दरम्यान पंतप्रधान देशाला उद्देशुन भाषण करतील ! सर्व लोकांच्या पोटात गोळा उभा राहिला. आता नवीन काय वाढून ठेवलंय म्हणून देशभर चर्चा सुरु झाली. बारा वाजून वीस मिनिटांनी देशभरातल्या टीव्हींच्या पडद्यावर 'विष्णु-अवतारी नेते' उर्फ 'विश्वगुरु' उर्फ' ब्रह्मांड नायक' अवतीर्ण झाले. सुमारे वीस ते पंचवीस मिनिटे त्यांनी भाषण केले. भारताने अंतरिक्षातील म्हणजे अंतराळातील उपग्रह नष्ट करण्याचे कौशल्य यशस्वीपणे प्राप्त केल्याची माहिती देण्यासाठी त्यांनी हा खटाटोप केला. हे कौशल्य व तंत्रज्ञान आतापर्यंत केवळ अमेरिका, रशिया आणि चीन या तीन राष्ट्रांपुरतेच मर्यादित होते आता त्यांच्या या 'क्लब'मध्ये भारताचाही समावेश झाला आहे. भारत आता अंतराळातील एक महासत्ता झाला आहे वगैरे वगैरे फुशारक्या नेहमीप्रमाणे मारण्यात आल्या. नेहमीचाच नाटकीपणाही करण्यात आला. भाषणाच्या अखेरीला हात जोडून भारता माता की जय म्हणताना विश्वगुरुंचे हात चक्क थरथरताना दिसून आले. ते ठीक आहे. कदाचित त्यांची प्रकृति बरी नसावी किंवा घोषणेचा दबाव त्यांच्या मनावर आला असावा.

लोकसभेच्या निवडणुका होत असताना अचानक असे कोणते संकट आले की ज्यामुळे विश्वगुरुंना उपग्रहविरोधी क्षेपणास्त्राच्या चाचणीची अनिवार्यता वाटली ? कारण हे तंत्रज्ञान व कौशल्य प्राप्त असलेल्या तीन देशांपैकी अमेरिका व रशिया हे मित्रदेश आहेत आणि चीन देखील आततायी देश मानला जात नाही. मग अचानक अशा या क्षेपणास्त्राच्या चाचणीची आवश्यकता ब्रह्मांडनायकांना का वाटली असावी बरे ? कारण उघड आहे ! लोकसभेच्या निवडणुका!

बाकी सर्व आघाड्यांवर सार्वत्रिक अपयश झाकण्यासाठी






ब्रह्मांडनायकांना आता राष्ट्रवाद, देशभक्ति, सुरक्षा यासारख्या मुद्यांची आठवण येऊ लागली आहे. गुजरातचे मुख्यमंत्री असताना देखील त्यांनी विकास व प्रगतीचा मुद्दा केवळ नावालाच वापरला होता. त्यांनी मते मिळवली 'मियां मुशर्रफ', 'हमारे पांच उनके पचीस' अशा ध्रुवीकरणाच्या घोषणांवर ! आता त्याचा राष्ट्रीय पातळीवर प्रयोग सुरु आहे. प्रगती, विकास, अच्छे दिन या घोषणा आता पार गायब झाल्या आहेत. त्यांची जागा घेतली गेली आहे ती 'दहशतवाद, अंतर्गत सुरक्षा, देशभक्ति, राष्ट्रवाद' यांनी ! पुलवामा आणि बालाकोट मोहिमेबद्दल प्रश्न विचाराल किंवा शंका व्यक्त केल्यास तत्काळ तुमच्यावर देशद्रोहाचा शिक्का मारला जाऊ शकतो. पाकिस्तान, दहशतवाद, सुरक्षा असे मुद्दे बाहेर काढले की आपोआपच लोकांना देशभक्ति व राष्ट्रवादाची आठवण दिली जाऊ लागते. मग त्यात बेकारी, गरीबी, महागाई, शेतकरी व ग्रामीण भागातील वाढता असंतोष हे खरे ज्वलंत मुद्दे मागे टाकण्याचा प्रयत्न केला जातो. लोकसभेच्या सध्याच्या निवडणुकीत हाच प्रचार सुरु करण्यात आला आहे. विरोधी पक्ष हे पाकिस्तानचे हस्तक आहेत, दहशतवाद्यांचे समर्थक आहेत, देशद्रोही लोकांना मदत करणारे आहेत असे अत्यंत बेलगाम, निरर्गळ आरोप ब्रह्मांडनायकांतर्फे लावले जात आहेत. त्यांचा तोल सुटलेला आहे. कारण उघड आहे. त्यांच्याकडे आता विकास व प्रगतीच्या सांगण्यासारख्या कथा-कहाण्या उरलेल्या नाहीत.

त्या सांगूनही त्यावर विश्वास ठेवायला लोकं तयार नाहीत अशी स्थिती आहे. त्यामुळेच नाटकीपणा, खोटा अभिनिवेश आणि आपण कसे साहसी आहोत याच्या कथा कहाण्या सांगण्याचा सपाटा या ब्रह्मांडनायकाने लावला आहे.

हा तोल का सुटला ? त्यालाही कारणे आहेत. त्याचप्रमाणे अचानक उपग्रहविरोधी क्षेपणास्त्राच्या चाचणीची कल्पना डोक्यात आली कशी ? याला कारण विरोधी पक्षांतर्फे ज्या योजना आता सादर होऊ लागल्या आहेत त्या लोकांना पटू लागल्या आहेत आणि त्यामुळे गोंधळून गेलेले ब्रह्मांडनायक आता तोल सुटल्यासारखे वागू लागले आहेत. या उपग्रहविरोधी क्षेपणास्त्राच्या चाचणीचे 'टायमिंग' लक्षात घ्या आणि स्वतःलाच प्रश्न करा, 'हे आताच का ?' मंडळी, तुम्हाला आठवत असेलच की काँग्रेस अध्यक्ष राहूल गांधी यांनी काही दिवसांपूर्वीच देशातील पाच कोटि अतिगरीब परिवारासाठी वार्षिक 72 हजार रुपये म्हणजेच दरमहा सहा हजार रुपयांच्या साह्याची घोषणा केली आली कारण ज्या दिवशी राहूल गांधी यांनी ही घोषणा केली त्याच दिवशी सायंकाळी सरकारने अर्थमंत्री अरुण जेटली यांच्यावर त्याला प्रत्युत्तर देण्याची जबाबदारी टाकली. जेटली यांनी या योजनेवर बोलण्याचे टाळून केवळ इंदिरा गांधी, पूर्वीची गरीबी हटाव योजना अशा काहीतरी निरर्थक संदर्भांचा उल्लेख केला आणि ही योजना अमलात येण्यासारखी नाही असे म्हणून टाकले. एरव्ही वकिली बाण्याने आणि शब्दच्छल करुन विरोधी पक्षांवर टीका करण्याचे कसब जेटली यांच्याकडे आहे पण त्या दिवशी त्यांना राहूल गांधी यांच्या योजनेवर टीका करताना शब्द सापडेनासे झालेले होते आणि अक्षरशः त्यांनी पत्रकार परिषदकाहीच वेळात आटोपती घेतली.

आता या उपग्रह विरोधी क्षेपणास्त्राबाबतची माहितीही घेऊ ! 'द हिंदू' हे एक अत्यंत गंभीर असे इंग्रजी दैनिक आहे. या दैनिकाने 2011 मध्ये डीआरडीओ(डिफेन्स रीसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन)चे तत्कालीन सरसंचालक व



होती. हे पैसे या कुटुंबांच्या थेट खात्यात जमा होणार आहेत. किमान आर्थिक साह्य हमी योजना अशी ही संकल्पना आहे. त्या घोषणेने सत्तापक्षाची झोप उडणे स्वाभाविक होते. कारण ब्रह्मांडनायकांनी शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना वर्षभरात सहा हजार रुपये देण्याच्या योजनेची घोषणा केली होती. राहूल गांधी यांनी ही घोषणा गरीब कुटुंबांसाठी जाहीर केली. सत्तेवर येताक्षणी त्याबाबतच्या अंमलबजावणीस प्रारंभ करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले आहे. विशेष म्हणजे या योजनेबाबत प्रमुख अशा अर्थतज्ज्ञांशी – ज्यामध्ये रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजनही सहभागी आहेत – चर्चा करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले होते. तसेच या योजनेच्या व्यावहारिकतेचीही चर्चा त्यांनी केली आणि सामान्यांना समजेल अशा भाषेत ती समजावून सांगितली. यामुळे सत्तापक्षात अस्वस्थता निर्माण झालेली स्पष्टपणे दिसून संरक्षणमंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार डी. व्ही.के.सारस्वत यांची मुलाखत घेतली होती. या मुलाखतीत सारस्वत यांनी उपग्रहवेधी क्षेपणास्त्राच्या सहा चाचण्या घेण्यात आल्याची माहिती दिली होती. यापैकी पाच चाचण्या संपूर्णपणे यशस्वी झाल्याचे सांगितले होते आणि आता भारताकडे उपग्रहांचा(शत्रुच्या) वेध घेण्याची क्षमता प्राप्त आहे असेही स्पष्ट केले होते. सर्वसाधारणपणे अशा गोष्टींचा फारसा गवगवा करायचा नसतो. परिपक्व सरकार आणि नेतृत्व असेल तर अशा गोष्टींचा फुकट गाजावाजा करण्याचा मोह टाळण्यात येतो. कारण देशाच्या काही क्षमता या गुप्तच ठेवायच्या असतात.

शत्रुला किंवा भारताच्या प्रतिस्पर्धी राष्ट्रांना या क्षमतेबाबत अंधारात ठेवणे हा रणनीतीचा भाग असतो. परंतु सुमार बुध्दीच्या नेतृत्वाबद्दल काय बोलणार ? प्रत्येक गोष्टीचा वापर मते

मिळविण्यासाठी करण्याची धडपड करणारे सामान्य कुवतीचे नेतृत्व असल्यावर सर्व गोष्टी उघड करण्याचा सवंग व हलका प्रकार हा होणारच की हो ! सध्या हेच चालू आहे. सारस्वत यांच्या मुलाखतीनुसार भारताकडे ही क्षमता 2011 मध्येच प्राप्त होती. आता नाटकबाज नेतृत्वाने या क्षमतेचा वापर मते मिळविण्यासाठी कसा केला हे लक्षात येईल.मुळात निवडणुकीच्या वेळीच हे सर्व नाटक करण्याचे कारण काय असा प्रश्न विचारला जात आहे. या प्रश्नावरही सरकार


व्ही. के. सारस्वत





सतीश रेड्डी

उघडे पडले आहे. 2011 मध्ये डीआरडीओचे सरसंचालक असलेले व्ही.के.सारस्वत आता नीती आयोगाचे सदस्य आहेत. त्यांनी आणि सध्याचे 'इस्रो'चे प्रमुख सतीश रेड्डी यांनी सरकारने दोन वर्षांपूर्वीच यासंदर्भात चाचण्या करण्यास परवानगी दिली होती असे सांगितले आहे. म्हणजेच दोन वर्षांपूर्वी चाचण्यांना परवानगी मिळूनही डीआरडीओने आता ऐन निवडणुकीच्या तोंडावर चाचणी करणे यात काहीतरी गौडबंगाल निश्चित आहे. विकास व प्रगतीच्या आघाडीवर सपशेल अपयशी ठरलेल्या ब्रह्मांडनायकांना काहीतरी चमकदार करुन दाखविण्याचा जो हव्यास आहे त्यासाठी त्यांनी ही चाचणी निवडणुकीच्या तोंडावर करण्याचे आदेश दिले असणार आणि त्यातून मते मिळविण्यासाठी प्रयत्न करायचा अशी त्यांची योजना असावी? या सर्व नाटकांचा सारांश एकच की केवळ निवडणुका व मते पदरात पाडण्याच्या हेतुने ही चाचणी केलेली आहे. असा हलकेपणा सत्तर वर्षात कोणत्याही पक्षाने किंवा नेत्याने केलेला आढळत नाही. निवडणूक आयोगाने भारतीय सेनादले व त्याच्याशी संबंधित गोष्टींचा वापर प्रचारात न करण्याच्या सूचना देऊनही या देशाचे पंतप्रधानच बेलगामपणे त्याचा भंग करीत आहेत. मेरठच्या पहिल्या प्रचारसभेत त्यांनी सर्जिकल स्ट्राईकचा उल्लेख करुन निवडणूक










आयोगालाही ते फारशी किंमत देत नाहीत हे दाखवून दिले. तोच प्रकार उपग्रहवेधी क्षेपणास्त्राच्या चाचणीचा आहे. अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन विरोधी पक्षांवर टीका करणारे असे पंतप्रधान गेल्या सत्तर वर्षात झाले नाहीत हेही तितकेच खरे आहे.

ब्रह्मांडनायक आणि त्यांचे सहनायक उर्फ भाजप राष्ट्रीय अध्यक्ष यांना एकच भीती भेडसावत आहे व ती म्हणजे स्वबळाचे बहुमत न मिळण्याची ! आतापर्यंत मिळत असलेल्या माहितीनुसार भाजपचे स्वतःचे संख्याबळ हे किमान 100 जागांनी कमी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या जागा भरुन काढण्यासाठी भाजपने 'साम-दाम-दंड-भेद'नीतीचा वापर करुन 41 लहानमोठ्या पक्षांशी आघाडी केली आहे. विरोधी पक्षांच्या 21 पक्षांच्या आघाडीला 'महामिलावट', महाभेसळ' म्हणून टिंगल हेटाळणी करणाऱ्या ब्रह्मांडनायकांना स्वतःच्या पायाखाली काय जळतंय याची जाणीव नाही. त्यांच्या न्यायाने भाजपची आघाडी ही 'अति-महामिलावट' किंवा 'अति-महाभेसळ' म्हणावी लागेल. पण ही धडपड अशासाठी की स्वतःचे बहुमत मिळाले नाही तरी निवडणूकपूर्व आघाडी या नात्याने राष्ट्रपतींनी आपल्यालाच सरकारस्थापनेची प्रथम संधी द्यावी यासाठी ब्रह्मांडनायकांचा जिवाचा आटापिटा चालला आहे. त्यातूनच विरोधी पक्षांना अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन हिणविण्याचा प्रकार त्यांनी चालू केला आहे.

वरील पार्श्वभूमीवरच लोकांसमोरचे खरे मुद्दे कोणते आहेत याचा आढावा घेणेही आवश्यक आहे. यामध्ये देशापुढील आर्थिक आघाडीवरील आव्हाने सर्वात गंभीर आणि चिंताजनक आहेत. सुमार बुध्दी आणि सवंग व हलकेपणा यांचा जवळचा संबंध असतो. या वातावरणात परिपक्व आवाज दाबले जाणे आणि त्यांची गळचेपी होत असते. कुणी सावधगिरीचा सल्ला दिला की तत्काळ त्याच्यावर शिक्के मारले जातात. विवेकाला तिलांजली कधीच मिळाली आहे. सर्व राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते वास्तवाची जाणीव गमावल्यासारखे बेफाम व बेलगाम आश्वासने देण्यात धन्यता मानत असल्याचे दिसून येत आहे. निवडणुकीनंतर सत्ता कुणाचीही येवो परंतु त्या येणाऱ्या सरकारपुढे कोणती आव्हाने, कसोट्या वाढून ठेवल्या आहेत याची पुसटशी, किंचितशी जाणीवही या राजकीय पक्षांना आहे काय असा प्रश्न पडू लागला आहे. वारेमाप घोषणा करताना त्यांच्या व्यावहारिकतेचे भान ठेवण्याची आवश्यकता राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांनी कधीच वर टांगलेली आहे. हे चित्र विदारक आहे. ज्या पश्चिम उत्तर प्रदेशातून- मेरठमधून पंतप्रधानांनी लोकसभा निवडणूक प्रचाराचा बिगूल फुंकला आहे त्या पट्ट्यात






आहे. केंद्रीय सांख्यिकी संस्थेने(सीएसओ) सादर केलेल्या आकडेवारीनुसार डिसेंबर-2018मध्ये औद्योगिक वाढीचा दर 2.6 टक्के नोंदला गेला होता. जानेवारी-2019 अखेर तो 1.7 टक्क्यांपर्यंत खाली घसरला. 31 मार्च रोजी 2018-19 हे आर्थिक वर्ष संपत असून ही आकडेवारी पाहता या वर्षातील ही घसरण गेली सहा महिने सतत चालू राहिल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. गेल्या पाच तिमाहींचा किंवा 15 महिन्यांचा सांख्यिकी आढावा घेतल्यास विकासवाढीचा दर 6.6 टक्क्यापर्यंत खाली घसरला आहे. त्यामुळे एकंदर किंवा सकल विकासदराची टक्केवारी देखील संभाव्य 7.2 टक्क्यांवरुन सात टक्क्यांपर्यंत किंवा त्याहूनही आणखी खाली घसरण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. जागतिक बँकेने जगभरातच आर्थिक विकासाची गति खुंटणार असल्याचे जाहीर केलेले आहे. ही स्थिती 2020 पर्यंत टिकणार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडलेली असल्याने जागतिक पातळीवर होणाऱ्या आर्थिक चढ-उतारांचा अपरिहार्य परिणाम भारतालाही भोगावा लागणार आहे. सरकारपुढे वित्तीय संकट आधीपासूनच आहे. तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती तेजीत आहेत. सरकारच्या तिजोरीवर ताण असल्याने पायाभूत क्षेत्रात सरकारी गुंतवणुकीला पायबंद बसलेला आहे. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी'च्या ताज्या आकडेवारीनुसार डिसेंबर-2018 अखेर अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीने गेल्या चौदा वर्षातील नीचांकी नोंदवली आहे. याचा स्पष्ट अर्थ हा की अर्थव्यवस्थेचे आरोग्य सहजासहजी सुधारण्याची स्थिती नाही. अर्थव्यवस्थेच्या



ऊस-उत्पादक शेतकऱ्यांच्या थकबाक्या दहा हजार कोटि रुपयांवर पोहोचलेल्या आहेत. एकंदर थकबाकी सुमारे 35 हजार कोटि रुपयांवर गेल्याचे सांगितले जाते. पण पंतप्रधानांना त्याच्याशी यत्किंचितही देणेघेणे नाही. पश्चिम उत्तर प्रदेशात ध्रुवीकरण कसे होईल, देशप्रेम, राष्ट्रवाद, देशभक्तिचे पोवाडे गाऊन लोकांना भ्रमित करण्याकडे त्यांचा कल अधिक आहे. त्यामुळेच आचारसंहितेचा भंग करुन ते सर्जिकल स्ट्राईकचा बिनदिक्कतपणे वापर करीत सुटले आहेत.

हे लिहिण्याचे कारण एवढेच की मते मिळविण्याच्या आवेशात सत्तापक्षाने वास्तव परिस्थितीकडे दुर्लक्ष करण्याची भूमिका घेतलेली आढळते. हे कटु सत्य आहे. यासाठी काही आकडेवारीवर नजर टाकावी लागेल. ही अधिकृत, सरकारी आणि काही नामवंत संस्थांनी सादर केलेली आकडेवारी



कल कमी होऊ लागला आहे. याचे कारण आर्थिक अनिश्चिततेचे असून त्यामुळेच बाजारात जाऊन बिनधास्त खरेदी करण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये कमी आढळू लागली आहे. ही टक्केवारी जवळपास दीड टक्क्यांनी कमी झाली आहे. याचा फटका ग्राहकोपयोगी वस्तुंना म्हणजेच पर्यायाने वस्त्रोद्योग,



आरोग्याचे किंवा सुदृढतेचे जे प्रमुख मापदंड आधारभूत मानले जातात त्यात घसरण किती आहे ? गेल्या 19 महिन्यातील आणखी एक नीचांकी -- ज्याला 'कोअर सेक्टर' म्हणतात म्हणजेच कोळसा, क्रूड तेल, नैसर्गिक वायू, रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद, सिमेंट, वीज या क्षेत्रांमधील वाढीचा दर 1.8 टक्क्यांपर्यंत घसरलेला आहे. बड्या उद्योगांच्या नफ्यात सातत्याने गेले नऊ महिने घसरण नोंदविली गेली आहे. नोटबंदीनंतर आणि नंतरच्या काळातही वाहन उद्योगाला काहीशी तेजी आल्याचे सांगून सरकारने फुशारक्या मारलेल्या होत्या. सद्यःस्थिती काय आहे? सर्वाधिक खप असलेल्या मारुती मोटारींच्या कारखान्याने मागणी अभावी आपल्या उत्पादनात सुमारे 27 टक्क्यांनी कपात करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

परिस्थिती किती बिकट होत चालली आहे याचे एकच उदाहरण पुरेसे आहे. स्वयंपाकाच्या गॅसवरील सब्सिडी कमी करण्याच्या हालचाली सरकारने सुरु केल्या आहेत. निवडणुका असल्याने तत्काळ त्याची अंमलबजावणी होणार नाही. परंतु माहीतगार वर्तुळातून मिळत असलेल्या माहितीनुसार सवलतीच्या दरातील सिलिंडरची संख्या बारावरुन आठ किंवा नऊ पर्यंत कमी करणे तसेच सवलतीच्या दरातील सिलिंडर प्राप्तीसाठी जी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा आहे ती देखील कमी करण्याची योजना सरकारच्या विषयपत्रिकेवर आहे. सध्या दहा लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्यांना ही सवलत लागू आहे. त्यात कपात होऊ शकते. देशातील गॅसधारकांची संख्या सुमारे 26 कोटि आहे आणि एका सिलिंडरपोटी सरकार 173.41 रुपयांची सब्सिडी देते. सध्या गॅस-सिलिंडरवरील वार्षिक सब्सिडीचा बोजा सुमारे 37 हजार कोटि रुपयांचा आहे आणि सरकार तो कमी करु पहात आहे. यापूर्वीही एका लक्षणाकडे सातत्याने लक्ष वेधण्यात आले होते. बाजारात जाऊन खरेदी करण्याचा लोकांचा इंजिनिअरिंग माल उत्पादन करणाऱ्या उद्योगांना बसलेला आहे. मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीची ही क्षेत्रे आहेत व त्यामुळे परिणामी नोकरकपात व बेकारी वाढणार आहे. गेल्या काही काळात कंत्राटी कामगारांचे प्रमाण सातत्याने वाढताना आढळत आहे. कारण कोणत्याही उद्योगाला कायमस्वरुपी कर्मचारी नको आहेत कारण त्यामुळे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या व बोजा स्वीकारण्याची त्याची तयारी नाही.

अर्थव्यवस्थेचे हे चित्र विदारक आणि भयावह आहे. ही आव्हाने सोपी नाहीत. अर्थव्यवस्था आणि संरक्षण व सुरक्षा तसेच परराष्ट्रसंबंध यासारखी क्षेत्रे पक्षीय राजकारणाच्या पलीकडे असणे आदर्श मानले जाते. जर त्यात बदल करण्याची अनिवार्यता निर्माण झाल्यास त्यासाठी सर्वसंमती तयार करण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांची असते. एकांगी व एककल्लीपणे ते बदल करणे देशाला महागात जाणारे असते. तसेच या विषयांचा मतांसाठी वापरही विघातक आहे. अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने व वास्तव यांचे भान सत्तापक्षाला राहिलेले नाही. त्यामुळे जो पक्ष किंवा आघाडी निवडणुकीनंतर सत्तेत येईल त्यांच्यापुढील आर्थिक आव्हाने खरोखर गंभीर असतील आणि त्यांचा मुकाबला करताना त्या नव्या सरकारची दमछाक झाल्याखेरीज राहणार नाही. हे दुर्दैवी आहे पण वास्तव आहे!



Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.
आनंदी संकुल
CBSE व ICSE शाळा
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com

# कार्यकर्त्यांनी राजकारणापेक्षा समाजकारणाकडे अधिक लक्ष द्यावे

## शरद पवार यांचे विचार



आजचा दिवस यशवंतराव चव्हाण यांच्या 106 व्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करण्याचा आहे. एका सामान्य कुटुंबात जन्मलेले, कष्टाने शिक्षण घेण्याचा उपक्रम आयुष्यभर केलेले, स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारविरुद्ध संघर्ष करण्याची भूमिका घेऊन आयुष्याचा बराच काळ हा तुरुंगात घालवलेले आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, स्वातंत्र्याचा अर्थ लोकांच्या जीवनात परिवर्तनासाठी यावा, यासाठी कष्ट करणारे, उत्तम प्रशासक, एक कर्तृत्ववान व्यक्तिमत्व म्हणून चव्हाण साहेबांचा परिचय आपणा सगळ्यांना आहे.

राज्याच्या निर्मितीनंतरचे पहिले मुख्यमंत्रिपद त्यांनी घेतले व राज्याला एक दिशा दिली. महाराष्ट्रातल्या अनेक निर्णयाची सुरुवात त्या काळात त्यांनी केली. महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण असो, महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन असो, औद्योगिक धोरणाला मदत करण्यासाठी स्थापन केलेले महाराष्ट्र फायनान्स कॉर्पोरेशन असो, अशा अनेक संस्थांची निर्मिती त्यांनी केली आणि त्याबरोबर साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रातसुद्धा समाजाची सांस्कृतिक उंची वाढविण्यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम त्यांनी हातात घेतले आणि राज्याची सर्वांगिण प्रगती कशी होईल, याची खबरदारी त्यांनी आयुष्यभर घेतली. महाराष्ट्रात जसे काम होत होते, त्या प्रमाणे देशाचीही जबाबदारी त्यांच्यावर पडली, मग ते अर्थमंत्रिपद असेल, गृहमंत्रिपद असेल, परराष्ट्र व्यवहार मंत्रिपद असेल, या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या. म्हणून, त्यांचे स्मरण नव्या पिढीला व्हावे, त्यांचे विचार समाजात रुजवावेत, हे काम चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपण वेगवेगळ्या उपक्रमाद्वारे नेहमी करीत असतो.

त्यांच्या नावाने आपण पुरस्कार देतो. या वर्षी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने डॉ. रघुराज राजन यांची या पुरस्कारासाठी निवड केली, याचा मला आनंद आहे. एक दूरदृष्टीचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांची ओळख भारतात व भारताबाहेर आहे. या राज्यात राज्य सरकारमध्ये त्यांनी अधिक जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. 2012 ते 2013 या कालावधीमध्ये अर्थमंत्रालयाचे मुख्य आर्थिक सल्लागार, 2008 ते 2012 या कालावधीमध्ये पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार तसेच, 2007 ते 2008 मध्ये चेअरमन, हायलेव्हल कमिटी फॉर फायनान्शियल सेक्टरची जबाबदारी आणि 2013 ते 2016 या कालखंडात त्यांनी रिझर्व बँकेचे गव्हर्नर म्हणूनही काम केले आहे. या कालखंडात शेतीच्यासंबंधीची नीती, शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण त्यांनी आखावे, म्हणून या देशाचा कृषी मंत्री या नात्याने त्यांच्याशी सुसंवाद साधण्याची संधी मला अनेकदा मिळाली. अतिशय साधे व्यक्तिमत्व, कठोर अभ्यास करण्याची तयारी आणि देशातील शेवटच्या माणसाच्या हिताची जपणूक करण्याची तयारी, त्यांची बांधिलकी, या त्यांच्या गोष्टी मी फार जवळून पाहिल्या आहेत.

अशा व्यक्तीला सन्मानीत करण्याचे काम करतोय, एका



दृष्टीने चव्हाण साहेबांना ज्या अर्थक्कारणात रस होता, त्या अर्थकारणाची अंमलबजावणी व दिशा ठरविण्याची कामगिरी करणाऱ्या अशा व्यक्तीला त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळतोय, म्हणून, ही निवड अतिशय उचित प्रकारची निवड आहे, असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही.

या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, बिल ऑस्टीन यांची उपस्थिती! त्यांच्या कार्यक्रमाला मी अनेकदा गेलो आहे. एक गंमतीचे व्यक्तिमत्व. या पतिपत्नीचा व्यवसाय, जे कर्णबधीर असतील, त्या संबंधीची उपकरणे तयार करण्याचा त्यांचा व्यवसाय आहे. पण, व्यवसाय करीत असतानाही त्यांनी सामाजिक प्रश्नाचे भान अखंडपणे ठेवले आहे. जगातल्या सुमारे 20 लाख लोकांना, ज्यांना कमी ऐकू येते, ज्यांच्यात बहिरेपणाची समस्या आहे, अशा विविध वयोगटातील लोकांना मोफत कर्ण-उपकरणे देण्याचा जागतिक विक्रम त्यांनी केला आहे. महाराष्ट्रात काम करतात, भारतातही काम करतात. महाराष्ट्रात विविध वयोगटातील 28 हजार कर्णबधीर लोकांना ही उपकरणे मोफत देण्याचा उपक्रम त्यांनी केला आहे. त्यांच्या शिबिरांना गेल्यावर अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी बघायला मिळतात. शिबिराला येणाऱ्यांची तपासणी स्थानिक सहकाऱ्यांच्या मदतीने केली जाते. ज्यांना ही उपकरणे बसवायची आहेत, त्यांची वैद्यकीय तपासणी करणे, त्याला कोणत्या आकाराचे उपकरण बसवायचे, याचा अभ्यास करणे, नंतर, त्यांना मार्गदर्शन करणे असा मोठा कार्यक्रम त्यांच्याकडून राबवला जातो. अक्षरशः हजारो लोक त्या ठिकाणी येत असतात. तपासणी करण्यासाठी 40 ते 50 जणांचे पथक अमेरिकेहून ते स्वतःच्या खर्चाने मागवतात. या ठिकाणी 5-5 दिवस येऊन तपासणी करून कोणते उपकरण कोणाला द्यायचे याचे मार्गदर्शन

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे सालाबाद प्रमाणे या वर्षीही 12 मार्च रोजी यशवंतराव चव्हाण साहेबांची 106 वी जयंती साजरी करण्यात आली. दरवर्षी याच दिवशी त्यांच्या नावाने दिला राष्ट्रीय पुरस्कार या वर्षी रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांना देण्यात आला. या समारंभास विशेष अतिथी म्हणून बिल ऑस्टीन व मिसेस टॅनी ऑस्टीन उपस्थित होते. त्यांना यशवंतराव चव्हाण विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या वेळी मान्यवरांनी पुढील प्रमाणे आपले विचार व्यक्त केले.**



करतात. येताना ते स्वत:च्या विमानाने येतात. सगळे लोकही त्यांच्या विमानाने येतात. या सगळ्या कामामध्ये बिल ऑस्टीन व मिसेस टॅनी ऑस्टीन सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत समरस झालेले दिसून येतात. एखाद्या हॉस्पिटलमध्ये एखादी नर्स ज्या पद्धतीने काम करते, त्याच पद्धतीने मिसेस टॅनी ऑस्टीन काम करीत असतात. मिस्टर ऑस्टीन यांचीही त्याच प्रकारे कामाची पद्धत आहे. मी स्वत: अनुभवलेले आहे.

अनेक अशी माणसे आहेत, ज्यांनी जन्मापासून आवाज कधी ऐकला नाही. त्यांना आवाज माहितच नाही. अनेक अशी माणसे आहेत, त्यांच्या मुखातून शब्द कधी बाहेर पडलाच नाही. जेव्हा त्यांना हे उपकरण बसवले जाते व समोरचा माणसाचा आवाज त्यांना ऐकू येतो, त्या वेळी त्याच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसतो, तो आगळावेगळा आनंद असतो. हा आनंद देण्याचे काम मिस्टर व मिसेस ऑस्टीन वर्षानुवर्षे करीत असतात. आपल्या देशातही ते या प्रकारचे उपक्रम करीत असतात. आज आपण त्यांचा या ठिकाणी गौरव केला. त्या फौंडेशनची माहिती केली आणि त्यांचा विशेष सन्मान करून त्यांना सन्मानपत्र दिले. मला असे वाटते अशा सन्मानपत्राची प्रतिष्ठा त्यांच्या येथे येण्याने वाढली आहे, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही.

या सगळ्या कामामध्ये ट्रस्टची मदत झाली. पुण्याच्या महात्मा गांधी पुनर्वसन सेवा केंद्राची मदत झाली. अशा अनेक संस्था या उपक्रमात मदत करीत असतात. अशा कामाच्या पाठिशी मजबुतीने उभे राहतात. चव्हाणसाहेबांचे नेहमी धोरण असायचे, राजकारणात अधिक लक्ष घालू नका, समाजकारणात अधिक लक्ष घाला. आज या ठिकाणी राजकारणाच्यासंबंधीचा विचार केला जात नाही. समाजकारणाचा विचार या ठिकाणी शंभर टक्के केला जातो. तो करीत असताना, एक भूमिका कुठल्याही एका राजकीय पक्षाशी बांधिलकी ठेवण्याचा न ठेवता, एक व्यापक भूमिका घेऊन प्रतिष्ठान विविध क्षेत्रांत काम करीत असते. तसाच हा एक उपक्रम कर्णबधीरांच्या संदर्भात राबवून संस्थेने मोठे काम केले आहे, याची प्रचिती या निमित्ताने आपणा सगळ्यांना आली आहे. आपण सगळेजण चव्हाण साहेबांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक उपक्रमास उपस्थित राहिलात, त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आपण त्यांचा आदर्श ठेवू व एक सुसंस्कृत महाराष्ट्राबाबत त्यांची एक जी संकल्पना होती, त्यासाठी आपण सामूहिकपणे हातभार लावू, अशी अपेक्षा करतो.



# डॉ. रघुराम राजन यांची भूमिका अर्थशास्त्रापुरतीच सिमीत नाही



## डॉ. अनिल काकोडकर

मी इथे आपल्यासमोर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी आजच्या दिवशी(12 मार्च) दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी पुरस्कारार्थींची निवड करणाऱ्या समितीचा अध्यक्ष म्हणून आपणापुढे उभा आहे. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार आत्तापर्यंत ज्या ज्या व्यक्तींना देण्यात आलेला आहे, त्याची यादी खूप मोठी आहे. ही सर्व पुरस्कारार्थी मंडळी, अत्यंत उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या आहेत. अगदीच उदाहरण द्यायचे झाले तर आपण गेल्या वर्षी प्रा. एम. एम. शर्मांना प्रतिष्ठानतर्फे हा पुरस्कार दिला होता. त्याच्या आधी रतन टाटा, नंदन निलेकणी, जुबीन मेहता, अर्जनसिंग आदि क्षेत्रांतील महनीय व्यक्तींना आपण यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत गौरवले आहे.

माननीय यशवंतराव चव्हाणांचे कार्य इतके मोठे होते, त्यांचे नेतृत्व इतके उत्तुंग होते. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणाऱ्या पुरस्कारासाठी पुरस्कारार्थींची निवड करणारी मंडळी ही त्याच प्रकारची असावीत, असा शोध व निवड समितीचा नेहमीच प्रयत्न राहिलेला आहे. या समितीत अत्यंत ख्यातनाम व्यक्ती आहेत, नावेच घ्यायची तर, डॉ. माशेलकर आहेत, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर आहेत, माजी कुलगुरू डॉ. शहा आहेत, नेहरू सेंटरचे श्रीपाद काद्री आहेत, नरेंद्र जाधव आहेत, श्रीनिवासन आहेत. अर्थातच, या सगळ्या कामामध्ये शरद काळे यांची भूमिका मध्यवर्ती आहे, ते समर्थपणे हे काम करतात व समितीला करायला लावतात. या वर्षी समितीने रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांची निवड केली व त्याला प्रतिष्ठानने व प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी संमती दिली. डॉ. रघुराम राजन यांनीही हा पुरस्कार स्वीकारण्यास त्यांची संमत्ती उत्स्फूर्तपणे कळवली.

डॉ. रघुराम राजन जेव्हा रिझर्व बँकेचे गव्हर्नर होते, तेव्हा त्यातील काही काळ मी रिझर्व बँकेच्या बोर्डावर होतो. त्यामुळे त्यांच्याबरोबर काम करण्याचा मला योग आला. त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. त्या वेळी मला असे जाणवले, कारण, मी काही अर्थशास्त्री पाहिलेले आहेत, वाचले आहेत. त्यांची विचारांची इतकी स्पष्टता, केवळ अर्थशास्त्र एके अर्थशास्त्र एवढ्यापुरती आपली भूमिका सीमित ठेवली नाही, हे माझ्यासारख्याला जाणवले, त्यांच्याबरोबर काम करत असताना या सगळ्या गोष्टींचा विचार करणे किती आवश्यक आहे, हे मला जाणवले. आजच किंवा काल त्यांचे एक स्टेटमेंट आले आहे. मी ते शब्दश: सांगू शकत नाही. पण, त्याचा मतितार्थ असा, 'कॅपिटॅलिझम इन डेंजर' असा त्याचा मथळा होता. मथळा देणे हा संपादकांचा अधिकार असतो. त्यामुळे त्यांचे तसे मत होते किंवा नाही, हे कळायला मार्ग नाही. पण, त्यांचे मत असे होते की, जगातली विषमता दूर झाल्याशिवाय, तुम्ही कितीही सुबत्ता मिळवली तरी कुठेतरी ही समस्या शिल्लक राहते. अर्थात, मी लावलेला त्या छोट्या बातमीचा अर्थ आहे. त्यातून त्यांच्या विचार




करण्याच्या पद्धतीचे प्रतिबिंब दिसून येते. आपल्याला माहिती आहे की, जागतिक मंदी येण्याच्या खूप आधी त्यांनी जागतिक मंदी येणार असे भविष्य वर्तविले होते. अशी मंडळी थोडी असतात, एक वर्षांनी काय होईल?, दोन वर्षांनी काय होईल?, असे ढोबळ अंदाज बांधून सबंध परिस्थितीचा साकल्याने विचार करून आपले त्याबद्दल स्पष्ट विचार मांडू शकतात. त्यातसुद्धा त्यांच्या वागण्यात, विचारात हेकेखोरपणा दिसत नाही. ते तेवढ्याच स्पष्टपणे तुम्हाला सांगू शकतात, तुमच्याशी चर्चा करू शकतात, तुमच्याबरोबर वादविवाद करू शकतात आणि वेळ पडल्यास 'ॲग्री टू डिसॲग्री' अशीही परिस्थिती असू शकते. त्यामुळे या सोहळ्यात डॉ. रघुराम राजन यांना गौरवतोय, याचा मला विशेष आनंद आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने त्याला मान्यता दिली, त्याबद्दल विशेष आभार मानतो.

सरतेशेवटी, मला असे वाटते की, आजचा हा सोहळा विशेष आहे. विशेष म्हणजे, आत्ता आपण बघितले, मानवतावादी कामासाठी ऑस्टीन दाम्पत्यास यशवंतराव चव्हाण विशेष पुरस्काराने गौरवले. त्याच्या पाठोपाठ एक खूप महत्त्वाचा भारतीय अर्थकारणी, डॉ. राजन यांना गौरवले, याचा मला विशेष आनंद आहे. सरतेशेवटी, माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस अभिवादन करून मी थांबतो.

# नवीन विज्ञानाच्या मदतीने आपण जग बदलू शकतो

**बिल ऑस्टीन**



या ठिकाणी मी चांगल्या लोकांच्या सहवासात आहे, याचा मला विशेष आनंद होत आहे. 'भारत फर्स्ट' ने नेहमीच आम्हाला आमच्या कार्यात पाठिंबा दिला. कारण, आम्हाला हे प्रकल्प यशस्वी करण्यासाठी अजून भरपूर काम करायचे आहे. नवीन विज्ञानाच्या मदतीने या कार्यातून आपण जग बदलू शकतो. आम्हाला प्रत्येक व्यक्तीची तितकीच काळजी घ्यावी लागते. कारण, प्रत्येक व्यक्ती ही तितकीच महत्त्वाची असते. उद्याच्या भविष्यासाठी आपल्याला आज एकत्रित काम करायचे आहे. लोकांच्या सहभागातून आम्हाला आणखी काही वेगळे करता येईल का, याचाही प्रयत्न चालू आहे. मित्रांनो, मी अधिक न बोलता भविष्यातही आपल्या सहयोगाने अशीच वाटचाल करण्याचा आमचा प्रयत्न राहील.



# अपंगांसाठीच्या धोरणाची राज्य सरकारने अंमलबजावणी त्वरित करावी

## सुप्रिया सुळे यांची मागणी

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे कै. यशवंतराव चव्हाण यांना दरवर्षी 12 मार्च रोजी आदरांजली, श्रद्धांजली वाहण्यासाठी आपण भेटतो. 12 मार्च व 25 नोव्हेबर या दोन दिवशी या वास्तूत येऊन चव्हाण साहेबांची आठवण, त्यांनी दिलेले संस्कार, त्यांनी दिलेली दिशा पुन्हा एकदा आत्मसात करून पुढील वर्षाचे कार्यक्रम काय असतील, याचा आढावा घेण्याचा कार्यक्रम करत असतो. मी या ठिकाणी आपले मनापासून स्वागत करते.

मी या ठिकाणी बिल ऑस्टीन दाम्पत्याबद्दल थोडे बोलणार आहे. आपल्याला या ठिकाणी पाहुणे म्हणून निमंत्रित करताना आम्हाला खूप आनंद होतो. ज्या ज्या वेळी मी आपणास भेटते, त्या त्या वेळी मला आपणाकडून पहिल्यापेक्षा अधिक ऊर्जा मिळत असते. आपणास भेटताना मला नेहमीच आनंद होतो. जेव्हा आम्ही 'स्टारकी फौंडेशन'बरोबर काम करण्यास सुरुवात केली तेव्हा म्हणजे 2013 साली आपण प्रथम भेटलो. स्टारकी फौंडेशन ही जगातली एक मोठी कंपनी आहे की, जी कर्णबधीरांसाठी श्रवणयंत्रे तयार करते. आपल्या देशात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व ते यांच्यातील नात्याची सुरुवात एका छोट्याशा कार्यक्रमातून औरंगाबादपासून सुरू झाली आणि आज त्यांच्या मदतीने व सहकार्याने 28 हजार 200 लोकांना ज्यांनी कधीच आवाज ऐकला नव्हता, त्यापैकी 80 टक्के मुले आहेत, त्यांच्या आयुष्यात परिवर्तन हे कुटुंब व स्टारकी फौंडेशनमुळे झाले आहे. भारतात ते स्वत:च्या खर्चाने येतात. स्वत: ते मशीन देतात. आपल्याला काहीही करायचे नसते. आपल्याला फक्त जनजागृती करून ती मुले त्यांच्यापर्यंत आणून द्यायची असतात. बाकी सगळे काम ते करतात. त्याबद्दल मी स्टारकी फौंडेशनचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे मनापासून आभार मानते. महाराष्ट्रातल्या 28 हजार लोकांच्या जीवनात त्यांनी परिवर्तन केले आहे.

ज्या ज्या वेळी मी एखाद्या गावी जाते तेव्हा त्या लोकांना मी देखील स्टार की फौंडेशनच्याच एक सदस्या आहे असे वाटते. ते म्हणतात, तुमच्यामुळे हे गृहस्थ आमच्या गावात आले. त्यामुळे मी स्टार की फौंडेशनचे तसेच, माझे मित्र, टाटा ट्रस्ट्रचे राहुल ठाकरसी यांचे आभार मानते. हे आमच्या पाठिशी खांबाप्रमाणे भक्कम उभे राहिले. टाटा फौंडेशन व ठाकरसी यांची स्टार की फौंडेशनशशी काही परिचय नव्हता. त्यांनी फक्त माझ्यावर विश्वास ठेवला. दर वेळेस जेव्हा तुम्ही स्टार की फौंडेशनच्या कार्यक्रमास जाता तेव्हा आयुष्यात पहिल्यांदा आवाज ऐकलेल्या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहता, त्या वेळी तो जो क्षण असतो, तो त्याच्यादृष्टीने त्याच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट असतो. आपल्याला तो क्षण अगदी सहज वाटतो. तो टर्निंग पॉईंट त्यांच्या आयुष्यात टाटा ट्रस्ट, राहुल ठाकरसी फौंडेशन व स्टारकी फौंडेशन यांच्यामुळे आला आहे. त्यामुळे हा आपण कौतुक सोहळा आयोजित केला आहे. आमच्या विनंतीस मान देऊन ते उपस्थित राहिले, याबद्दल त्यांचे

मनापासून आभार मानते.

अशा कुटुंबातील जी मुले असतात, ते शिक्षणासाठी जातात. पण, त्यांचे प्रश्न कोणीच समजून घेत नाही. त्यांना मशीन लावल्यानंतर त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते. त्यांना आवाजाची ओळखही नसते. त्यांना भाषाही येत नसते. सगळेच नवीन असते. त्यामुळे त्यांना भाषा शिकवणे आवश्यक असते. त्यांना भाषा नवीन असते. सहा महिने ते वर्षभर त्यांना शिकवण्याचे काम त्यांचे पथक करते. मी रोहितला विशेष धन्यवाद देईन. रोहित हा 'स्टारकी'चे भारतातील काम करत असतो. त्यात आमची नेहमी भांडणे होतात, वाद होतात. मतभेद होतात. त्यांचे म्हणणे असते, हीच मुले घ्यायची. वादाचे कारण म्हणजे, ते 200 मुले म्हणाले की, आम्ही 2 हजार मुले घेण्याचा आग्रह धरतो. त्यातून सुवर्णमध्य निघतो व आमचा सगळा हट्ट 'स्टार की फौंडेशन पुरवत असते. त्यासाठी सर्वांत मोठे योगदान राहुल ठाकरसी व टाटा ट्रस्टचे आहे. या वेळी आम्ही पालकांचे व्हिडिओ अपलोड करत असतो. आमची वेबसाईटही आहे. तुम्ही त्याला भेट दिल्यास किंवा आमच्या कोणाच्याही फेसबुकवर गेला तरी तुम्हाला आमच्या सर्व उपक्रमाची माहिती आपल्याला मिळेल आणि जोपर्यंत तुम्ही स्वत:च्या डोळ्यांनी तो प्रकल्प पाहात नाही, तोपर्यंत तुम्हाला त्याचे महत्त्व पटणार नाही. टाटा ट्रस्टचे एक वैशिष्ट्य आहे की, ते देणगी देतात, पण, देणगीचा कसा वापर केला जातो, याचे ते मूल्यांकनही करतात. त्यांचे नियम व नियमावली उत्कृष्ट असते. ज्या ज्या वेळी राहुल ठाकरसी देणगी देतात त्या त्या वेळी ते त्याचे 'इम्पॅक्ट असेसमेंट' करत असतात. गेल्या दशकापासून आम्ही हे कार्यक्रम करत असून लोकांच्या जीवनात बदल घडवून आणणारा सर्वांत मोठा उपक्रम हा स्टार की फौंडेशनचा असतो.

या वेळी आमचे सर्वांत मोठे यश म्हणजे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, स्टारकी फौंडेशन, टाटा ट्रस्ट, राहुल ठाकरसी फौंडेशन या सर्वांनी मिळून बालेवाडी, पुणे येथे कमीत कमी वेळेत म्हणजे अवघ्या आठ तासांत 6 हजार मुलांना श्रवणयंत्रे बसविण्यात यश मिळवले. हा एक जागतिक विक्रम आहे. गिनिज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये त्याची नोंद करण्यात आली आहे. त्याचे प्रमाणपत्रही मिळाले आहे. यशवंतराव चव्हाण सेंटरचे हे मोठे यश आहे की, आपण यशवंतराव चव्हाण यांचे नाव गिनिज बुकमध्ये नोंदविण्यात यशस्वी झालो. आजतर कौतुक सोहळा याच कामाचा आहे.

आणि एक व्यक्ती, जिचा उल्लेख करणे अत्यंत आवश्यक





आहे. ती व्यक्ती नेहमी पडद्यामागे असते. जनजागृती निर्माण करीत 28 हजार लोकांच्या जीवनात बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तीचे नाव विजय काणेकर असे आहे. हा सगळा कार्यक्रम विजयने आयोजित केला आहे. मला तर असे वाटते, मॅगसेसे पारितोषिक जर द्यायचे असेल तर, पडद्यामागे राहून काम करणाऱ्या अशा लोकांना दिला पाहिजे. इतकेच नव्हे तर, अपंग असेल, कोणी अडचणीत राहतात, त्यांना विजय काणेकर मदत करीत असतात. ते परभणीत राहतात. ते गेली दहा वर्षे यशवंतराव



चव्हाण प्रतिष्ठानमध्ये कार्यरत आहेत. अपंग मंचाची स्थापना आम्ही त्याच काळात केली. मला सांगायला अभिमान वाटतो की, राज्याचे जे अपंग धोरण आहे, त्याचे गेल्या दहा वर्षांत जे काम झाले ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये विजय काणेकर यांच्या प्रयत्नातून झाले. आत्ता जी मुख्यमंत्र्यांकडे अपंग धोरणाची मागणी करतोय, त्याचा आराखडा जो केला आहे, तो यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने अपंगांसाठी कार्य करणाऱ्या सगळ्या गटांना एकत्रित आणले व ते धोरण तयार केले. मला अभिमान वाटतो, मुख्यमंत्र्यांनी आम्हाला शब्द दिला आहे की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने जे धोरण तयार केलेले आहे, त्याची सरकार शब्दश: अंमलबजावणी करेल. आता ते कधी निर्णय घेतात, त्याची आम्ही वाट पाहतोय. पण, काम चांगले झालेले आहे, एवढे तरी मान्य केले आहे. त्यामुळे विजय काणेकर, पानसेताई यांचे योगदान फार मोठे आहे. गेल्या 10-15 वर्षातल्या त्यांच्या कामाची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. त्याचे एक धोरण आज राज्य सरकारमध्ये होत आहे. केंद्र सरकारकडेही आम्ही हे धोरण पाठवले आहे. त्यातल्या काही सूचना केंद्र सरकारनेही मान्य केल्या आहेत. आम्ही आणखीही काही सूचना केल्या आहेत. त्याही मान्य करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

हा एक घरगुती कार्यक्रम आहे. त्याच्यात अनेक वर्षांच्या कामानिमित्त कौतुकाची थाप टाकण्यासाठी आपण येथे आलो आहोत. या सगळ्यांना आज व्यासपीठावर बसविले आहे. एरव्ही ते कधीच व्यासपीठावर जाऊन बसत नाहीत. त्यातले कोणतेही काम मी करत नाही. ही मंडळी हे काम करीत असतात. त्यामुळे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ही एक सामाजिक संस्था म्हणून कार्य करीत आहे, अशी ओळख या सगळ्यांच्या कामामुळे झाली आहे. या खेरीज तुम्हाला प्रतिष्ठानच्या कामाचा थोडक्यात आढावा देते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची आपणा सगळ्यांना माहिती आहे की, कराड, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, लातूर, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, आंबेजोगाई, ठाणे, परभणी या ठिकाणी विभागीय कर्यालये आहेत. मी काळे साहेबांचे आभार मानते. त्यांनी नांदेडलाही आपले केंद्र सुरू करण्याची परवानगी दिलेली आहे. त्या खेरीज काही वेगळे कार्यक्रम आपण करतो, त्यात अपंग हक्क मंच आहे, नवमहाराष्ट्र अभियान हे युवकांसाठी आहे. शिक्षण मंच, वसुंधरा सृजनचा कार्यक्रम असतो. कायदा व सुव्यस्थेचा कार्यक्रम असतो. आपल्याकडे चांगले ग्रंथालय आहे.

आपल्याला थोडक्यात शिक्षण मंचाची माहिती देत आहे. शिक्षण मंचाच्या अंतर्गत 'शिक्षण कट्टा' हा आगळावेगळा कार्यक्रम आपण गेल्या अनेक वर्षांपासून राबवत आहे. त्याच्यात महिन्यातून एकदा जे निवृत्त शिक्षक आहेत, ते धोरणात्मक स्तरावर काम करतात. हे धोरण तयार करताना आज देशात किंवा राज्यात शिक्षणाची जी आव्हाने आहेत, त्यावर दरमहा राज्यात जेथे जेथे केंद्रे आहेत, तेथे चर्चा होते. त्यानंतर, दरवर्षी मंचात असलेल्या शिक्षकांचा आम्ही मेळावा घेतो व त्याचे एक धोरण तयार करून शिक्षणात काय आव्हाने आहेत, हे आम्ही सरकार दरबारी घेऊन जातो. एक प्रकारे आम्ही उत्प्रेरक काम करीत असतो. त्यामुळे शिक्षकांच्या मदतीने शिक्षणात फार मोठे योगदान होत असते.






परिणामी, एक मोठे सामाजिक परिवर्तन करण्यासाठी आम्हाला फार मोठी मदत झाली आहे.

त्या खेरीज आपण औरंगाबादला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले होते. औरंगाबादकरांनी त्याचे फार मोठे कौतुक केले. तसेच, जब्बार पटेल यांच्या मदतीने आपण मुंबईतही चित्रपट महोत्सव घेतो. खरं तर हे सगळे वेगळे विषय आहेत. चव्हाण साहेबांना ज्याची आवड होती, त्यांचे विचार, त्यांची धोरण पुढे नेण्याचा एक प्रांजल प्रयत्न आम्ही गेली अनेक वर्षे करतोय. या उपक्रमाचे छोटेछोटे रोपटे छोट्या शहरात घेऊन जाण्यात आम्हाला यश आलेले आहे. परंतु, संपूर्ण राज्यात हे काम कसे वाढवता येईल असा आमचा प्रयत्न आहे. मागेही मी आपणास म्हटले होते की, आपली जी पिढी आहे, त्यांना चव्हाण साहेबांच्या कर्तृत्वाची जाणिव आहे. आज मला सांगताना दुःख होतेय, आज जेव्हा मी कोणत्याही शाळेत जाऊन मुलांना विचारते, यशवंतराव चव्हाण कोण होते, तेव्हा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होते, असे सांगितले जाते. मग ते कोणत्या राज्यातले होते? केंद्रात ते कधी गेले होते



की नाही अशी चर्चा होते तेव्हा त्यांना काहीच माहिती नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जून महिन्यापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, रयत शिक्षण संस्था, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ असेल, मराठा शिक्षण संस्था, नाशिक असेल या सगळ्यांनी मिळून ठरवले आहे की, चव्हाण साहेबांची माहिती पुढच्या पिढीला झालीच पाहिजे, यासाठी आम्ही छोटीशी पुस्तिका काढलेली आहे. ती पुस्तिका प्रत्येक मुलांपर्यंत पोहचवून वर्षभर वेगवेगळे उपक्रम राबविण्याचे आम्ही ठरवले आहे. जूनपासून हा कार्यक्रम मी स्वत: राबवणार आहे. आपणा सगळ्यांना विनंती आहे, देवराष्ट्रमध्ये चव्हाण साहेबांचे जे घर आहे, तेथे आम्ही चांगला डिस्प्ले केला आहे आणि कराडमध्ये चव्हाण साहेब-वेणुताईंचे 'विरंगुळा' नावाचे जे घर आहे, तिथल्या सर्व कागदपत्रांचे डॉक्युमेन्टेशन झालेले आहे. जून महिन्यानंतर आपण कधीही कराडला किंवा देवराष्ट्राला गेला तर, आपण जरूर या वास्तुला भेट द्यावी. त्यात सुधारणा करण्यास काही वाव असेल तर, तसेही आम्हाला कळवावे.







**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार' या वर्षी थोर अर्थतज्ज्ञ व रिझर्व्ह बँकेचे माजी गर्व्हनर डॉ. रघुराम राजन यांना जाहीर झाला. पुरस्कार वितरण समारंभाला उपस्थित राहू शकत नसल्यामुळे त्यांनी आपले भाषण व्हिडिओद्वारे पाठविले. त्याचा हा मराठी अनुवाद**



# बदललेले आर्थिक चित्र समाजात नैराश्य निर्माण करणारे

## थोर अर्थतज्ज्ञ डॉ. रघुराम राजन यांचे विचार

मला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत केल्याबद्दल मी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद पवार, निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर व सर्व सदस्य यांचे मनापासून आभार मानतो. यशवंतराव चव्हाण यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभाग घेतला होता. सातारापासून त्यांनी राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली. त्यांनी आयुष्यात मोठमोठी महत्त्वाची पदे भूषवली. त्यात महाराष्ट्रात मुख्यमंत्रिपद, केंद्रात संरक्षण मंत्री, अर्थ मंत्री, परराष्ट्र व्यवहार मंत्री, गृह मंत्री व उपपंतप्रधानपदाचा समावेश आहे. ते आठव्या वित्त आयोगाचेही अध्यक्ष होते. ते आधुनिक भारतातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते. प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी आजच्या दिवशी त्यांची जयंती साजरी केली जाते व त्यांच्या नावाने राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो, याचा मला आनंद आहे. चव्हाण यांनी आपल्या आयुष्यात लोकशाहीला अनन्यसाधारण महत्त्व दिले. तसेच, अर्थव्यवस्थेबाबतची त्यांची

भूमिकाही महत्त्वाची होती. हा माझ्या आगामी पुस्तकाचा विषय आहे.

आपण सहसा मुक्त बाजारपेठेचा विचार करतो. शिकागोमध्ये नाही पण, जगातल्या अन्य भागात कॉँट्रॅक्टस् आणि कॉपी राईटच्या अंमलबजावणीचे काम मार्केट करीत असते. मला वाटते, मार्केटमध्ये सरकार हा दुसरा स्तंभ आहे. माझा असा विश्वास आहे की, मार्केट आणि सरकारने 'समाज' या महत्त्वाच्या तिसऱ्या स्तंभाकडे दुर्लक्ष केले आहे. कम्युनिटी म्हणजे समाज हा तिसरा स्तंभ आहे. समाज हा लोकशाहीत परस्परांच्या सहवासात राहणारे लोक आणि परस्पर सहकार्याने कृती करणारे लोक यांचे प्रतिनिधित्व नेहमी करीत असतो म्हणून जगात भारतासह अनेक पाश्चिमात्य देश त्या मार्गाने जात आहेत.

गेल्या काही वर्षापासून लोकशाहीचे जे आदर्श चित्र आहे, त्यात काय चुका होत आहेत, त्यात काय बदल होत आहेत, याबाबत मी थोडे अधिक स्पष्ट बोलू इच्छितो. अर्थिक चित्र जे बदललेले आहे, विशेषत: नोकऱ्या गमावाव्या लागणे, रोजगाराच्या संधी हातून जाणे, तसेच, उत्पादनक्षमताही घटणे, हे जे चित्र आहे ते समाजात नैराश्य निर्माण करणारे आहे, त्यातून मद्यप्राशनाचे वाढते प्रमाणे, पौगंडावस्थेतील गरोदरपणा असे प्रकार आढळतात व त्यातून कुटंबव्यवस्था मोडकळीस येऊन सामाजिक घडी विस्कटली जाते. मला वाटते, या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आपण त्या समस्येच्या मुळाशी गेले पाहिजे आणि त्यावर उपाय शोधणगासाठी तांत्रिकदृष्ट्या काही बदल करणे आवश्यक वाटले तरे ते बदल केले गेले पाहिजेत. अनेकांना असा विश्वास वाटतो की, ही समस्या सोडविण्याच्याबाबतीत समाज हा घटक महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. विशेषत: भारतासारख्या विकसनशील देशांत हे चित्र पाहावयास मिळते. एकोप्याने राहणे ही समाजाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. भारतात मोठ्या शहरांतील लोक हे प्रामुख्याने अपार्टमेंटमध्ये राहतात, ते एकमेकांच्या घरी जात असतात. मुलेही आनंदाने बागडत असतात. अमेरिकेतील मोठ्या शहरांत ही सामाजिक चौकट उन्मळून पडल्याचे दिसून येते. त्यामुळे खरा समाज निर्माण करण्यासाठी लोक कसोशीने प्रयत्न करीत आहेत. टोरांटोमध्ये एकूण समाजापैकी निम्मा समाज हा इंटरनेटशी जोडला गेलेला आहे आणि उर्वरित निम्मा समाज जोडला गेला नाही. इंटरनेटशी जोडला गेलेल्या समाजामध्ये झालेली सुधारणा ही उर्वरित निम्म्या समाजात आढळत नाही. काहीजण असे म्हणतात, नवीन तंत्रज्ञानामुळे महिला व्हिडिओ गेम खेळत बसतात मात्र, एकमेकींशी बोलण्यास त्यांना वेळ नसतो. त्यामुळे त्यांच्यातील संबंध दृढ होत नाहीत. तथापि, काही लोकांचे हे म्हणणे चुकीचे आहे. उलट, जे लोक इंटरनेटशी जोडले गेलेले आहेत, त्यांच्यातील संबंध अधिक दृढ झालेले असतात. ते परस्परांना अधिक चांगले ओळखू शकतात. प्रसंगानुरूप त्यांच्यामध्ये पार्ट्या होत राहतात. अशा पार्ट्यांना ते आपल्या मुलांनाही पाठवतात. थोडक्यात, इलेक्ट्रॉनिक कनेक्शन आणि फिजिकल कनेक्शन हे समाजात राहणाऱ्या विविध घटकांना परस्पर पूरक असतात. परिणामी, समाजात राहणाऱ्या लोकांमध्ये अधिक चांगले संबंध प्रस्थापित होतात.



तंत्रज्ञानाची गर्दी झालेल्या समाजामुळे काही समाजशास्त्रज्ञांना चिंता वाटते. तथापि, तंत्रज्ञान समाजाला एकसंध ठेवण्याची शक्यता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असते. त्यातून नवनवीन संबंध प्रस्थापित होण्यास मदत होते. किंबहुना समाजाला एकसंध ठेवण्याचा तो एक पर्यायी मार्ग आहे.

तंत्रज्ञानामुळे नवीन संबंध प्रस्थापित होण्यासही मदत होते. समाज हा केवळ सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यापुरताच मर्यादित असतो असे नाही. संकटाच्या काळातही समाजच मदतीला धावून येत असतो. उदाहरणार्थ जागतिक आर्थिक मंदीची लाट आली होती तेव्हा युरोपमधील अनेक देशांत अनेकांना रोजगाराला मुकावे लागले तेव्हा ज्याच्यावर विसंबून राहावे असे सुरक्षित ठिकाण त्यांना आढळत नव्हते. त्यामुळे त्यांना उदरनिर्वाहासाठी आपापल्या खेड्यात परतावे लागले होते. नेमकी अशीच परिस्थिती भारतातही निर्माण झाली होती. मुंबईत ज्या वेळी गिरणी कामगारांचा मोठा संप झाला व त्या संपात तोडगा न निघाल्याने अनेक गिरण्यांची धुराडी बंद पडली. परिणामी, रोजगार गमावलेल्या हजारो गिरणी कामगारांनाही उदरनिर्वाहासाठी आपापल्या गावाचा आसरा घ्यावा लागला होता. थोडक्यात, समाज हा जसा 'प्री-मार्केट सपोर्ट' देतो तसाच, 'पोस्ट मार्केट सपोर्ट'ही देत असतो.


आज बाजारपेठेची क्षितिजे विस्तारली गेली, त्याच बरोबर सरकारचीही क्षितिजे विस्तारत गेली. मात्र, तिसरा जो स्तंभ आहे समाज, त्या समाजाची क्षितिजे आकुंचन पावली गेली आहेत. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, तंत्रज्ञानातील बदलाचा फायदा हा जसा बाजारपेठांना व सरकारने करून घेतला. तसा समाजाला करून घेता आला नाही. त्याचे अनुकरण समाजाकडून झाले नाही. धन्यवाद!

# एकविसाव्या शतकातील चौदावे लुई?

## नवनाथ दास



अॅडमिरल रामदास, मेजर जनरल डी.एस.हुडा, लेफ्टनंट जनरल एच.एस.पनाग, लेफ्टनंट जनरल ए.एस.लांबा आणि इतरही अनेक माजी सेनाधिकाऱ्यांनी वर्तमान सरकारला आणि सरकार म्हणण्यापेक्षा सत्तापक्ष व सत्तापक्षाचे वरपासून खालपर्यंतचे नेते यांना भारतीय सेनादलांना राजकारणात ओढू नका आणि त्यांच्या आधारे राजकारण करु नका अशी विनंती व आवाहन केले आहे. निवडणूक प्रचाराची पातळी व एकप्रकारे पावित्र्य राखण्यासाठी या उच्च सेनाधिकाऱ्यांनी केलेले हे आवाहन किंवा विनंती याकडे सत्तापक्ष आणि त्या पक्षाचे सर्व नेते व विशेषतः सर्वोच्च नेते सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत आहेत. शरम सोडून सुरु असलेल्या या प्रचारात आपण सेनादलांची आतापर्यंत कसोशीने पाळत आलेली तटस्थता नष्ट करीत आहोत याचे भान या नेत्यांना राहिलेले नाही. वाटेल ते करुन सत्ताप्राप्तीच्या हव्यासाने पछाडलेले हे नेतृत्व पातळी सोडत चालले आहे. मते मिळविण्याच्या हव्यासापोटी लोकशाही संस्थांवर केवळ आघातच नव्हे तर त्यांचे पावित्र्य नष्ट करीत असल्याची पुसटशी लज्जा किंवा शरम या मंडळींना राहिलेली नाही असे दिसायला लागले आहे. लोकशाहीसाठी हे घातक आहे आणि याचे धोके देशाला भोगावे लागतील अशी भीती निर्माण होऊ लागली आहे. लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरु आहे. सतरावी लोकसभा निवडण्यासाठी मतदारांचा कौल मागितला जात आहे. गेली पाच वर्षे एक वाक्य सर्वांनीच सतत ऐकलेले आहे. सर्वांच्या कानावर आलेले आहे. 'पिछले सत्तर साल में........... !'



या वाक्याचे पालुपद आळवणारे जे महान नेते आहेत त्यांना त्यांच्या भक्त मंडळींनी विष्णु अवतार, युगपुरुष, ब्रह्मांड नायक, विश्वगुरु, महानायक अशा



विविध विशेषणांनी आभूषित केले असल्याने त्यांचे खरे नाव लिहिताना जराशी अडचणच होते. तुम्ही एव्हाना ओळखले असेलच की हे 'नेते-महोदय' कोण ? या नेत्याने गेली पाच वर्षे सातत्याने देशाला हेच ऐकवले की गेल्या सत्तर वर्षात या देशात काहीच झाले नाही. कोणतीही प्रगती, विकास या देशाने अनुभवला नाही. या देशाची जी काही प्रगती झाली, देशाला जागतिक राजकारणात जे काही स्थान मिळाले ते या महाशयांच्या गेल्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत ! जणू काही भारत देश, या पृथ्वीतलावर 2014च्या मे महिन्यातच अस्तित्वात आला असा या दर्पोक्तीचा किंवा उद्दामपणाचा अर्थ आहे. आता या अहंकाराचा आणखी विस्तार होत चालला आहे. 'मी म्हणजेच 130 कोटि भारतीय जनता' असे म्हणण्यापर्यंत या नेत्याची मजल गेली आहे. अलीकडेच एका समारंभात बोलताना त्यांनी त्यांच्या विजयाची ग्वाही देताना, 'मे महिन्यात मी नव्हे तर 130 कोटि जनता (पंतप्रधानपदाची) शपथ घेणार आहे' असे महागर्विष्ठ उद्‌गार काढले. दिवसेंदिवस या नेत्याची स्वनामधन्यतेची सवय पाहता ते फ्रान्समध्ये बहात्तर वर्षे राज्य करणाऱ्या चौदाव्या लुईच्या पावलावर पाऊल ठेवू पहात आहेत की काय अशी शंका येऊ लागते. चौदाव्या लुईने सत्तेच्या केंद्रीकरणाचा कळस करताना 'आय ॲम दि स्टेट' म्हणजे 'मीच राज्य आहे' असे उद्‌गार काढले होते. याचा अर्थ होतो की राजाचे व्यक्तिमत्व आणि त्याचे राज्य म्हणजेच देश हे पूर्णपणे एकरूप झाले आहेत. परंतु यात हुकुमशाहीचे शुध्द दर्शन होते आणि एक दर्प आल्याखेरीज रहात नाही. भारत हे एक लोकशाही राष्ट्र आहे. पंतप्रधान हा लोकप्रतिनिधी असतो. त्यामुळेच ही संसदीय लोकशाही व्यवस्था ही प्रातिनिधिक संस्थांची असते आणि त्यात व्यक्ती किंवा नेता हा एक घटक असतो. तो नेता जनतेचा प्रतिनिधी म्हणून राज्यकारभार करतो. त्यामुळेच 'मी म्हणजे 130 कोटि जनता' असे हुकुमशाही उद्‌गार लोकशाहीत अनुचित मानले जातात. संसदीय लोकशाहीच्या मूलभूत तत्वानुसार पंतप्रधान हा 'फर्स्ट



**१) ॲडमिरल रामदास २) लेफ्टनंट जनरल ए. एस. लांबा ३) लेफ्टनंट जनरल एच. एस. पनाग ४) मेजर जनरल डी. एस. हुडा**

अमंग द इक्वल' असतो. म्हणजे मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांप्रमाणेच त्याचे स्थान इतर मंत्र्यांशी समान स्वरुपाचे किंवा समकक्ष स्वरुपाचे असते. फक्त पंतप्रधान या नात्याने 'समकक्षांमधील पहिला – प्रथम' म्हणून त्याचे स्थान मानण्यात येते. परंतु वर्तमान पंतप्रधानांनी ही सर्व व्यवस्था धाब्यावर बसवली आणि निर्णयांमध्ये मंत्रिमंडळाच्या सामुहिक जबाबदारीचे तत्व लागू न करता केवळ स्वकेंद्रित निर्णयांची पध्दती अमलात आणली. नोटाबंदी, जीएसटी अंमलबजावणीबाबतची घाई, उपग्रहविरोधी क्षेपणास्त्र चाचणी, पाकिस्तानी हद्दीत घुसून हल्ले करणे हे सर्व निर्णय स्वकेंद्रित होते. नोटाबंदीच्या निर्णयाबाबत केवळ एका सहकारी मंत्र्याने शंका व्यक्त केल्याने भडकलेले पंतप्रधान त्या मंत्र्याला उत्तर देण्याचे सौजन्यही न दाखवता तरातरा बैठकीबाहेर निघून गेल्याचे सांगण्यात येते.


या एका प्रसंगावरुन या एकविसाव्या शतकातील चौदाव्या लुईंचे व्यक्तिमत्व समजून यावे. जेव्हा राज्यकारभाराचे स्वरुप व्यक्तिकेंद्रित होत जाते तेव्हा लोकशाही व्यवस्थेतील प्रातिनिधिक संस्थांवर पहिला हल्ला केला जातो. त्यांचा ऱ्हास सुरु होतो. वर्तमान राजवटीच्या नेत्यांनी 2014 मध्ये सत्तेत येताक्षणी केवळ त्यांना हव्या असलेल्या एका नोकरशहाच्या नेमणुकीसाठी घटनादुरुस्तीचे पाऊल उचलले होते. या देशात तो अधिकारी एकमेवद्वितीय असावा आणि त्याला पर्याय या 130 कोटि लोकसंख्येच्या देशात नसावा म्हणून या नेत्याने चक्क घटनादुरुस्तीचा मार्ग स्वीकारला आणि त्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. मोडतोड तेव्हापासून सुरु झाली. यानंतर संस्थांवरील हल्ल्याला किंवा मोडतोडीला योजना आयोग मोडीत काढून सुरुवात करण्यात आली. ज्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे तोंड फाटेपर्यंत गुणगान करण्याची स्पर्धा सत्तापक्षात लागलेली असते. त्या नेताजींची मूळ कल्पना व स्वप्न असलेल्या योजना आयोगालाच या मंडळींनी सुरुंग लावला. म्हणजेच नेताजींचे अतिगुणगान हे ढोंग होते आणि नेताजींच्या गुणगानापेक्षा पं. जवाहरलाल नेहरूंची बदनामी करण्यासाठी नेताजी बोस यांचा वापर करण्याचा कुटिल डाव त्यामागे अधिक होता. परंतु इतिहासात नेहमीच ही मडकी कच्ची राहिली आहेत. नेताजींनी ज्या हरिपुरा काँग्रेस अधिवेशनात सर्वप्रथम नियोजन मंडळाची आणि त्या माध्यमातून या महाकाय देशाच्या सुनियोजित व कालबध्द विकासाची संकल्पना सादर केली आणि काँग्रेस पक्षांतर्गत त्यांनी नियोजन मंडळाची स्थापना करुन त्याचे अध्यक्षपद पं. नेहरूंकडे दिले होते. या राजवटीने पहिला आघात या नेताजींच्या संकल्पनेवरच केला. त्याजागी स्थापन करण्यात आलेल्या नीतीआयोगाचे नक्की काम काय आणि जबाबदारी काय याबाबतचे गूढ पाच वर्षांनंतरही कायम आहे. केवळ सरकारी आकडेवारीचे समर्थन करण्याचे झिलकरी काम या आयोगाकडे देण्यात आलेले आहे. किंवा सरकारला पूरक आणि सरकारचे केवळ चांगले चित्र




रंगविणारी आकडेवारी 'तयार' करण्याचे काम ही (अ)नीती आयोग करताना आढळतो. संस्थांवर आघात व त्यांची मोडतोड करण्याची प्रक्रिया योजना आयोगापासून सुरु झाली. त्यानंतर संसदेचे महत्व कमी करण्याचे प्रयत्न सुरु झाले आणि दुर्दैवाने त्या प्रयत्नात सर्वच सहभागी झाले. राज्यसभेत सत्तापक्षाला स्वतःचे बहुमत नव्हते. त्यामुळे सत्तापक्षाची विधेयके राज्यसभेत अडकून पडत. विरोधी पक्षांचे संख्याबळ अधिक असल्याने ते त्यांचे काही प्रस्ताव त्या विधेयकांमध्ये समाविष्ट करण्याचा आग्रह धरत असत. मुळातच लोकशाही व्यवस्थेचा आधार हा संवाद, चर्चा हा असतो. त्यामुळे राज्यसभेत बहुमत असलेल्या विरोधी पक्षांशी संवाद करुन



आणि विधायक देवाणघेवाण करुन विधेयकांचे मार्ग मोकळे करण्याचे सोडून या सरकारने राज्यसभेच्या अधिकारांमध्ये असलेल्या एका त्रुटीचा आधार घेऊन राज्यसभेलाच बगल देण्यास (साइडलाइन) सुरुवात केली. राज्यसभेला घटनेनुसार वित्तीय अधिकार नाहीत. त्यामुळे एखादे विधेयक हे वित्तीय स्वरुपाचे(मनी बिल) असल्याचे लोकसभा अध्यक्षांनी जाहीर केले तर त्या विधेयकावर राज्यसभा केवळ चर्चा करु शकते. त्याला राज्यसभेच्या मंजुरीची आवश्यकता भासत नाही. नेमक्या याच नियमविषयक तरतुदीचा आधार घेऊन सरकारने त्यांना अत्यावश्यक असलेली विधेयके 'मनी बिल' म्हणजेच वित्तीय विधेयके असल्याचे लोकसभा अध्यक्षांकडून जाहीर करण्याचा सपाटा लावला आणि राज्यसभेला बगल देऊन ती मंजूर करून टाकली. हा अत्यंत दुर्दैवी प्रकार होता. संसदीय लोकशाही व्यवस्थेची ती अवहेलना होती. आधार विषयक दुरुस्ती विधेयकही सरकारने वित्तीय विधेयक म्हणून जाहीर केले. लोकसभा अध्यक्षांनीही तसाच निर्णय दिला आणि हे विधेयकही सरकारने राज्यसभेला वगळून संमत करण्याचा कावा साधला. यावर काही मंडळी न्यायालयात गेली आणि न्यायालयाने त्याबाबत काही ताशेरेही ओढले. परंतु संसदीय मर्यादांचा आदर करण्याची टिप्पणी न्यायालयाने केली आणि अशा पध्दतीने वित्तीय नसलेल्या विधेयकांनाही वित्तीय असल्याचे दाखवून राज्यसभेला बगल देण्याच्या प्रकारांबद्दल नापसंती व्यक्त केली होती. संसद ही कायदे करणारी व लोकांच्या इच्छा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारी सर्वोच्च संस्था आहे. त्यामुळे तिचे स्थानही न्यायालयांच्याही वर मानले जाते. संसदेने केलेल्या कायद्यांचा अर्थ लावणे व ते राज्यघटनेला, राज्यघटनेत समाविष्ट तत्वांना अनुसरुन आहेत की नाही याची तपासणी करण्याचे अधिकार न्यायालयांना असतात. परंतु वर्तमान सरकारने राज्यसभेला बाजुला सारण्याचे जे हीन प्रकार व चलाख्या सुरु केल्या त्यामुळे न्यायालयांना संसदेच्या आचरणावर टिप्पणी करण्याची संधी मिळाली. परंतु सुमार बुध्दी नेतृत्वाला याने फरक पडत नसतो. कारण त्यांची बौध्दिक कुवत केवळ मतांच्या हव्यासापर्यंतच मर्यादित असते.



लोकशाहीतील अशा अनेक संस्थांचे महत्व कमी करण्याचे पध्दतशीर प्रयत्न या राजवटीने पाच वर्षात केले. यात सीबीआय, माहिती आयोग, सेनादले, न्यायालये, राज्यपाल, अशी यादीच देता येईल. अगदी ताजे उदाहरण ! राजस्थानचे राज्यपाल कल्याणसिंग यांनी वर्तमान पंतप्रधानांच्याच फेरनिवडीची शक्यता व्यक्त केली. राज्यपालाचे पद घटनात्मक आहे आणि राजकारणाच्या पलीकडचे असते. तरीही उत्तर प्रदेशचे माजी



काही त्यांनी स्वतःच हे हल्ले केल्याचा राणा भीमदेवी आव आणून या देशाला आपल्यासारखे निर्णायक नेतृत्व कसे मिळाले आहे आणि त्यामुळेच पाकिस्तानला धडा शिकविण्याचे कसे निर्णय केले जात आहेत याच्या भरपूर फुशारक्या मारायला सुरुवात केली. अत्यंत सवंग पध्दतीने भारतीय सेनादलांच्या कामगिरीचा वापर करुन आपल्या पक्षाला निवडणुकीत मते कशी मिळवता येतील यासाठी या सुमारबुध्दी नेत्यांनी सेनादलांच्या पराक्रमाचा वापर सुरु केला. अखेर अतिरेक होताना दिसल्यावर काहीजणांनी निवडणूक आयोगाकडे तक्रारी केल्या आणि आयोगाने सेनादलांचा उल्लेख करणे तसेच त्यांच्या कामगिरीच्या आधारे मते मागण्याचे प्रकार अमान्य असल्याचे जाहीर केले. असे कुणी केल्यास तो आचारसंहितेचा भंग मानला जाईल असेही आयोगाने नमूद केले. परंतु आयोगाला जुमानते कोण ? 'या निवडणुकीत मीच जिंकणार, मे महिन्यात निकाल लागल्यानंतर पंतप्रधानपदाची शपथ मीच घेणार आणि ती शपथ मी घेणार नसून 130 कोटि जनताच घेणार आहे असे सांगण्यापर्यंत या ब्रह्मांडनायकांची मजल गेली. म्हणजेच आता या नेत्याने स्वतःमध्ये 130 कोटि लोकसंख्येला सामावून घेतले किंवा 130 कोटि लोकसंख्येला पर्यायवाची (नेता) म्हणून स्वतःला प्रोजेक्ट करण्यासही बिनदिक्कतपणे सुरुवात केली आहे. याचाच अर्थ आता ही हुकुमशाही किंवा एकतंत्री कारभाराकडे वाटचाल मानावी लागेल. हे नेते आयोगाने मनाई केलेल्या प्रत्येक मुद्याचा विधिनिषेधशून्य रीतीने प्रचारात वापर करु लागले आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तर 'काँग्रेसने अजमल कसाब को बिर्याणी खिलायी मगर मोदी जी की सेना पाकिस्तानीयोंके गोली और गोला खिला रही है' असे वक्तव्य करण्यासही मागे पुढे पाहिले नाही. याबाबत तक्रार करुनही निवडणूक आयोगाने मौन पाळलेले. आयोग चक्क मूग गिळून गप्प आहे.

मुख्यमंत्री राहिलेले आणि जे मुख्यमंत्री असताना अयोध्येतील वादग्रस्त वस्तु म्हणजे बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्यात आली त्या कल्याणसिंग यांना ते राज्यपालासारख्या घटनात्मक व अ-राजकीय पदावर आसीन आहेत याचा विसर पडला आणि एखाद्या पक्ष प्रचारकाप्रमाणे त्यांनी त्यांच्या अंतःकरणातील पंतप्रधानांबाबतची इच्छा प्रदर्शित करुन टाकली. आता निवडणूक आयोगाने त्याची दखल घेऊन राष्ट्रपतींकडे त्यांच्या या आचरणाची माहिती कळवली आहे.

खुद्द निवडणूक आयोगाचेही राजकीयीकरण झालेले आहे यात शंका नाही. निवडणूक आयोग ही देखील लोकशाहीतील एक प्रमुख संस्था असते. पारदर्शक आणि खुल्या व निःपक्ष निवडणुका घेण्याची त्यांची मूलभूत जबाबदारी असते. निवडणूक रिंगणातील सर्व राजकीय पक्षांना प्रचाराची समान संधी उपलब्ध करुन देणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी असते. परंतु ती जबाबदारी पार पाडण्यात आयोग सपशेल अयशस्वी ठरत असल्याचे आढळून येते. त्यासाठीही एका ताज्या उदाहरणाचा संदर्भ द्यावा लागेल. बालाकोट हवाई मोहिमेनंतर या देशाच्या पंतप्रधान उर्फ ब्रह्मांड नायकांनी जणू



सेनादलांचा वापर प्रचारात करायचा नाही असे जाहीर करुनही जर खुद्द पंतप्रधानच त्या नियमाचा भंग करीत असतील तर आयोग गप्प का हा सवाल आहे. माजी नौदलप्रमुख ॲडमिरल रामदास यांनी आयोगाला आणि सरकारलाही पत्र लिहून सेनादलांना राजकारणात ओढण्याचा प्रकार करु नका म्हणून विनवले आहे. जनरल पनाग यांनी त्यांच्या निवेदनात सेनादलांचा राजकीय हेतुंसाठी वापर करण्याचे अत्यंत पध्दतशीर प्रयत्न सुरु असून ही सेनेच्या राजकीय करणाची सुरुवात असल्याचे मत व्यक्त केले आहे. तर जनरल लांबा यांच्या म्हणण्यानुसार भारतीय सेनादले ही बिगर राजकीय किंवा राजकीयदृष्ट्या अलिप्त राखण्यात आलेली आहेत. परंतु राजकीय नेतृत्वाने सेनादलांशी स्वतःला जोडणे आणित्यांच्या पराक्रमाचा स्वतःच्या राजकीय लाभासाठी वापर करणे ही बाब सर्वस्वी अमान्य आहे. आता पर्यंत कमीतकमी दोन वेळेस अतिशय वरिष्ठ अशा सेनाधिकाऱ्यांनी या सरकारला म्हणजेच नेतृत्वाला सेनादलांना राजकारणात ओढू नका म्हणून बजावूनही मुद्दाम, जाणीवपूर्वक व जाणूनबुजून सेनादलांच्या राजकीयकरणाचा प्रकार सुरु करण्यात आलेला आहे. यातले धोके या सुमारबुध्दी राजकीय नेतृत्वाच्या लक्षात येत नसावेत किंवा ते मुद्दाम त्याकडे दुर्लक्ष करीत असावेत. सेनादलांच्या राजकीयकरणाने काय होते ते शेजारी देशात म्हणजेच पाकिस्तानात काय घडत आहे यावरुन लक्षात येते. पाकिस्तानातील सर्व समस्यांचे मूळ तेथील राजकीय व्यवस्थेवर असलेल्या सेनादलांच्या अंकुशात आहे. तेथील सेनादले पाकिस्तानची ध्येयधोरणे व परराष्ट्र संबंध विषयक नीती व धोरणे ठरवितात आणि त्यामुळेच तेथील नागरी प्रशासन हे सेनेच्या हातचे बाहुले झाले आहे. वर्तमान सुमारबुध्दी नेतृत्वाला ही परिस्थिती भारतात निर्माण करायची आहे काय असा प्रश्न मनात आल्याखेरीज रहात नाही.





वर चौदाव्या लुईच्या 'आय ॲम द स्टेट' हे निरंकुशतेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या वक्तव्याचा संदर्भ आहे. त्याचा वारसदार पंधराव्या लुईने त्यापुढे मजल गाठताना, 'आफ्टर मी डिल्यूज' असे विधान केले होते. म्हणजे 'माझ्यानंतर प्रलय' (माझी राजवट संपल्यानंतर प्रलय होईल) असे वक्तव्य केले होते. भविष्यातील परिणामांची फारशी तमा न बाळगता केवळ स्वकेंद्रित सरकार चालविणे आणि त्या सत्तापटावरुन अंतर्धान पावल्यानंतर मागे देशात अनागोंदी व अराजकाला वाट मोकळी करुन देणे याला राष्ट्रवादी व देशप्रेमी नेतृत्व म्हणता येणार नाही. दुर्दैवाने देशाची वाटचाल अशाच दिशेने चालू असल्याचे दिसू लागले आहे!

घंटाकर्ण, नवी दिल्ली

## आले पोलिसांचे राज्य??

22 मार्च हा पाकिस्तानचा 'राष्ट्रीय दिवस' असतो. इतरही अनेक देश आपापले राष्ट्रीय दिवस साजरे करीत असतात. या दिवशी संबंधित देशांच्या भारतातील वकिलातींतर्फे एखादा स्वागत समारंभ आयोजित केला जातो. त्याल इतर अनेक देशांच्या राजदूतांना आमंत्रित केले जाते. त्याचबरोबर यजमान देशाच्या सरकारला, केंद्रीय मंत्र्यांना, दिल्लीतील पत्रकारांना, इतर परराष्ट्र संबंध क्षेत्रातील जाणकारांनाही आमंत्रित केले जात असते. यावर्षीही सालाबादाप्रमाणे पाकिस्तानच्या राष्ट्रीय दिवसानिमित्त दिल्लीतील पाकिस्तानी दूतावासात स्वागतसमारंभ आयोजित करण्यात आला होता. वर उल्लेख केलेल्या सर्वांना आमंत्रणे पाठविण्यात आली होती. परंतु पुलवामा घटनेच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने आपला कोणताही प्रतिनिधी या स्वागतसमारंभास पाठविण्याचे रद्द केले. भारत सरकारतर्फे या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला असेच चित्र निर्माण झाले. परंतु स्वागत समारंभ सायंकाळी संपतासंपता सर्वांच्या मोबाईलवर निरोप आले की भारताच्या पंतप्रधानांनी एक ट्वीट करुन पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रानखान यांचे राष्ट्रीय दिनानिमित्त अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छाही दिल्या.

याला काय म्हणावे ? दुटप्पीपणा ? की ढोंग ?

एका बाजूला बहिष्काराची भूमिका घ्यायची व दुसरीकडे स्वतः मात्र पाकिस्तानी पंतप्रधानांना शुभेच्छा पाठवायच्या ही कोणती नीती ? किंवा हे कोणत्या प्रकारचे परराष्ट्र-संबंध धोरण म्हणायचे? केवळ एवढेच नाही ! त्यादिवशी या कार्यक्रमाला जाणाऱ्या भारतीय निमंत्रितांना पोलिसांच्या जाचाला तोंड द्यावे लागले. पाकिस्तानी दूतावासाच्या बाहेर दिल्ली पोलिसांना मोठमोठी बॅरिकेड्स लावली होती. वरिष्ठ पोलिस अधिकारी तेथे उभे राहून आत जाणाऱ्यांवर काटेकोर नजर ठेवत होते. ज्या पत्रकारांना निमंत्रणे होती तेही या छाननीतून सुटले नाहीत. पोलिसांनी प्रथम नाव-गाव यांची चौकशी सुरु केली. त्यानंतर त्या निमंत्रिताचा फोटो काढणे आणि सरतेशेवटी प्रवेशद्वारातून आत जाणाऱ्या पाहुण्यांचे व्हिडिओ चित्रीकरण देखील केले जात होते. हे विचित्र आणि अभूतपूर्व होते. जे भारतीय निमंत्रित आत जात होते त्यांना समारंभाला जाण्यापासून परावृत्त करण्याचे प्रयत्नही पोलिस अधिकारी करीत होते हे आणखी धक्कादायक होते.

पत्रकारांना तर चक्क, 'कशाला






जाता ? सरकारने यात सहभागी न होण्याचे ठरविले आहे त्याची माहिती आहे ना?' असे सांगण्यात येत होते. ही अप्रत्यक्ष आणि गर्भित अशी धमकीच होती. पत्रकारांनी यावर पोलिसांनाच उलटे प्रश्न सुरु केल्यावर ते गप्प बसले. एवढ्यात माजी परराष्ट्रसचिव मुचकुंद दुबे आले. ते अत्यंत साधे आहेत. ते एवढ्या मोठ्या पदावर होते असे त्यांच्याकडे पाहून वाटतही नाही इतके ते साधे आहेत. त्यांना पोलिसांनी अडवून आत जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करताच ते खरोखरच भडकले. 'तुम्हाला मी कोण आहे हे माहिती आहे का ? मी या देशाचा परराष्ट्रसचिव होतो. तुम्ही मला भारताचे परराष्ट्र धोरण शिकवत आहात काय? मी आत जाणार आहे आणि तुम्हाला काय करायचे ते करा!' असे सुनावून ते आत गेले.

समारंभ संपतासंपता बाहेर सरकारची चापलुसी करणाऱ्या एका इंग्रजी वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी बाहरे उभे राहून या समारंभात हजर राहणे हे देशभक्तीत बसते का असे सरकारची चमचेगिरी करणारे प्रश्न करुन आतून येणाऱ्यांच्या प्रतिक्रिया गोळा करायला लागले. त्यावर एका वरिष्ठ पत्रकाराने भडकून या वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधींना सरकारची चमचेगिरी करण्यापेक्षा आत समारंभात हजर राहून बातम्या मिळविणे हे तुम्हाला शोभून दिसले असते. तुम्ही पत्रकार नसून सरकारी चमचे आहात. रागातच या पत्रकारमहोदयांनी त्यांना सुनावले की हे सरकार पाकिस्तानला एकटे पाडण्याचा दावा करीत आहे. आत जाऊन पहा तरी?

जवळपास जगभरातल्या बहुतेक देशांचे राजदूत आत जमा झाले आहेत ! ही बातमी द्यायची सोडून चमचेगिरी करीत बसला आहात ? आपल्याच बिरादरीतून हे खडे बोल ऐकल्यानंतर त्या वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधींची चांगलीच पंचाईत झाली. पण गंभीर बाब ही की एका वकिलातीमध्ये जाणाऱ्यांचे फोटो, व्हिडिओ काढण्याचे सरकारी कृत्य म्हणजे आणीबाणीसारखाच प्रकार आहे !

## प्रश्न विचारता ?? घ्या त्याची शिक्षा !

सध्याच्या युगपुरुषांच्या सरकारमध्ये योगायोग फारच घडतात बुवा! निवडणुकीच्या बरोब्बर आधी पुलवामा-बालाकोट घडते आणि विश्वगुरु उर्फ भारताचे युगपुरुष लगेचच त्याच्या फुशारक्या मारायला सरसावतात ! निवडणूक आयोगाने मनाई करुनही भारतीय सेनेचा उल्लेख करुन प्रचार करतात! निवडणूक आयोगाच्या सूचनांचा भंग करताना त्यांना कोणतीच लज्जा किंवा शरम वाटतही नाही ! खरोखर गेल्या सत्तर वर्षात असे घडले नव्हते हो! सरकारला प्रश्न करणारे देशद्रोही ठरविण्याचा प्रकार 2014 पासून सुरु झालेलाच आहे. परंतु काहीवेळस गरीब लोकं सुध्दा वैतागून सरकारला प्रश्न करायचे धाडस दाखवायला लागतात



तेव्हा त्यांना चक्क धमकावून, धाक दाखवून हिंसक रीतीने गप्प करण्याचे प्रकारही सुरु झाले आहेत. त्याचीच ही कथा! देशाच्या वस्त्रोद्योगमंत्री उत्तर प्रदेशाच्या दौऱ्यावर



असतानाचा हा प्रसंग आहे. काही हिंदी वृत्तपत्रांनी तो प्रसिध्दही केला पण स्वतःला राष्ट्रीय समजणाऱ्या माध्यमांनी त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. तर या वस्त्रोद्योगमंत्र्यांच्या वाराणसी दौऱ्यात गंगा नदीच्या किनारी पट्ट्यात मोठ्या संख्येने असलेल्या मल्लाह(नावाडी) समाजाचे एक शिष्टमंडळ त्यांना भेटले. या समाजाच्या काही अडीअडचणी व तक्रारी होत्या. त्यांच्या निवारणाची मागणी त्यांनी केली.

वस्त्रोद्योगमंत्री त्यांच्या काहीशा कडक-फटकळ स्वभावाबद्दल पहिल्यापासूनच प्रसिध्द आहेत. यावेळच्या बोलाचालीत एका तरुण कार्यकर्त्याने जरा आक्रमकपणे प्रश्न विचारले. त्यावरुन वातावरण गरम झाले. तणावात ती मीटिंग संपली. यानंतर काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांचा वाराणसी दौरा झाला. वस्त्रोद्योग मंत्र्यांबरोबरची बैठक अनिर्णित अवस्थेत संपल्याने मल्लाह समाजाच्या या शिष्टमंडळाने प्रियंका गांधी यांचीही भेट घेण्याचे ठरविले.

बैठक झाली. प्रियंका गांधी यांनी भरपूर वेळ देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांना त्या म्हणाल्या की ना राज्यात ना केंद्रात काँग्रेसचे सरकार आहे. त्यामुळे त्या फक्त मल्लाह समाजाबरोबर राहून त्यांच्या संघर्षात त्यांना साथ देऊ शकतील. प्रियंका गांधी यांनी संबंधित तरुण नेत्याच्या पाठीवर थोपटून हे आश्वासन दिले. बैठक चांगली झाली. याच्या बातम्या, फोटो प्रसिध्द झाले. त्या कार्यकर्त्याच्या पाठीवर थोपटताना प्रियंका गांधी यांचा फोटोही आला. आणि काय योगायोग पहा......... ! त्या रात्रीच त्या तरुण कार्यकर्त्याची नाव जाळून टाकण्यात आली आणि अन्य दोन नावांची नासधूस करण्यात आली. याला योगायोग म्हणायचे की आणखी काही? झाले असे की या प्रकाराने मल्लाह म्हणजेच हा नावाडी-मच्छिमार समाज(त्यांना निषादही म्हणतात) चांगलाच चिडला आहे. या समाजाचे मतदारांमधील प्रमाण 17 टक्के(उत्तर प्रदेशात) आहे. पूर्व उत्तर प्रदेश आणि बिहार व पार पश्चिम बंगालपर्यंत हा समाज पसरलेला आहे. गोरखपूरच्या लोकसभा पोटनिवडणुकीत समाजवादी पक्षाने एका निषाद नेत्याच्या मुलालाच तिकिट दिले होते आणि त्याने बलाढ्य भाजपच्या उमेदवाराला पराभूत करुन धक्का दिला होता. गोरखपूर हा मुख्यमंत्री आदित्यनाथ यांचा बालेकिल्ला आहे. ते म्हणतील ती पूर्वदिशा असा त्यांचा तेथे दरारा आहे. पण पोटनिवडणुकीने त्यांना हादरा दिला.



आता भाजपवर चिडलेला हा समाज काय करतो आणि त्याचा फटका भाजपला किती बसतो ते निवडणुकीत कळेलच ! पण आपल्याला विरोध करणाऱ्यांविरुध्द दहशतीचे मार्ग अवलंबिण्याचे हे प्रकार अनुचितच मानावे लागतील ! ताज्या माहितीनुसार निषाद समाजाला सपा-बसपा पासून तोडण्याचे प्रयत्न भाजपने सुरु केले आहेत.

## जेटली डाऊन? रविशंकरप्रसाद अप?

राजकारणात कोणाचे वजन कधी कमी होईल किंवा जास्त होईल हे सांगता येत नाही ! पण हा राजकीय तराजूची ही पारडी कधी वर कधी खाली हा खेळ सतत चालणारा असतो. अर्थमंत्री अरुण जेटली हे या सरकारचे, युगपुरुषांचे वकील मानले जातात. अगदी मोजक्या व महत्वपूर्ण अशा निर्णयांची माहिती देण्याची जबाबदारी त्यांना दिली जाते. अगदी बालाकोट हवाई हल्ल्याबाबतची माहिती देण्यासाठीही त्यांनाच सांगण्यात आले होते. प्रकृति बरी नसतानाही त्यांनी ती कामगिरी पार पाडली होती. मूत्रपिंडरोपणाच्या शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रकृति काहीशी संवेदनशील झालेली आहे. तरीही प्रकाशात राहण्याची त्यांची धडपड सुरु असते. भाजपमधील गटबाजीत त्यांच्या विरोधी गटातील मानले जाणारे कायदामंत्री रविशंकर प्रसाद यांचा तारा गेल्या काही महिन्यांपासून चमकू लागला आहे. पक्षाध्यक्षांच्या खास मर्जीतले म्हणून ते आता ओळखले जाऊ लागले आहेत. काहीकाही वेळेस तर त्यांना कॅबिनेट, पक्ष आणि त्यांचे मंत्रालय अशा तिहेरी पत्रकार परिषदाही घ्याव्या लागतात. ते अगदी थकून जातात. पण करणार काय? त्यांचा पक्ष शिस्तबध्द म्हणून ओळखला जातो ना? पण म्हणतात ना एखाद्याला चांगले दिवस आले की ते येतच राहतात. आता पक्षाध्यक्षांचे आवडते प्रवक्ते म्हणून ते आघाडी सांभाळत आहेत. आता शत्रुघ्न सिन्हा यांच्या बंडानंतर पटनासाहिब मतदारसंघासाठी उमेदवार म्हणून त्यांना तिकिट देण्यात आले आहे. भले त्यांना तेथील कार्यकर्त्यांचा विरोध असो पण लोकसभा निवडणूक लढविण्याची त्यांची मनीषा पूर्ण झाली. या सगळ्या गडबडीत अरुण जेटली यांना फक्त ब्लॉग लिहिणे आणि जमेल तशी सरकारची वकिली बाण्याने बाजू मांडत राहणे









एवढेच काम राहिलेले आहे. एखाद्या किचकट विषयावर बोलायचे झाल्यास त्यांना पक्षाच्या मुख्य कार्यालयात पाठवून बोलायला लावले जाते. बाकी निवडणुकीशी संबंधित कोणत्याच निर्णय प्रक्रियेत त्यांना फारसे स्थान ठेवण्यात आलेले नाही. असो, असतात एकेकाचे दिवस ! सध्या रविशंकरप्रसाद सातव्या आस्मानात आहेत !



## पत्ते साफ !!

सध्या भाजपमध्ये पंतप्रधान आणि पक्षाध्यक्ष यांचा शब्द अंतिम आहे. त्यामुळेच त्यांनी केलेल्या निर्णयावर कुणीही प्रश्न करु शकत नाहीत. लालकृष्ण अडवानी, मुरली मनोहर जोशी, शांताकुमार, कलराज मिश्र या पंच्याहत्तरी पार केलेल्या नेत्यांना त्यांनी धक्क्याला लावलेच. पण त्यांना नको असलेल्या काही अन्य सक्रिय नेत्यांनाही त्यांनी बाहेरचा दरवाजा दाखवला. केंद्रात राज्यमंत्री असलेल्या सुरेंद्रसिंग अहलुवालिया यांचा पत्ता त्यांनी असाच सफाईदारपणे कापला. अहलुवालिया यांनी 2014 मध्ये ममता बॅनर्जी यांच्या पश्चिम बंगालमधून भाजपसाठी दार्जिलिंगची जागा जिंकून दाखवली होती. उत्कृष्ट बंगाली वक्ते असलेल्या अहलुवालिया यांची ती करामत होती. अहलुवालिया हे पक्षातल्या गटबाजीचे पहिल्यांदाच बळी नाहीत. यापूर्वी ते राज्यसभेत असताना ते सुषमा स्वराज व अडवानी यांचे निकटवर्ति म्हणून ओळखले जात. सुषमा स्वराज यांच्याबरोबर ते छायेसारखे असत. इतके की त्या काळात एक विनोद प्रचलित झाला होता की सुषमा स्वराज यांची साडी व जाकिट ज्या रंगाचे असते त्याच रंगाचा फेटा अहलुवालिया घालतात. त्यामुळे अरुण जेटली हे त्यांच्यावर खुंदक खाऊन होते. त्यांची राज्यसभेची मुदत संपल्यानंतर जेटली यांनी त्यांना पुन्हा तिकिट मिळू दिले नाही आणि तीन-चार वर्षे राजकीय वनवासात पाठविले. 2014 मध्ये लोकसभा लढविण्यास आणि ते पडावेत म्हणून दार्जिलिंगसारख्या परक्या ठिकाणाहून त्यांना तिकिट देण्यात आले.






तरीही ते निवडून आले. नंतर केंद्रात त्यांना राज्यमंत्रीपद मिळाले. आता पुन्हा लोकसभा निवडणुकीत त्यांचे तिकिट कापण्यात आले. म्हणे अहलुवालिया यांनी एका पत्रकार परिषदेत बोलताना आपल्या नावापुढे 'चौकीदार' लावण्याचे नाकारले होते. तसेच बालाकोटची कारवाई दहशतवाद्यांना मारण्यासाठी नव्हती तर 'मेसेज' देण्यासाठी होती अशी टिप्पणी केली होती. एवढे धारिष्ट्य व अपराध केल्यानंतर त्यांना शिक्षा मिळणे अपेक्षितच होते. त्यांचे तिकिट कापण्यात आले.







अहलुवालिया याना माहिती तंत्रज्ञानात उत्तम गति आहे. संसदेतील कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग व प्रचलन वाढावे यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल लोकसभेच्या अध्यक्षा सुमित्रा महाजन यांनी सोळाव्या लोकसभेच्या समारोपप्रसंगी विशेषत्वाने घेऊन त्यांची प्रशंसा केली होती. परंतु अहलुवालिया यांना तरीही तिकिट मिळू शकले नाही. त्यांची प्रशंसा करणाऱ्या सुमित्रा महाजनांची अवस्थाही फारशी वेगळी नाही ! पण आता अहलुवालिया करणार काय ? त्यांची आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता दीदी यांची चांगली मैत्री आहे. काँग्रेसमध्ये तर त्यांचे अनेक मित्र आहेतच. आता अहलुवालिया आपल्या या जुन्या मित्रांची मदत घेतील ? ? या पक्ष आणि सरकार चालविणाऱ्या या जोडगोळीचा

### आणखी एक पराक्रम!

छत्तीसगढ विधानसभेत भाजपचा अतिशय दारुण असा पराभव झाला. त्याची शिक्षा तेथील विद्यमान म्हणजेच मावळत्या लोकसभेतील भाजपच्या दहा खासदारांना देण्याचे त्यांनी ठरवले. म्हणजे या दहाही खासदारांना या लोकसभेसाठी चक्क तिकिट नाकारण्यात आले.छत्तीसगढमध्ये लोकसभेच्या 11 जागा आहेत आणि 2014 मध्ये भाजपने 10 जागा जिंकलेल्या होत्या. पण तुम्हाला प्रश्न पडला असेल की विधानसभा निवडणुकांमधील अपयशाचा खासदारांशी संबंध कसा ? छत्तीसगढमधल्या दहा खासदारांमध्ये रायपूरहून सातवेळा निवडून आलेले एक तगडे खासदार आहेत. रमेश बैस ! ते एक तालेवार कुर्मी नेते आहेत आणि छत्तीसगढमधील एक लोकप्रिय नेते आहेत. माजी मुख्यमंत्री रमणसिंग त्यांचे कट्टर विरोधक आहेत त्याचप्रमाणे बैस हे लालकृष्ण अडवानी व सुषमा स्वराज यांच्या गटाचे मानले जातात. त्यामुळे ज्यांच्या विजयाची खात्री आहे त्यांचे तिकिट कापणे अवघड असल्याने सर्वच दहा

खासदारांचे तिकिट कापण्याचे ठरविण्यात आले. म्हणजे ढेकूण मारण्यासाठी घराला आग लावण्याचा हा प्रकार आहे. जोडगोळीने बरोबर कावा साधला आणि रमेश बैस यांना घरी बसवले. परिणाम ??? छत्तीसगढमधल्या सर्व 11 जागा भाजप हरण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. छत्तीसगढमध्ये भाजप हे दुभंगलेले घर झाले आहे.

बैस यांना काँग्रेसने निमंत्रण दिले होते पण त्यांनी नम्रपणे त्यास नकार दिला. त्यांचे व काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांचे उत्तम संबंध आहेत. अधिकाराची गुर्मी व हम करेसो कायदा असा प्रकार सध्या भाजपमध्ये चालू आहे. छत्तीसगढच्या अकरा जागा गमावणे भाजपला महागात पडणार आहे!

## धक्क्यावर धक्के ? गळतीच गळती !

युगपुरुष आणि त्यांचे सहाय्यक उर्फ पक्षाध्यक्ष हे दोघेही आगामी निवडणुकीत यश प्राप्त करण्यासाठी एवढे उतावीळ आणि आगतिक होण्याचे कारण काय? राजकारणात हार-जीत चालतच असते. परंतु पराभूत होण्याचा अनुभव न घेतलेल्या या जोडगोळीला पराभवाच्या भीतीने पछाडून टाकलेले आहे. त्यामुळेच कसेही करुन विजय मिळविण्यासाठी ते वाटेल त्या थराला जाऊ लागले आहेत. उत्तर प्रदेशाप्रमाणेच राजस्थानातही भाजपला पुन्हा 2014 प्रमाणे 'पैकीच्या पैकी' म्हणजे लोकसभेच्या सर्वच्या सर्व 25 जागांवर विजय मिळणे अशक्य आहे. याची जाणीव या जोडगोळीला असल्यानेच कमी होणाऱ्या जागा इतर कुठून भरुन काढायच्या हा यक्षप्रश्न त्यांना भेडसावत आहे. राजस्थानात तर अशी स्थिती आहे की भाजपला लागलेली गळती थांबण्याची चिन्हे दिसेनाशी झाली आहेत. अगदी पक्के संघनिष्ठ असलेलेकाही स्थानिक नेते व कार्यकर्ते देखील भाजपची साथ सोडून काँग्रेसमध्ये सामील होताना आढळत आहेत.

भाजपने राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून नेमलेल्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे या तर पूर्ण बिनधास्त आहेत. त्यांना ना पक्ष, ना संघटनेची फिकीर राहिली आहे. भाजपने त्यांना स्थानिक राजकारणातून बाहेर काढले असले तरी राज्याची सूत्रे सांभाळण्यासाठी भाजपला समर्थ हात मिळताना दिसत नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर सांगानेरचे सहावेळेला निवडून आलेले आमदार घनःश्याम तिवारी यांचे देता येईल. अत्यंत कर्मठ असे रा.स्व.संघाचे ते नेते आहेत. आणीबाणीत तुरुंगवास देखील भोगलेले आहेत. कै.भैरोसिंग शेखावत यांच्यापासून वसुंधरा राजे यांच्या सर्व मंत्रिमंडळात ते मंत्री राहिलेले आहेत. वसुंधरा राजे यांच्याविरोधात त्यांनी भ्रष्टाचाराचे उघड आरोप करुन पक्षाची नाराजी ओढवून घेतली होती. मग पक्षाने त्यांची कोंडी सुरु केली व पूर्ण एकाकी पाडले.



पण निवडणुकीचा काळ येताच त्यांनी संधी साधली. आपला घोर काँग्रेसविरोध बाजुला ठेवून त्यांनी चक्क काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांच्याबरोबर जयपूर परिसरातील अनेक भाजप स्थानिक नेते व कार्यकर्त्यांनी काँग्रेसला आपलेसे केले. जयपूरचे महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष, माजी मंत्री व पाली परिसरातले भाजपचे एक ताकदवान नेते सुरेंद्र गोयल अशा अनेकांनी काँग्रेसशी घरोबा करुन टाकला. यावरुन राजस्थानात भाजपला लागलेल्या गळतीची कल्पना यावी. या राज्याचा इतिहास आहे की जो पक्ष राज्यात सत्तेत येतो त्यालाच लोकसभेतही फायदा होतो. याचा अर्थच हा की भाजपला पुन्हा 25 पैकी 25 जागा मिळणे असंभव आहे. म्हणून युगपुरुष आणि त्यांचे सहाय्यक पक्षाध्यक्ष ही जोडगोळी अस्वस्थ आहे.




# मुत्सद्देगिरीत शक्तिपेक्षा युक्ति ही अधिक महत्वाची!

**गहिनीनाथ**





फाजील साहसवाद हा नाटकी आणि सवंग असतो. सुमारबुध्दी मंडळींना तो हुकमाचा एक्का वाटतो आणि त्याचा वापर त्यांच्याकडून सतत करण्यात येतो. साहसवादाचे यश हे तात्पुरते, अल्पकालीन असते. दूरगामी आणि दीर्घकालीन यशासाठी स्थिर-बुध्दी नेतृत्वाची आवश्यकता असते. 2014 पूर्वी पर्यंत तशी स्थिती होती. पी.व्ही.नरसिंह राव, अटलबिहारी वाजपेयी आणि मनमोहनसिंग यांनी देशाला स्थिर-बुध्दी नेतृत्व देण्याबरोबरच देशाच्या परराष्ट्र-संबंध-नीतीलाही स्थिरता आणि सातत्य प्रदान केलेले होते. सवंगपणा, उठवळपणाने क्षणिक टाळ्या मिळविणे आणि फुशारक्या मारणे शक्य होते परंतु त्यामध्ये देशाचे नुकसान होते. भारताला आर्थिक महाशक्ति करण्याची सुरुवात नरसिंह राव व मनमोहनसिंग यांनी केली. नंतरच्या काळात अगदी एच.डी.देवेगौडा किंवा इंदरकुमार गुजराल यांच्यासारख्यांनी त्यांच्या अल्पकालीन राजवटीतही तोच स्थैर्याचा वारसा यशस्वीपणे पुढे चालविला आणि नंतर वाजपेयी व मनमोहनसिंग यांच्या काळातही तीच प्रक्रिया पुढे चालू राहिली. भारत आर्थिक महाशक्ति होणे याचे केवळ आर्थिक पैलू नाहीत. आधुनिक काळात परराष्ट्र-संबंध-नीती किंवा धोरणांमध्ये देशाच्या आर्थिक क्षमतेला विशेष नव्हे तर






निर्णायक महत्व प्राप्त झाले आहे. कारण आर्थिक क्षमतेबरोबरच देशाच्या आवाजास जी स्वायत्तता आंतरराष्ट्रीय मंचांवर प्राप्त होते त्यातून परराष्ट्र-संबंधविषयक नीती निर्धारित होऊ लागते. भारताचा आवाज आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर ऐकला जाणे किंवा भारताच्या मताला प्राप्त झालेली किंमत ही गेल्या जवळपास 28 वर्षांच्या सततच्या आर्थिक क्षमता-वृध्दीचा परिणाम आहे. ही क्षमता फक्त गेल्या चार वर्षात प्राप्त झालेली नाही.

1971 नंतर म्हणजेच भारताच्या शेजारी देशांमध्ये बांगला देशाच्या निर्मितीने भर पडली. पाकिस्तानपासून विभक्त होऊन बांगला देशाची निर्मिती झालेली होती. भारताची या निर्मितीमध्ये भूमिका होती अशी सार्वत्रिक प्रचलित समजूत आहे. त्यात तथ्यही आहे. त्यातून पाकिस्तानने कायमस्वरुपी भारताच्या विरोधात कडवी भूमिका घेण्यास सुरुवात केली. लष्करीदृष्ट्या भारताला नेस्तनाबूत करु शकत नसल्याने पाकिस्तानने अत्यंत यशस्वी अशा छद्म-युध्दाचा म्हणजेच गनिमी काव्याने भारताला त्रास देण्याची युक्ति अमलात आणली. पाकिस्तानपासून विभक्त होऊन ज्याप्रमाणे बांगला देशाची निर्मिती झाली त्याच धर्तीवर काश्मीरमध्ये धार्मिक आधारावर प्रथम स्वायत्ततेच्या आणि नंतर 'आझादी'च्या मागणीला खतपाणी घालणे आणि सरतेशेवटी काश्मीरचा पाकिस्तानात समावेश करण्याचे स्वप्न पाकिस्तानने बाळगलेले आहे. त्यासाठी वाटेल त्या कारवाया करण्याचे काम ते करीत आहेत. भारताला जेरीस आणण्यासाठी पाकिस्तानने दहशतवादी कारवायांचा अवलंब सुरु केला.

‘ब्लीडिंग इंडिया थ्रू ए थाऊजंड कट्स’ म्हणजे ‘भारताला हजार जखमा करुन रक्तबंबाळ करीत राहणे’ या नीतीचा अवलंब पाकिस्तानने सुरु केला. यामध्ये पैसाही कमी खर्च होत असल्याने पाकिस्तान आर्थिक दिवाळखोर असूनही त्यांना हे छुपे युध्द करणे सोपे जाते.

या आपल्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पाकिस्तानने अनेक मार्गांचा वापर सुरु केला. काश्मीरमधील फुटीर प्रवृत्तीच्या गटांना फूस लावणे हा या धोरणाचाच एक भाग आहे. धार्मिक




आधारावर भारतात तेढ निर्माण करणे किंवा भारताचे तुकडे करणे शक्य नसल्याचे दिसल्यानंतर पाकिस्तानने आगतिक होऊन सशस्त्र व हिंसक दहशतवादाचा मार्ग अमलात आणण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर भारतात मुस्लिम समाजाच्या विरोधात वातावरण तयार करणे आणि हिंदू कट्टरपंथीयांना त्यातून बळ कसे मिळेल हा देखील याच पाकिस्तानी धोरणाचा भाग मानला जातो. भारतात मुस्लिमविरोधी कट्टर हिंदुत्ववादी सरकार सत्तेत असणे हे पाकिस्तानच्या कधीही फायद्याचेच राहणार आहे कारण त्यातूनच संघर्ष धगधगता ठेवण्याचे त्यांचे उद्दिष्ट पूर्ण होणार आहे.

अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना हे प्रयत्न करण्यात आले परंतु स्वतः वाजपेयी हे काहीसे उदारमतवादी असल्याने आणि त्यांचे सरकार आघाडीचे असल्याने त्या सरकारने संघर्षापेक्षा सामोपचार व संवादाचा मार्ग अवलंबिला. पाकिस्तानात लाहोर बसयात्रा करुन वाजपेयी यांनी लाहोरमध्ये जाऊन पाकिस्तानच्या अस्तित्वाला भारताकडून धोका नसल्याचे स्पष्ट आश्वासन दिले होते. त्याचबरोबर काश्मीरचा प्रश्न



सोडविण्यासाठी ‘इन्सानियत’चा आधार घेण्याचे जाहीर करुन काश्मीर प्रश्नी तोडगा काढण्यास प्राधान्य दिले. परिणामी तुलनेने काश्मीरमध्ये शांतता निर्माण होऊ शकली आणि मनमोहनसिंग यांनी देखील हीच प्रक्रिया आणखी पुढे नेल्याने पाकिस्तानचा नाइलाज होत गेला. त्यामुळेच मनमोहनसिंग यांच्या काळात काश्मीरसह जवळपास बहुतेक मुद्यांवर एक सर्वसंमतीचे वातावरण तयार होताना दिसल्यानंतरच पाकिस्तानातील विघ्नसंतोषी घटकांनी मुंबई हल्ला केला आणि परिस्थिती पुन्हा संघर्षाच्या बिंदूवर आणून ठेवली.

वरील संदर्भ लक्षात घेतल्यास पाकिस्तानातील राजकारणावर तसेच धोरणनिर्मितीवर असलेला लष्कर,

आयएसआय या गुप्तचर संघटनेचा निर्णायक प्रभाव लक्षात येईल. पाकिस्तानी लष्कर व आयएसआय यांच्या रणनीतीत धर्माधारित कट्टरपंथी व दहशतवादी गट-संघटनांना निर्णायक स्थान आहे. कट्टर इस्लामच्या आधारे अफगाणिस्तानसारख्या पुराणमतवादी समाज व देशात तालिबानसारख्या संघटनांचे राज्य कसे राहील यात पाकिस्तानचे हितसंबंध गुंतण्याचे हे मुख्य कारण आहे. अफगाणिस्तानमध्ये परिस्थिती सुधारुन स्थिर सरकारची स्थापना होण्यामुळे पाकिस्तानातील कट्टरपंथीयांचे 'एक दुकान बंद' झाल्याने आता त्यांनी त्यांचे सारे लक्ष भारताकडे व काश्मीरवर केंद्रित केले आहे. त्यात सध्या भारतात अशी राजवट आहे की ज्या राजवटीला केवळ मतांचे राजकारण करण्यासाठी पाकिस्तान व काश्मीर तसेच दहशतवादाचा उपयोग करायचा आहे आणि त्यासाठी अपरिपक्व व दूरदृष्टीच्या अभावातून सर्जिकल स्ट्राईकसारखे निर्णय केले जात आहेत. त्यामुळे जमीनीवरील परिस्थितीत फारसा फरक पडला नाही तरी त्यांना त्याची पर्वा राहिलेली नाही कारण केवळ अशा चमकदार कारवाया करुन मते मिळविणे व सत्तेत राहणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट त्यांच्यापुढे आहे.

यासाठी वेळोवेळी मुस्लिमांच्या विरोधात वातावरण पेटवून देण्याचे धोरणही ते अवलंबिताना दिसत आहेत. हे सर्वच पाकिस्तानच्या पथ्यावर पडणारे आहे. यातून मार्ग काय असा प्रश्न उभा राहणे स्वाभाविकच आहे. असंख्य तज्ञांनी याबाबत मार्ग सुचविलेले आहेत. त्यातील प्रमुख मुद्यावर म्हणजेच काश्मीरच्या मुद्यावर दिल्लीत बसलेल्या राज्यकर्त्यांनी व्यापक देशहिताची भूमिका घेऊन तोडगा काढण्याची भूमिका घेण्यावर भर दिला पाहिजे असे या तज्ञांचे म्हणणे आहे. त्यासाठी काश्मीरमधील नाराज झालेल्या सर्व घटकांशी प्रथम संवाद साधण्याची भूमिका घ्यावी लागेल. तसेच काश्मीरमधील फुटीर घटकांना केवळ कायदा व सुव्यवस्थेच्या म्हणजेच सशस्त्र किंवा पोलिसी व सुरक्षा यंत्रणांच्या माध्यमातून हाताळण्याऐवजी त्यांना एकाकी पाडण्याच्या दिशेने पावले टाकण्याची शिफारसही केली जाते. त्यासाठी काश्मिरी जनतेचे मन जिंकण्याची मूलभूत अट आहे आणि त्यानंतरच पाकिस्तानचे काश्मीरमधील सर्व मनसुबे हे नामोहरम होतील. परंतु काश्मिरी माणूस पाकिस्तानधार्जिणा आहे अशी समजूत करुन घेतलेली राजवट व नेते दिल्लीच्या तख्तावर बसलेले असतील तर ही जखम अशीच भळभळत वहात राहणार आहे. दुसरीकडे खुद्द संपूर्ण देशातील धार्मिक व सामाजिक सलोखा व सामंजस्य राखण्याकडेही दिल्लीच्या राजवटीला विशेष भर द्यावा लागेल. अन्यथा गोरक्षणाच्या मुद्यावरुन अल्पसंख्यकांची बिनदिक्कतपणे हत्या करण्याचे प्रकार परिस्थिती आणखी चिघळवतील. यामुळे दिल्लीतल्या या धोरणांच्या पुरस्कर्त्या राजवटीला व नेत्यांना सत्तेत कायम राहण्याचे सुख निश्चित मिळेल पण देशात अशांतता कायमची निर्माण होईल व त्याचे दूरगामी परिणाम कुणाच्यात आटोक्यात राहणार नाहीत.

देशांतर्गत पातळीवर सामोपचाराचे धोरण अवलंबितानाच आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानला एकाकी पाडण्याच्या प्रयत्नात तेजी राखावीच लागेल. आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतवादी संघटना, दहशतवादी यांना आश्रय देणे आणि त्यांना आर्थिक मदत देणाऱ्या देशांविरुध्द कारवाई करण्याच्या संदर्भात 'फिनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स' (एफएटीएफ)नावाचा राष्ट्रसमूह अस्तित्वात आहे. जे देश दहशतवाद्यांना आर्थिक मदत देतात किंवा त्यांना आश्रय देतात त्यांच्याविरुध्द आर्थिक कारवाई या राष्ट्रसमूहातर्फे केली जात असते. भारताच्या प्रयत्नांमुळे सध्या पाकिस्तानला या राष्ट्रसमूहाने 'ग्रे लिस्ट' मध्ये समाविष्ट केलेले आहे. यामुळे पाकिस्तानला दरवर्षी दहा अब्ज डॉलर्सचे नुकसान सहन करावे लागणार आहे. ग्रे लिस्टमध्ये समाविष्ट करताना या राष्ट्रसमूहाने पाकिस्तानला 27 अटी घातलेल्या होत्या आणि त्यामध्ये प्रामुख्याने सर्व दहशतवादी संघटनांवर बंदी घालणे, त्यांचे आर्थिक स्रोत बंद करणे, त्यांची बँकांमधील खाती व पैसा गोठविणे, मनी लॉंडरिंगच्या माध्यमातून जो पैसा दहशतवाद्यांपर्यंत पोहोचविला जातो त्याला आळा घोलणे अशा विविध आर्थिक अटींचा त्यात समावेश आहे. या सत्तावीस अटींची पूर्तता करण्यासाठी पाकिस्तानला सप्टेंबर-2019 पर्यंतची मुदत देण्यात आलेली आहे. त्यापैकी किमान दहा अटींवरील प्रत्यक्ष कारवाईचे तपशील पाकिस्तानला जून-2019मध्ये होणाऱ्या या राष्ट्रसमूहाच्या बैठकीसमोर सादर करावे लागणार आहेत. जर पाकिस्तानला त्यात अपयश आल्यास या राष्ट्रसमूहातर्फे पाकिस्तानला 'ग्रे लिस्ट' मधून 'ब्लॅक लिस्ट' मध्ये टाकण्याची कारवाई होऊ शकते आणि त्याचा अर्थ पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी, पाकिस्तानशी होणाऱ्या व्यापारावर निर्बंध अशा अनेक मार्गांनी पाकिस्तानची आर्थिक कोंडी केली जाऊ शकते. अर्थात असे काही झाले तरी पाकिस्तानला आर्थिक मदत करणारे चीनसारखे बलाढ्य देश आहेत हे विसरुन चालणार नाही आणि त्यामुळेच भारताला याबाबत अत्यंत काळजीपूर्वक आणि विचारपूर्वक पावलेच टाकावी लागणार आहेत. कारण एकाकी पडलेला पाकिस्तानही कमी धोकादायक नसेल. त्या अवस्थेत पाकिस्तानमधील काही आततायी घटक तेथील सत्ता हस्तगत करण्याचे प्रयत्न केल्याखेरीज राहणार नाहीत आणि मग अण्वस्त्रसज्ज पाकिस्तानची सूत्रे कोणा माथेफिरू किंवा अविचारी अशा घटकांच्या हाती गेल्यास त्याचा केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला धोका निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही. त्यामुळे अमेरिकेसारखा देश सुध्दा पाकिस्तानला वठणीवर आणताना टोकाचे पाऊल उचलताना आढळत नाही.

पाकिस्तानचा विचार करताना चीनला वेगळे ठेवून चालणार नाही. पाकिस्तानस्थित जैश ए मुहम्मद ही संघटना व तिचा

म्होरक्या मौलाना मसूद अजहर यांना आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित करणे आणि या संघटनेलाही दहशतवादी संघटना म्हणून जाहीर करण्याच्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या पातळीवरील प्रत्येक निर्णयाला चीनने विरोध केला व नकाराधिकाराचा उपयोग करुन ती बाब हाणून पाडली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेतही नुकताच अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन यांनी जैशच्या विरोधात ठराव सादर केला त्याबाबत चीनने तीव्र नापसंती व्यक्त केली. अमेरिका, रशिया, फ्रान्स व ब्रिटन या चार कायमस्वरुपी सदस्य राष्ट्रांनी जैशच्या विरोधात भूमिका घेतली आहे आणि चीन एकप्रकारे एकाकी अवस्थेत आहे. परंतु भारत व अमेरिकेतर्फे चीनचे मन वळविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. चीनच्या ताज्या निवेदनानुसार या विषयासंदर्भात बरीच विधायक किंवा सकारात्मक प्रगती झाली आहे. चीनचे हे निवेदन महत्वाचे मानले जाते. चीनचे पाकिस्तानात प्रचंड असे आर्थिक हितसंबंध गुंतले आहेत. 'चीन-पाकिस्तान इकनॉमिक कॉरिडॉर' हा चीनचा अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प गेली कित्येक वर्षे चालू आहे. पाकिस्तानने चीनला बलुचिस्तानातील ग्वादर बंदर दिलेले आहे आणि चीनने त्यांच्या सिकिंयांग प्रांतातून ग्वादर बंदरापर्यंत रस्ते तसेच रेल्वेमार्गाने वाहतुकीचे प्रकल्प हाती घेतले आहेत. यामुळे चीनचा पाकिस्तानातून थेट अरबी समुद्रात प्रवेश होणार आहे. त्यासाठी त्यांना सध्या हिंदी महासागर पार करुन जे यावे लागते त्याची आवश्यकता भासणार नाही. त्याचप्रमाणे अरब देश आणि आफ्रिकेत चीनला विस्तार करणे सहज सोपे होणार आहे. जैश किंवा पाकिस्तानात सक्रिय असलेल्या(अर्थातच लष्कर व आयएसआयच्या मदतीने) दहशतवादी गटांना आंतरराष्ट्रीय बंदी घालण्याच्या कृतीत सामील होण्याने उद्या हे दहशतवादी पाकिस्तानात मोठ्या संख्येने असलेल्या चीनच्या आर्थिक, औद्योगिक आणि अन्य प्रकल्पांवरही हल्ले सुरु करायला मागेपुढे पाहणार नाहीत आणि त्यातून एक नवीन समस्या निर्माण होऊ शकते. त्याचप्रमाणे सिंकियांग प्रांत हा मुस्लिम बहुसंख्यक प्रांत आहे व तेथेही फुटीर व हिंसक अशी इस्लामवर आधारित चळवळ सुरुच आहे. चीनने ती बळाचा वापर करुन आटोक्यात आणलेली आहे. पण पाकिस्तानातील दहशतवादी गटांच्या विरोधात गेल्यास ते या चीनमधील गटांशी संधान बांधून पुन्हा चीनमध्ये अशांतता निर्माण करु शकतील अशीही एक भीती चीनला वाटते. त्यामुळेच जैश, अजहर मसूद यांच्याविरुध्द



कारवाईच्या आंतरराष्ट्रीय प्रस्तावांबाबत चीनची काहीशी विपरीत भूमिका आढळून येते. अर्थात चीनला फार काळ अशी वेगळी भूमिका घेता येणार नाही आणि आंतरराष्ट्रीय दबावापुढे झुकावे लागेल अशी चिन्हे आहेत.

गेल्या काही काळापासून भारताचे परराष्ट्र धोरण पुन्हा पाकिस्तान केंद्रित होताना दिसत आहे. भारत ही उगवती आर्थिक महासत्ता असेल तर भारताला अशा प्रकारचे संकुचित व एकांड्या पध्दतीचे परराष्ट्र धोरण ठेवता येणार नाही. त्याचप्रमाणे केवळ अमेरिका, सौदी अरेबिया आणि इस्रायल यांच्यासारख्या देशांच्या गटात सामील होऊन जगातील इतर देशांची नाराजी ओढविणे भारताला परवडणारे नाही. सौदी अरेबिया काय किंवा इस्रायल काय यांच्याबरोबर आवश्यक तेवढेच संबंध राखणे भारताच्या हिताचे आहे. परंतु पाकिस्तानला वेसण घालायची असेल तर या तीनच देशांचा उपयोग होणार नाही. पाकिस्तानची सीमा इराणलाही लागून आहे आणि पाकिस्तानच्या दहशतवादी कारवाया इराणमध्येही चालू असतात.




अमेरिका, सौदी अरेबिया, इस्रायल यांचे इराणशी वैर जगजाहीर आहे. परंतु भारतीय उपखंडाच्या दृष्टीने भारत व इराण आणि अफगाणिस्तान यांचे तिहेरी संबंध अत्यावश्यक आहेत आणि ती परराष्ट्रसंबंध विषयक कसरत भारताला करावी लागणार आहे. दुर्दैवाने हा समतोल वर्तमान राज्यकर्त्यांकडून राखला जात नसल्याचे चित्र स्पष्टपणे आढळून येते. भारत नको इतका अमेरिका, इस्रायल आणि सौदी अरेबियाच्या कह्यात जात असल्याचे एक आंतरराष्ट्रीय चित्र निर्माण झालेले आढळते. त्यात लवकरात लवकर दुरुस्ती होऊन भारतातर्फे पूर्वीच्या काळात घेतली जाणारी सर्व-समतोल अशी परराष्ट्र-संबंध नीती किंवा धोरण अमलात येणे ही काळाची गरज आहे!

# बॉल पेनचा शोध

माणसाच्या आयुष्यातल्या अनेक नित्यनियमित गोष्टींबाबत वैज्ञानिकांनी लावलेले शोध हे अतिशय महत्वाचे असतात आणि ही शोध प्रक्रिया शतकानुशतके निरंतर चालू असते. आपल्याला सर्वांना शास्त्रज्ञ न्युटनची गोष्ट माहिती आहेच. तो दुपारच्या वेळेस बागेत विश्रांती घेत असताना झाडावरुन फळ टपकन जमिनीवर खाली पडले आणि त्यातून गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत जगासमोर आला. थोरशास्त्रज्ञ आर्केमिडीज हा अशाच एका प्रयत्नात अडकला असताना आपल्या घरी टबमध्ये स्नान करताना त्याला नविन शोध लागला आणि तो तसाच बाहेर पडून रस्त्यावर युरेका युरेका म्हणत धावत सुटला. अमेरिकेतल्या राईट बंधूंना लहानपणापासूनच आपल्याला पंख असते तर पक्षासारखे आकाशात विहार करता आले असते या कल्पनेने पछाडले. खूप वर्षांच्या प्रयत्न आणि परिश्रमातून त्यांनी विमानाचा शोध लावला. अशी असंख्य उदाहरणे सांगता येतील, आपल्या रोजच्या वापरात काही वस्तू असतात की त्यांचा शोध कोणी आणि कधी लावला असेल त्याचा विचारच कधी मनात येत नाही.

तर सांगायची गोष्ट म्हणजे तुम्ही आम्ही आता सरावाने लिहिण्यासाठी वापरतो Ball Point Pen ह्या Ball Point Pen चा शोध सुमारे दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीच्या वेळी १९४५ – ४६ साली हंगेरी देशात Ladislao Biro या एका १८ वर्षाच्या तरुणाने लावला. खरंतर तो डॉक्टर व्हायला निघालेला होता. त्याच्यानंतर तो शिल्पकार झाला. नंतर चित्रकार झाला व त्यानंतर त्याने राजकीय समालोचक म्हणूनही काम केलं.

हे सर्व करता असताना तो शाईचा फाऊंटन पेन वापरायचा. त्या काळातल्या पेनमधून येणारी शाई कागदावर लिहिताना कमी जास्त व्हायची तसेच ब्लॉटींग पेपरचा सुकविण्यासाठी वापर देखील करावा



लागायचा. याचा कंटाळा येऊन याऐवजी आपल्याला काही बनविता येईल का म्हणून त्याने सुरुवात केली. गंमत अशी होती की युद्ध समाप्तीनंतर आपल्या गावी म्हणजे बुढापेस्टला परत आल्यावर तो असाच कुठेतरी विचार करत गल्लीतल्या एका टोकावर बसला होता. गल्लीतल्या रस्त्यावर भरपूर खड्डे होते व त्या खड्डयांमध्ये पाणीही साचलेले होते, पण त्यातच लहान मुलांची गोटया खेळताना एका मुलाने मारलेली गोटी पाण्यावर जाऊन पुन्हा उसळी घेताना बाहेर घरंगळत जाताना त्याने निरखून पाहिली. त्यावेळी त्या गोटीला लागलेले पाणी एका सरळ रेषेत जाताना त्याला दिसले आणि मग त्याने एक मिलीमीटर डायमीटरची छोटी



गोळी तयार केली.

तिच पुढे बॉल म्हणून प्रसिद्धीला आली आणि त्याच्यावरती दाबून भरलेली शाईची ट्यूब लावली की शाई जसी गोटीवर येईल तशी ती पुढे येत असे आणि कुठल्याही अडथळ्यांविना थेंब न पडता व सुकवायची काळजी करावी न लागता सहजरित्या लिहिता येऊ लागले. असा झाला पहिल्या Ball Point Pen चा जन्म. १९४७ साली न्यूयॉर्क मध्ये एका महिन्यात १२ लाख ५० हजार डॉलरचे Ball Point Pen विकले गेले आणि त्यानंतर तर आज जगभरात आपण सगळे जण वेगवेगळ्या आकाराचे वेगवेगळ्या कंपन्यांचे Ball Point Pen लिहिण्यासाठी वापरतोय. या संशोधनाने प्रत्येक लिहिणाऱ्याला एक महत्वाचे साधन Biro ने जगाला दिले आहे. शोधांच्या दुनियेतला हा अजब माणूस आपण नेहमी स्मरणात ठेवायला हवा.

## शेवटचे पान

